(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

पृ. शी. :महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे व राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या पाठ्य पुस्तकांमध्ये आढळून आलेल्या चुका.

मु. शी. :महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,पुणे व राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक मंडळाच्या पाठ्य पुस्तकांमध्ये आढळून आलेल्या चुका यासंबंधी श्री.जयवंतराव जाधव ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, यांच्यामार्फत सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तक योजनेतून जिल्हा परिषदेच्या शाळांना वाटप करण्यात आलेल्या पुस्तकांपैकी तिसरीच्या बालभारती (मराठी) पुस्तकातील तब्बल चार धडे गायब झाल्याचे तर 16 पाने पुनर्मुद्रित करण्यात आल्याचे आढळून येणे, तसेच राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यामिक मंडळाच्या इयत्ता नववीच्या सामाजिकशास्त्र पुस्तकाच्या नव्या आवृत्तीत इतिहास आणि राज्यशास्त्राशी निगडीत अनेक चुका असल्याचे निदर्शनास येणे, शुध्दलेखन आणि काही संकल्पनांबाबत चुका असून एका प्रकरणातील राष्ट्रध्वजावर अशोकचक्राचे चित्रच नसणे, तसेच, सीबीएसईच्या दहावीच्या अभ्यासक्रमातील विज्ञानाच्या पुस्तकात तब्बल 50 चुका असल्याचे निदर्शनास येणे, या पुस्तकांची निर्मिती करतांना विद्यार्थ्यांकडे स्वत:ची जाणीव, निर्णयक्षमता, समस्या निराकरण, परिणामकारक संप्रेषण, सृजनशील व चिकित्सात्मक विचार ही उद्दिष्टे समोर ठेवून पुस्तकांची रचना केली असतांना शुध्दलेखन व संकल्पना मधील तसेच मुद्रक आणि

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

बांधणीतील अक्षम्य चुकांमुळे विद्यार्थ्यांच्या माथी सदोष पुस्तके मारण्यात येणे, या चुकांबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, बालभारतीची पुस्तके म्हणजे शालेय विद्यार्थ्यांच्या जीवनातील महत्वाचा टप्पा असून त्या टप्प्यापर्यंत चुकीच्या पध्दतीने शिकविले जात असेल तर भविष्यामध्ये विद्यार्थी शिक्षण कसे घेणार आणि बालभारती आहे की चुकीची भरती आहे असे दोन प्रश्न माझ्यासमोर निर्माण झालेले आहेत. सभापती महोदय, इयत्ता तिसरीच्या बालभारतीच्या मराठीच्या पुस्तकामध्ये राष्ट्रध्वजाचा टॉपिक समाविष्ट केलेला आहे. परंतु त्याच्या कन्टीन्यूटीमध्ये ते चित्र येत आहे. तरीही शासनाकडून प्रतिकात्मक उत्तर दिले जात असेल तर माझ्यासारख्या सर्वसामान्य नागरिकाला व सदस्याला ही गोष्ट पटत नाही. या पुस्तकात तांत्रिक किंवा व्याकरणाचीच चूक नाही तर तेथे शिक्षणही चुकीच्या पध्दतीने दिले जात आहे. जिल्हा परिषदेच्या गटाला किंवा गणाला वॉर्ड म्हटले जात नाही. नगरसेवकाच्या विभागाला वॉर्ड म्हटले जाते. परंतु या पुस्तकामध्ये जिल्हा परिषदेच्या गटाला वॉर्ड संबोधण्यात आलेले आहे. इलेक्ट्रोरल डिव्हिजन आणि इलेक्ट्रोरल कॉलेज, गट आणि गण असे त्यात नमूद केले पाहिजे. त्यामुळे या पुस्तकात शुध्दलेखनाच्या 18 व व्याकरणाच्या 12 चुका अशा अनंत चुका आलेल्या आहेत. या मंडळाकडून 19 कोटी रुपयांची पुस्तके छापली जातात आणि केवळ 2 टक्क्यांवर अवलंबून राहून संपूर्ण क्वॉलिटीबाबत समाधान मानले जात असेल तर ते मंडळाला, शासनाला अभिप्रेत आहे काय ? क्वॉलिटी कंट्रोल करण्यासाठी, व्याकरणातील चुका टाळण्यासाठी मंडळाकडे प्रूफ रिडर्स आहेत काय ? माझ्या माहिती प्रमाणे 19 कोटी रुपयांची पुस्तके छापली जात असताना प्रूफ रिडर्स नाहीत. त्यामुळे गुण नियंत्रणाची जबाबदारी कोणावर आहे ?

या निवेदनामध्ये सीबीएसईची जबाबदारी शासनाची नाही असे नमूद केलेले आहे. सीबीएसईची जबाबदारी शासनाची नसली तरी शासनामार्फत या राज्यात शिक्षण दिले जात आहे. ते जर चुकीच्या पध्दतीने दिले जात असेल तर शासन सीबीएसईची जबाबदारी कशी टाळू शकते ? सीबीएसईच्या पुस्तकाच्या मुख्यपृष्ठावर हृदयाच्या आकृतीमध्ये द्विदल व त्रिदल झडपा दाखविलेल्या नाहीत. किरणे परावर्तित करणाऱ्या प्रिझममध्ये चूक आहे. पान क्र.104, क्र.6.9 वरील फुफ्फुसाच्या आकृतीमध्ये बरगड्यांची संख्या 9 दाखविली आहे, वास्तविक 12 बरगड्या असतात. क्र. 6.4 वरील हायड्रोच्या आकृतीमध्ये तोंड दाखविलेले नाही. सीबीएसईच्या पुस्तकांमध्ये एकूण 50 चुका आहेत. त्या चुकांची जबाबदारी शासन घेणार आहे काय ? नाशिक जिल्ह्यातील

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव.....

श्री.गांगुर्डे नावाच्या सर्वसामान्य शिक्षकांच्या निदर्शनास या चुका आलेल्या आहेत. तेथे मोठ्या प्रमाणात शिक्षक शिकविण्याचे कार्य करीत असताना त्यांच्याही निदर्शनास ह्या चुका आल्या नाहीत. मंडळाच्याही लक्षात कसे आले नाही ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, बालभारतीमार्फत इयत्ता पहिली ते बारावी पर्यंतच्या पुस्तकांची छपाई केली जाते. इयत्ता पहिली ते आठवी पर्यंत अभ्यासक्रम तयार करण्याचे काम एसटीआरटी व बालभारतीचे आहे. छपाईचे कामही बालभारतीकडून केले जाते. त्याच पध्दतीने इयत्ता नववी ते बारावीपर्यंतचे अभ्यासक्रम तयार करण्याचे काम एस.एस.सी. व एच.एस.सी.बोर्डामार्फत केले जाते व छपाईचे काम बालभारतीकडून केले जाते.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा...

8 भाषांमध्ये एकूण 722 टायटल्सची पुस्तके छापली जातात. या वर्षी एकूण 19 कोटी 11 लाख पुस्तके छापलेली आहेत. इयत्ता तिसरीच्या मराठी बालभारती पुस्तकाच्या 14 लाख 60 हजार प्रती छापलेल्या होत्या. 16 पाने पुनर्मुद्रीत करण्यात आलेली आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी सांगू इच्छितो की, जवळपास 19 कोटी पुस्तके छापली जातात. देशभरातील 240 ठिकाणी या पुस्तकांची छपाई होते. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या पुस्तकांची तपासणी करणे शक्य होत नाही. केवळ 2 ते 5 टक्के पुस्तकांची तपासणी होते. या पुस्तकांची छपाई केल्यानंतर घराघरामध्ये त्या पुस्तकांचे बाईंडिंग केले जाते. अशा वेळी एखादा फॉर्म अनवधानाने राहिला तर 4 धडे छपाईचे राहून जातात. असे जर कोणी लक्षात आणून दिले तर तातडीने पुस्तक बदलून देण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सन्माननीय सदस्यांनी तीन-चार मुद्दे उपस्थित केले. केवळ दोन किंवा पाच टक्केच पुस्तकांची तपासणी करण्याऐवजी ती तपासणी मोठ्या प्रमाणावर करावी असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. मी सांगू इच्छितो की, अब्जावधी पाने छापली जातात, ती तपासण्यासाठी हजारो माणसे लागतील. म्हणून मोठ्या प्रमाणावर तपासणी करणे शक्य होणार नाही. मध्यप्रदेश, उत्तरांचल, आंध्रप्रदेश या राज्यांनी देखील पुस्तकांच्या छपाईसंबंधी आपलाच पॅटर्न घेतलेला आहे. त्या राज्यांनी आपलाकडून माहितीसुध्दा घेतलेली आहे.

सन्माननीय सदस्यांनी ज्या पुस्तकावरील ध्वजाचा उल्लेख केला ते पुस्तक जुने आहे. सदर चित्र प्रतीकात्मक आहे. मुले उत्साहात विविध पताका घेऊन जात आहेत असे त्यामध्ये दर्शविलेले आहे. तरीही याबाबत संभ्रम होऊ नये म्हणून हे चित्र पुढील आवृत्तीमधून वगळण्याबाबतची कार्यवाही करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी "गण", "गट" या शब्दांचा उल्लेख केला. त्यांच्या मताशी मी सहमत आहे. ज्या ज्या चुका झालेल्या आहेत त्या कळविण्यात आलेल्या आहेत. "वाण" हा शब्द वगळण्यात आलेला आहे. "दुष्ट" या शब्दाऐवजी "दृष्ट" शब्द वापरावयास पाहिजे होता. त्याप्रमाणे सुधारणा करण्यात आलेली आहे. पुस्तके एसएससी बोर्डाकडून तयार केली जातात आणि पाठ्यपुस्तक मंडळातर्फे छपाई करण्यात येते.

डॉ. नीलम गो-हे : सन्माननीय सदस्यांनी शालेय पुस्तकातील आशयामध्ये होत असलेल्या चुकांच्या संदर्भात लक्षवेधी सूचना उपस्थित केलेली आहे. माझा प्रश्न असा आहे की, धड्यांचा जो

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

आशय आहे त्यामध्ये चुका होऊ नयेत म्हणून त्या आशयाची तज्ज्ञ व्यक्तींकडून तपासणी करणारी यंत्रणा आहे काय ? गण, गट, या सारख्या ज्या शाब्दिक चुका झालेल्या आहेत त्या प्रूफ न तपासल्यामुळे झालेल्या आहेत. याबाबतीत संबंधित अधिका-यांवर काय कारवाई करण्यात येणार आहे. अशा प्रकारच्या चुका होऊ नयेत यासाठी कायम स्वरुपी यंत्रणा निर्माण करण्यात येणार आहे काय ?

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1....

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी मूळ विषयाला हात घातला आहे याबद्दल वाद नाही. पुस्तके निर्दोष असली पाहिजेत, त्यातील आशय व्यवस्थित असावा असे वाटत असेल तर जे तज्ज्ञ पुस्तक तयार करतात त्यांच्या स्तरावर योग्य पध्दतीने काम झाले पाहिजे. त्यासाठीच सहा महिन्यापूर्वी ही बाब लक्षात आल्यानंतर पाठ्यपुस्तके तयार करीत असताना तज्ज्ञांचा सहभाग घेतला पाहिजे असा निर्णय घेतला आहे. मी आपल्या माध्यमातून सभागृहाला सांगू इच्छितो की, 8 भाषा समित्या आणि 12 भाषेतर समित्या नेमण्यात आल्या आहेत.. मराठी पुस्तकाचे प्रमुख श्री.नागनाथ कोतापल्ले व श्री.रा.रं.बोराडे हे आहेत. हिंदीकरिता श्री.गुलजार, इंग्रजीकरिता श्री.कुमार केतकर व श्री.अनिकेत झावरे, गणिताकरिता डॉ.जयंत नारळीकर आणि रवि सुब्रम्हण्यम, विज्ञानकरिता इस्त्रोचे श्री.रंजन केळकर व बाळ कुंटे, इतिहासाकरिता श्री.साळुंखे, प्रा.हरी नरके व जयसिंग पवार तसेच माहिती व तंत्रज्ञानकरिता डॉ.विजय भटकर यांना नियुक्त केले आहे. या विषयाबाबत त्यांच्या बैठका झाल्या असून प्रत्येकाने मला दूरध्वनी करुन सांगितले की, आपण खूप चांगली सुरुवात केली आहे. मला खात्री आहे की, या निर्णयामुळे चांगल्या दर्जाची पुस्तके निर्माण होतील.

ज्यांनी चुका केल्या आहेत त्यांच्यावर काय कारवाई करणार असा प्रश्न उपस्थित केला आहे. पुस्तके ज्यावेळी छपाईसाठी पाठविली जातात त्यापूर्वी 7 वेळा प्रूफ तपासले जाते. इतक्या लोकांच्या माध्यमातून तपासणी होत असते. या कामामध्ये प्राध्यापक व शिक्षक सहभागी होते. चुका झालेल्या आहेत, हे सत्य आहे. म्हणून आपण त्यांना वगळले आहे. प्राध्यापक व शिक्षकांच्या जागी मी सांगितलेल्या नामवंत मंडळींचा समावेश केलेला आहे.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, 19.11 कोटी पुस्तके छापली जातात. एवढ्या मोठया संख्येने पुस्तके छपाई होत असताना त्यात चुका राहणे योग्य नाही. तांत्रिकदृष्ट्या पाहणी होणे शक्य नसते असे मंत्री महोदयांनी सांगितले. हे उत्तर योग्य नाही. चुकांबाबत समर्थन करणार असाल तर त्याला काही अर्थ राहणार नाही. पुस्तकातील धडे निर्दोष असले पाहिजेत. पुस्तक निर्मिती करणे अवघड नाही. ज्यांनी धडे लिहिले आहेत ते योग्य आहेत की नाही हे तपासण्याची गरज आहे. या कामात ज्या चुका होतात त्याबद्दल काय कारवाई करणार आहात?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले की, सात वेळा प्रूफ तपासण्यात येते. त्यामुळे चुका राहूच नयेत, पुस्तके निर्दोष असली पाहिजेत. वृत्तपत्र असो की पुस्तक असो ते निर्दोषच असले पाहिजे यात वाद नाही. एकदा पुस्तक छापले की ते 10 ते 12 वर्षे चालते. त्यामुळे पुस्तक निर्दोष असावे यादृष्टीने शासन प्रयत्नशील आहे.

माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी प्रश्न विचारला की, सीबीएसईच्या पुस्तकांबाबत महाराष्ट्र शासनाचे नियंत्रण आहे की नाही? सीबीएसई बोर्डाची पुस्तके दिल्लीहून छापून येतात. त्यांच्या पुस्तकांमध्ये 50 चुका असल्याचे माननीय सदस्यांनी सांगितले आहे. ती पुस्तके महाराष्ट्रात छापून तयार केलेली नाहीत. आम्ही सीबीएसई बोर्ड, दिल्ली यांना त्यांच्या पुस्तकातील चुकांबाबत कळवू. बालभारतीकडून जितक्या कमी प्रमाणात चुका होतात त्याच पध्दतीने त्यांनी सुध्दा काम केले पाहिजे.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 2 व 12 पुढे ढकलण्यासंबंधी</u>

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आजच्या कामकाज पत्रिकेतील लक्षवेधी सूचना क्रमांक 2 व 12 पुढे ढकलण्यात येत आहेत.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, अधिवेशनाचा कालावधी संपत आला आहे. त्यामुळे आता जी लक्षवेधी सूचना क्रमांक 2 पुढे ढकलण्यात आल्याचे आपण जाहीर केले आहे, ती लक्षवेधी सूचना आज दुपारी किंवा उद्या चर्चेला घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची प्रलंबित रक्कम मिळणे

मु. शी. : राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची प्रलंबित रक्कम मिळणे यासंबंधी सर्वश्री धनंजय मुंडे, अमरसिंह पंडित, डॉ.रणजित पाटील, सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, भगवान साळुंखे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनंजय मुंडे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील ओ.बी.सी. विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीची 14,000 कोटी रुपये फी प्रलंबित राहिल्याने 10 लाख विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, सर्व ओबीसी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेमध्ये भटक्या जाती-जमाती, विशेष मागास प्रवर्गाचा समावेश असणे, राज्य शासनाने आधी शिष्यवृत्तीची रक्कम द्यायची आणि नंतर केंद्र शासनाने त्याची प्रतिपूर्ती करावी अशा प्रकारचे योजनेचे स्वरुप असणे, 10 लाख ओबीसी विद्यार्थ्यांपैकी 3,34,000 विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती व 55 हजार विद्यार्थ्यांच्या शुल्क माफीची 327 कोटी रुपये इतकी रक्कम अद्यापही मिळालेली नसणे, आगामी शैक्षणिक वर्षासाठी शिष्यवृत्ती व शिक्षण शुल्क यास 600 कोटी रुपयांची आवश्यकता असताना अर्थसंकल्पात केवळ 470 कोटी रुपयांचीच तरतूद करण्यात येणे, राज्य शासन ही योजना पुढे सुरु ठेवेल की बंद करेल याबाबत पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण होणे, शैक्षणिक सत्र सुरु होऊनही थकबाकी न दिल्याने शाळा, कॉलेज, महाविद्यालय यांच्याकडून विद्यार्थ्यांना वेठीस धरण्यात येणे, त्यामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये पसरलेली नाराजी, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.शिवाजीराव मोघे (सामाजिक न्याय मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3....

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-3....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदनाची प्रत अजूनही मला प्राप्त झालेली नाही. याच विषयावरील लक्षवेधी सूचना मागील अधिवेशनात देखील चर्चेला आलेली होती. त्यावेळी शासनाने जे निवेदन सादर केले होते तेच उत्तर आजच्या निवेदनाच्या माध्यमातून दिलेले आहे. राज्यातील ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रलंबित शिष्यवृत्तीबाबतचा हा विषय आहे.

नंतर डी.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे ....

आज एकूण 10 लाख ओबीसी विद्यार्थ्यांपैकी 3 लाख 34 हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. 55 हजार विद्यार्थ्यांना शुल्क माफीच्या योजनांमधून कोणत्याही प्रकारचा फायदा मिळत नाही. आपण एकीकडे शाहू-फुले-आंबेडकर यांचे नाव घेऊन राज्य चालवितो आणि दुसरीकडे ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती सुध्दा वेळेवर देऊ शकत नाही, ही अतिशय दुर्दैवी बाब आहे. निवेदनामध्ये नमूद केले आहे की, सन 2001-02 ते सन 2011-12 पर्यंत केंद्र सरकारकडून शिष्यवृत्तीचे पैसे प्राप्त झाले नसल्यामुळे आम्ही शिष्यवृत्ती देऊ शकत नाही. निवेदनामध्ये दिलेल्या आकडेवारीनुसार अजून 1130 कोटी रूपये शिष्यवृत्ती देणे बाकी आहे. मला लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून असे विचारावयाचे आहे की, आपण ही शिष्यवृत्ती केव्हापर्यंत देणार आहात, केंद्र सरकार पैसे देत नसेल तर राज्य सरकार स्वत:च्या निधीतून शिष्यवृत्तीची योजना चालू ठवणार का, येथून पुढे केंद्र सरकारकडून पैसे मिळणारच नसतील तर राज्य सरकारची या शिष्यवृत्तीच्या बाबतीत काय भूमिका आहे ? सभापती महोदय, व्यावसायिक अभ्यासक्रमातील एससी प्रवर्गातील विद्यार्थी सोडता ओबीसी, एसबीसी, व्हीजेएनटी विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती बंद केली आहे. व्यावसायिक अभ्यासक्रम हे शिक्षण नाही का ? मग त्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीपासून का वंचित ठेवले जात आहे ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, राज्यातील विमुक्त भटक्या जाती व ओबींसी विद्यार्थ्यांसाठीच्या शिष्यवृत्तीच्या संबंधीचा प्रश्न आहे. केंद्र सरकारमध्ये या संदर्भात उत्पन्नाच्या मर्यादा आहे. तसेच, बरीच राज्ये शिष्यवृत्ती देत नाहीत. आपण आपल्या येथे ओबीसी विद्यार्थ्यांसाठी साडे चार लाख रूपयांची मर्यादा ठेवली आहे. भारत सरकारची एससी, एसीटीच्या विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीच्या संदर्भात फक्त 2 लाख रूपयांची मर्यादा आहे आणि ओबीसी विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी 1 लाख रूपयांची मर्यादा आहे. आपण ओबीसी विद्यार्थ्यांसाठी साडे चार लाख रूपयांची मर्यादा ठेवली आहे. आपले म्हणणे आहे की, ती योजना बंद करायची नाही. परंतु, यामध्ये थोडा उशीर होत आहे. मागील वेळी 630 कोटी रूपये देणे बाकी होते, ते यावेळी दिले आहेत. आपण हे पैसे केव्हा देणार, असे विचारले आहे. मी सांगू इच्छितो की, आपण यावेळी 1400 कोटी रूपयांची व्यवस्था केली आहे. मागील देणे अगोदर देण्यात येईल आणि ऑक्टोबरच्या नंतर वर्षभरात जे द्यावे लागतील, ते 31 मार्च पूर्वी देण्यात येतील.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुधीर तांबे : सभापती महोदय, शासन एक अत्यंत मोठी शिष्यवृत्ती योजना एससी, एसटी, एनटीच्या विद्यार्थ्यांना शंभर टक्के राबवित आहे, त्या बद्दल मी शासनाचे अभिनंदन करतो. माननीय मंत्र्यांनी सांगितलेले रास्तच आहे. ही एक मोठी महत्वाकांक्षी योजना राबविली जात आहे. आपण सुरू केलेली योजना बंद पडता कामा नये. बीसीए, बीबीए या कोर्सेसना आपण शिष्यवृती देत नाही. तसेच, डिप्लोमा झालेल्या डायरेक्ट इंजिनिअर्संसाठी आपण शिष्यवृत्ती देत नाही. व्यावसायिक कोर्स हा व्यावसायिक कोर्स असतो. सर्व प्रकारच्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना ही शिष्यवृत्ती कोणत्याही स्वरूपाचे बंधन न टाकता तातडीने सुरू करणार का ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, भारत सरकारने सन 2001 ला 75 कोर्सेस वाढविले आहेत. एससी एसटीला त्या संदर्भातील शिष्यवृत्ती लागू केली आहे. कारण भारत सरकार त्या संदर्भातील रिइम्बर्समेंट शंभर टक्के देते. सुरूवातीला सांगितल्याप्रमाणे, मागील देणे 623 कोटी रूपये होते. त्या कोर्सेसलाच पैसे देण्याची अडचण आहे. आपली उत्पन्न मर्यादा मोठी असल्यामुळे नवीन कोर्सेसचा विचार करता येत नाही, हे मी लक्षात आणून देतो. कर्नाटक राज्यात व्यावसायिक शिक्षणासाठी खाजगी संस्थेला 18090 व अल्पसंख्यांक संस्थेला 23 हजार एवढीच शिष्यवृत्ती देण्यात येते. आपण आपल्या येथे मेडिकल कॉलेजच्या, व्हीजेएनटीच्या विद्यार्थ्यांना पाच लाख शिष्यवृत्ती असेल तर पाच लाख रूपये देतो, इंजिनिअरिंगच्या विद्यार्थ्याला सव्वा लाख रूपये शिष्यवृत्ती देतो. कर्नाटक राज्याने म्हटले आहे की, दोन्ही संवर्गाच्या प्रत्येकी 20 हजार जणांना शिष्यवृत्ती देण्यात येईल.

सभापती महोदय, कर्नाटक राज्य फक्त 20 हजार मुलांना शिष्यवृत्ती देणार आहे. आपण 12 लाख विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देतो, याचा देखील आपण विचार केला पाहिजे. माझ्याकडे 5 राज्यांची तुलनात्मक माहिती आहे. अनेक जणांकडून गुजरात राज्याचे मोठे नाव घेतले जाते. गुजरात राज्याने ओबीसी, व्हीजेएनटीच्या विद्यार्थ्यांकरिता काय केले, ते मी आपल्याला सांगतो.

(नंतर श्री. भारवि ....

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे...

गुजरात राज्याने ओबीसी, व्हीजेएनटीकरिता काय केले आहे ते देखील सभागृहाला सांगू इच्छितो. गुजरात राज्यामध्ये शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेची अंमलबजावणी करण्यात येत नाही. या राज्यामध्ये केवळ केंद्र शासनाची अल्पसंख्याकांसाठी असलेली मॅट्रीक्युलेटर शिष्यवृत्ती योजना लागू आहे. केरळ राज्याने इतर मागासवर्ग विद्यार्थ्यांसाठी कुटुंबाची वार्षिक उत्पन्नाची मर्यादा 42 हजारावरून एक लाख केली आहे. आपल्या राज्यात तीच मर्यादा साडेचार लाख रूपये आहे. त्यांचे कोर्सेस देखील मर्यादित आहेत. अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, पशुसंवर्धन, विधी अशा प्रकारचे कोर्सेस आहेत. आपण तर त्यांच्या पेक्षा जास्त कोर्सेसचा समावेश केलेला आहे. त्यामुळे अधिक कोर्सेसचा पुन्हा यात समावेश करता येणार नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, अन्य राज्यांपेक्षा आपल्या राज्यामध्ये जास्त सवलत असल्यामुळे ती बाब अभिनंदनीय आहे. प्रत्येक जिल्ह्याला दरवर्षी कोटा दिला जातो त्याप्रमाणे प्रथम येणाऱ्याला प्राधान्य दिले जाते हे खरे आहे काय, असल्यास ते असण्याचे कारण काय आहे तसेच शासन ईबीसीची उत्पन्नाची मर्यादा कधी वाढविणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, कुठल्याही जिल्ह्याला कोटा दिलेला नसतो. विनाअनुदानित, कायम विनाअुदानित संस्थेतील विद्यार्थ्यांना आपण मदत करतो. ओबीसीमध्ये पावणे चारशे जाती आहेत. व्हीजेएनटीमध्ये आपण 100 टक्के प्रतिपूर्ती देतो. ओबीसीसाठी 50 टक्के प्रतिपूर्ती देतो. आपण सर्वांनाच मदत करत असतो म्हणूनच मोठ्या प्रमाणावर आऊट स्टँडिंग आहे. या वर्षासाठी आपण 1400 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. आपण अनुदान हे विद्यार्थ्यांला न देता कॉलेजना देत आहोत. श्री.विलासराव देशमुख यांच्या काळात कॉलेजना पैसे देण्याचा निर्णय घेण्यात आला. पूर्वी विद्यार्थी कॉलेजला पैसे देत होते आणि त्यानंतर मग आपण कॉलेजला पैसे देत होतो. परंतु, विद्यार्थ्यांकडे पैसे उपलब्ध होत नव्हते. त्यावेळी मग शासनाने कॉलेजना सूचना दिल्या की, आपण विद्यार्थ्यांकडून पैसे मागू नयेत. ती जबाबदारी शासनाची राहील. आपण आदिवासी सोडून 1800 कोटी रूपये देत आहोत. ईबीसीच्या उत्पन्नाची मर्यादा रूपये एक लाख इतकीच आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, फुले,शाहू,आंबेडकर यांच्या विचाराने काम करणारे हे राज्य आहे. अनसूचित जाती व जमातीसाठी अनुक्रमे प्रत्येकी साडेचार कोटी रूपये बजेटमध्ये राखून ठेवतो. असे असताना इतर राज्ये आपल्यापेक्षा कशा पद्धतीने कमी सवलत देतात यासंबंधातील तुलना करू शकत नाही. भटके विमुक्त, ओबीसी, मागासवर्ग यांच्यासाठी शिक्षणासाठी हात आखडता कसा काय धरता ? शासनाने कुठल्या वर्षी शिष्यवृत्तीची रक्कम वेळेवर दिली आहे याबाबतचा खुलासा करावा. जर दिली नसेल तर या पुढच्या काळात गोरगरीब विद्यार्थ्यांना वेळेच्या वेळी शिष्यवृत्ती देण्यात येईल काय व त्यासंबंधी शासन कोणती कार्यवाही करणार आहे ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मागच्या वर्षी 800 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली होती. यावर्षी आपण 1400 कोटी रूपयांची तरतूद केली आहे. मागच्या व या वर्षीची शिष्यवृत्ती देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. यासाठी आम्ही सप्लीमेंटरी देखील घेणार आहोत. विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून शासन प्रयत्नशील आहे. आम्ही दोन ठिकाणी ॲट्रॉसिटी ॲक्ट देखील लावला आहे. मागासवर्गीय उमेदवारांना न्याय देण्याचे समर्थन शासनाने पूर्णपणाने केलेले आहे. त्याप्रमाणे त्याची अंमलबजावणी होईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मागासवर्गीयांसाठी असलेल्या सामाजिक व आर्थिक योजनांची अंमलबजावणी सुमार होत असून तो चिंतेचा विषय आहे असे सामाजिक संस्थेचे अहवाल आहेत. ज्या कोर्सेसना महाराष्ट्र शासनाची मान्यता नाही त्यांना देखील शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. त्यासंबंधी आपण कारवाई देखील केली असून संबंधितांना निलंबित देखील केले आहे. महाराष्ट्र हा मोठा प्रदेश आहे. केंद्रा कडून निधी मिळविण्यामध्ये आपला नंबर देखील मागे आहे. माझा प्रश्न असा आहे की, आपल्याकडे विद्यार्थी संख्या जास्त असल्यामुळे आधार कार्डाशी लिंक करून शिष्यवृत्ती द्यावी. जेणे करून जे सरकार मान्य कोर्सेस नाहीत त्यांच्याकडे आपली शिष्यवृत्ती जाणार नाही. ज्या कोर्सेसना मान्यता नाही तेथे शिष्यवृत्ती जात असल्यामुळे लाखो मागासवर्गीय विद्यार्थी प्रलंबित रहात आहेत. त्यांच्यासाठी शासन तातडीने उपाययोजना करणार आहे काय व यासाठी किती कालावधी लागणार आहे ?

श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, मी समर अहवाल पहातो. पण सदरहू स्कॉलरशीप जानेवारी 2010 पासून सुरु केली असून देशामध्ये एवढ्या मोठ्या प्रमाणात कुठेही स्कॉलरशीप दिलेली नाही. आपण जवळजवळ एकंदर 1800 कोटी रुपये देत आहोत. आता नॅशनलाईज बँकेमध्ये एकंदर साडेसतरा लाख विद्यार्थ्यांनी अकाऊंट उघडले आहे आणि तेथे त्यांना डायरेक्ट अकाऊंट दिले असून याला केंद्र शासनाच्या आय.टी. विभागाचे अवॉर्ड देखील मिळालेले आहे. तसेच मघाशी सन्माननीय सदस्यांनी बोलत असताना सुमार असा शब्द वापरलेला आहे, पण मला त्याची माहिती नाही. आपण आता घरकुल योजना सुरु केली आहे. मात्र इंदिरा निवास व्यवस्था ही योजना देखील आहे आणि त्यामध्ये एस.सी.एस.टी.ला 60 टक्के सवलत देतोच. आता आपण रमाई नावाची योजना काढली आणि मी अतिशय नम्रपणे सांगतो की, गेल्या 3 वर्षामध्ये देशामध्ये कुठेही नाही पण बी.पी.एल.मधील ज्या लोकांकडे पक्के घर नाही त्यांच्यासाठी 2 हजार 68 कोटी रुपये खर्च करुन पक्के घर दिलेले आहे. तसेच आधार कार्ड हे केवळ पाच राज्यांसाठी केले आहे. आपण ही स्कॉलरशीप सर्व जिल्ह्यांसाठी लागू केली आहे. केंद्र शासनाने आधार कार्डच्या बाबतीत निर्णय घेतलेला आहे आणि त्यानुसार पुढच्या काळामध्ये याची अंमलबजावणी करु.

श्री.निरंजन डावखरे : सभापती महोदय, प्रथम मी शासनाचे आभार मानतो. कारण त्यांनी अतिशय चांगल्या योजनेला सुरुवात केली आहे. परंतु ही योजना राबविण्याच्या बाबतीत कुठे खंड पडू नये. याबाबतीत माझे तीन स्पेसिफीक प्रश्न आहेत. सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी विचारले की, अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना देखील ही योजना लागू करणार आहात काय? तसेच ईबीसी चा 1 लाखाचा स्लॅब वाढवून तो 3 लाख करणार आहात काय ? शेवटचा प्रश्न असा आहे की, मघाशी माननीय मंत्री महोदयांनी उत्तरामध्ये सांगितले की, संस्थामधील विद्यार्थ्यांकडून हे पैसे गोळा केले जात होते. नंतर माननीय मुख्यमंत्री कै.विलासराव देशमुख साहेब होते, त्यावेळी असे सांगण्यात आले होते की, विद्यार्थ्यांकडून पैसे घेतले जाणार नाहीत. पण असे असले तरी अजूनही काही संस्था विद्यार्थ्यांकडून पैसे गोळा करीत असतील तर त्यांच्या बाबतीत योग्य ती कारवाई करणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, ही बाब इंजिनिअरींग कॉलेजला सुध्दा लागू आहे आणि मी सुरुवातीला सांगितले की, एस.सी.एस.टी. विद्यार्थ्यांच्या बाबतीत ज्या दोन कॉलेजनी असा प्रकार केला आहे त्यांच्या विरुद ॲट्रॉसिटी ॲक्ट लावलेला आहे. आम्ही एवढ्या मोठ्या प्रमाणात ..

एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.शिवाजीराव मोघे . . . .

पैसे देतो, यामुळे थोडे थांबावे. ठीक आहे, आपण उशिरा पैसे देतो, त्यामुळे त्यांना त्रास होत आहे. कारण आपली उत्पन्नाची मर्यादा मोठी आहे. परंतु आपण याबाबतीत कडक अशा प्रकारची कारवाई निश्चित करु.

लक्षवेधी सूचनेसंबंधी

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : आजच्या कामकाज पत्रिकेवरील क्रमांक 4 व 5 वरील लक्षवेधी सूचना ज्या सन्माननीय सदस्यांनी दिलेली आहे ते आता सभागृहात उपस्थित नसल्यामुळे क्र.6 वरील लक्षवेधी सूचना प्रथम घेण्यात येईल.

एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी - माननीय उप सभापती

पृ.शी. : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे या ब्रिटीशकालीन इमारतीतील मुद्रणालय व ग्रंथागाराच्या इमारतींची झालेली दुरवस्था

मु.शी. : शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे या ब्रिटीशकालीन इमारतीतील मुद्रणालय व ग्रंथागाराच्या इमारतींची झालेली दुरवस्था यासंबंधी श्री.मोहन जोशी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीया व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"शासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे या ब्रिटीशकालीन इमारतीस पुरातत्व विभागाने पुरातन वास्तू म्हणून जाहीर केले असून, तेथील मुद्रणालय व ग्रंथागाराच्या इमारतींची अत्यंत दुरवस्था झाली असणे, काही इमारतींच्या स्लॅबला गळती लागली असून एका इमारतीला भले मोठे भगदाड पडले असल्याचे धक्कादायक बाब नुकतीच उघडकीस येणे, जुनी कालबाह्य यंत्रे आणि शासनाच्या छपाई कामाचा वाढता ओघ, त्यातच मुद्रणालयातील रिक्त असलेली 154 पदे, यामुळे कर्मचाऱ्यांवर कामाचा पडणारा असह्य ताण, या मुद्रणालयास तातडीची व कालमर्यादेची कामे उत्कृष्ट केल्याबद्दल राष्ट्रीय पातळीवरील उत्कृष्ट छपाईची 71 पारितोषिके मिळालेली असूनही शासनाचे मुद्रणालयातील विविध समस्यांकडे होत असलेले दुर्लक्ष, इमारतीमध्ये अपंग कर्मचाऱ्यांना पाश्चात्य पध्दतीची शौचालय सुविधा करणे, कर्मचाऱ्यांच्या अतिकालीन भत्ता, शिलाई व धुलाई भत्त्यामध्ये वाढ करुन त्यसाठी निधीची तरतूद करणे, विविध शासकीय कार्यालयांची रुपये 150 कोटींची थकबाकी बिले तत्काळ अदा करण्याची आवश्यकता. याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, या बाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना व प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .एफ-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये मुंबई, नागपूर किंवा पुण्यातील जे शासकीय प्रेस आहेत, त्याबाबतची ही लक्षवेधी सूचना आहे. माझी शासनाला विनंती आहे की, ज्यावेळी लक्षवेधी सूचनेला उत्तर दिले जाते तेव्हा प्रशासनाकडून चुकीची उत्तरे येऊ नयेत. तसेच याठिकाणी जी पडझड झाली होती, त्याची दुरुस्ती झालेली आहे असे म्हणणे अत्यंत चुकीचे आहे. तेथील भिंतीला मोठे भगदाड पडलेले आहे आणि मी परवा त्याठिकाणी स्वत: भेट दिली. पण त्या भिंतीला पडलेले मोठे भगदाड अजूनही तसेच आहे.त्यामुळे तेथे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जिवितास धोका आहे अशी परिस्थिती आहे.स्लॅब मधून जी गळती होत होती, त्या संदर्भातील कामे सुरु झाली आहेत हे खरे आहे.परंतु त्याठिकाणी ज्या अनेक छोट्या-छोट्या गोष्टी करावयाच्या राहून गेल्या आहेत. त्याठिकाणी गेल्या अनेक वर्षापासून अपंग लोक देखील काम करीत आहेत. टॉयलेटला जाण्यासाठी जो कमोड लागतो त्यांची किंमत फक्त पाच हजार रुपये आहे.परंतु ही सुविधा देखील शासन उपलब्ध करु शकत नाही ही गोष्ट मनाला अतिशय वेदना देणारी आहे. गेल्या वर्षापासून तेथील भरतीची प्रक्रिया सुरु झालेली आहे, पण अजूनही ती पूर्ण झालेली नाही. तसेच शासकीय कार्यालयांसाठी जी छपाईची कामे करावी लागतात, ती सर्व कामे शासकीय प्रेस मध्ये होणे अतिशय आवश्यक आहे.

सभापती महोदय, मी याठिकाणी एक उदाहरण देऊ इच्छितो की, यापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागामार्फत या प्रेसमधून दर महिन्याला 25 हजार पत्रिका छापून घेण्यात येत होत्या. पण आता ते दरमहा एक लाख पत्रिका खाजगी प्रेसमधून छापून घेतात. त्यामुळे शासनाचा प्रेस असताना बाहेरुन पत्रिका छापून घेणे हा देखील चुकीचा निर्णय आहे.माझे याबाबतीत स्पेसिफीक तीन प्रश्न आहेत. एक म्हणजे तेथील भिंतीला जे भगदाड पडले आहे, त्याची दुरुस्ती करणे आणि अपंग व्यक्तींसाठी प्रसाधन गृहाचे काम करणे तसेच धुलाई भत्त्याच्या वाढीचा निर्णय शासन एक महिन्यामध्ये घेणार आहे काय? तसेच याठिकाणी एक वर्षापासून भरतीची प्रक्रिया सुरु झाली आहे, ती तीन महिन्याच्या आत पूर्ण करण्यात येणार आहे काय असा माझा दुसरा प्रश्न आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

श्री.मोहन जोशी....

शासकीय कार्यालयातील सर्व छपाईंची कामे शासकीय प्रेसमध्ये करण्याच्या सूचना शासनाच्या सर्व विभागांना देण्यात येतील काय ?

सभापती महोदय, मी आपणास माझ्याकडे असलेले शासनाचे एक कॅलेंडर दाखवितो. ते कॅलेंडर या शासकीय प्रेसमध्ये छापण्यात आले आहे. त्या कॅलेंडरची फोर कलर छपाई बाहेरील प्रेसमध्ये देखीलमध्ये होणार नाही इतक्या चांगल्या दर्जाची आहे. विधिमंडळाचे अधिवेशन सुरु असो वा निवडणुकीचे काम असो या प्रेसमधील कर्मचारी नेहमी 24 तास काम करीत असतात. तेव्हा त्यांना चांगल्या प्रकारच्या सुविधा पुरविण्यात येतील काय ?

सभापती महोदय, मागील पुरवणी मागण्यांमध्ये या प्रेसकरिता अत्याधुनिक यंत्रणा देण्यात येतील असे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी. माझा शेवटचा प्रश्न आहे. पुणे येथील येरवडा प्रेस आणि फोटोझिंको मुद्रणालयांमध्ये अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात येतील काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाबाबत सांगू इच्छितो की, प्रेसच्या देखरेखीचे काम सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. तेव्हा ज्या काही त्रुटी असतील त्याबाबत एक महिन्याच्या आत निश्चितपणे कार्यवाही करुन सर्व गोष्टींची पूर्तता करुन सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन महिन्यात कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया पूर्ण करावी असे सांगितले. कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया तीन महिन्यात होणार नाही. परंतु ती प्रक्रिया सहा महिन्यात पूर्ण केली जाईल. या वर्षी त्या प्रेसमध्ये 19 संगणक, 4 प्रिंटर्स आणि वायर्स, मल्टीफोल्डींग यंत्रणा खरेदी केलेली आहे. ही प्रेस चालू रहावी अशी शासनाची मानसिकता आहे. परंतु यामध्ये कॉस्ट फॅक्टर महत्वाचा आहे. प्रेसमध्ये असलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या आणि तेथे किती काम होईल याचा विचार करुन बाहेरुन प्रिंटींग करुन घेण्यात येते. पुरवणी मागण्यांमध्ये निधीची तरतूद झाल्यास या प्रेसमध्ये जास्तीत जास्त यंत्रणा देण्याचा प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, अनेक वर्षापासून त्या प्रेसमध्ये कर्मचाऱ्यांची भरती झालेली नाही. जे कर्मचारी निवृत्त झाले त्यांची रिक्त पदे भरण्यात आलेली नाहीत. प्रेसमधील कालबाह्य यंत्रणा झालेली असताना तेथे नवीन अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात आलेली नाही. शासकीय प्रेस असूनही बाहेरुन प्रिंटींग करुन घेण्यात येते. माझे प्रश्न आहेत की, प्रेसमध्ये नवीन कर्मचाऱ्यांची भरती करण्यात येईल काय, तेथे अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात येईल काय, ही प्रेस शासन बंद करणार की चालू ठेवणार आहे ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, ही प्रेस चालू ठेवण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.मोहन जोशी यांनी अतिशय पोटतिडिकीने प्रश्न मांडले. परंतु माननीय मंत्री महोदयांकडून अपेक्षित उत्तरे मिळाली नाहीत. एक उभरते नेतृत्व म्हणून राज्य त्यांच्याकडे पाहत आहे. ही प्रेस चालू ठेवण्यात येईल काय, त्या प्रेसमध्ये अत्याधुनिक यंत्रणा बसविण्यात येतील काय, राज्य शासनाची जी काही छपाई होते ती या प्रेसमधून करण्यात येईल काय याबाबत मंत्री महोदय ठोस उत्तर देतील काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारले त्याचे मी पॉईन्टेड उत्तर देण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही प्रेस बंद करण्याचा शासनाचा विचार नाही. जसा निधी उपलब्ध होईल त्याप्रमाणे पुणे प्रेसमध्ये यंत्रणा उभारण्यासाठी प्राधान्य दिले जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोल्हापूर जिल्हयातील भूदरगड तालुक्याला वीरांची व संताची भूमी असा नावलौकिक असताना सदरहू तालुका पर्यटन विकासात मागे पडणे

मु. शी. : कोल्हापूर जिल्हयातील भूदरगड तालुक्याला वीरांची व संताची भूमी असा नावलौकिक असताना सदरहू तालुका पर्यटन विकासात मागे पडणे या संबंधी सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पर्यटन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोल्हापूर जिल्ह्यातील भूदरगड हा तालुका पर्यटन विकासात मागास राहिल्याचे निदर्शनास येणे, या तालुक्यात दोन ऐतिहासिक किल्ले, तीन संतांच्या समाध्या आणि स्वातंत्र्यलढ्यात हुतात्म्य पत्करलेले सात वीर, अशी वीरांची आणि विद्वानांची भूमी असा नावलौकिम असणारा तालुका असूनही येथे पर्यटन विकास आणि औद्योगिक विकास न होणे, तसेच येथील महत्त्वाच्या धार्मिक स्थळांचाही विकास होणे आवश्यक असणे, परंतु याकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याने हा तालुका विकासापासून वंचित राहणे, येथील किल्ले, समाध्या, धार्मिक स्थळे यांचा विकास करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका."

श्री. रणजित कांबळे (पर्यटन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर जिल्ह्यातील भूदरगड तालुका हा पर्यटन आणि धार्मिक क्षेत्र यादृष्टीने महत्वाचा आहे. या भूदरगड तालुक्यामध्ये प्रसिध्द मौनीबाबा विद्यापीठ आहे. तसेच भूदरगड आणि रांगणा असे दोन किल्ले आहेत. या तालुक्यामध्ये तीन संतांच्या समाध्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराज मौनी बाबांचे दर्शन घेऊन गेले असा उल्लेख इतिहासामध्ये आहे. बाळू मामा म्हणजे जेथे अदमापूरचे संस्थान आहे तेथे दर अमावस्येच्या दिवशी एक लाख भाविक येतात. असा वेगवेगळ्या कारणाने हा तालुका महत्वाचा असताना सुध्दा या तालुक्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास व्हावा अशी कोणत्याही प्रकारची उपाय योजना नाही.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील....

लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, भूदरगड किल्ल्याच्या विकासावर आतापर्यंत 27 लाख रुपये खर्च केले आहेत. महोदय, भूदरगड तालुका महत्त्वाचा तालुका आहे. तो तीर्थक्षेत्रामध्ये आहे. भूदरगड तालुका पर्यटन स्थळांमध्ये समाविष्ट करुन गडहिंग्लज तालुक्यातील सामानगडाचा जसा विकास केला आहे त्याच धर्तीवर भूदरगडचा विकास करण्यात येईल काय ?

तसेच दुसरी बाब अशी की, 20 वर्षांपूर्वी औद्योगिक विकासाच्या नावाखाली भूदरगड तालुक्यातील आकुर्डे भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी घेण्यात आल्या. परंतु अजूनपर्यंत त्यांना भूसंपादनाचा मोबदला मिळाला नाही. आंदोलन केल्यानंतर त्यांच्या जमिनीची किंमत 7-10 लाख रुपये हेक्टर ठरविली आहे. परंतु ती रक्कम अजून त्यांना मिळाली नाही. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, खरोखरच त्या भागात एमआयडीसी उभारण्यात येणार आहे काय ? नसल्यास, ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी एमआयडीसीच्या नावाखाली संपादित केल्या आहेत त्यांना त्या परत करणार काय ?

श्री.रणजित कांबळे : महोदय, भूदरगड किल्ला हा ऐतिहासिक किल्ला आहे. हा केंद्र सरकारच्या पुरातत्व विभागाच्या अखत्यारीत येतो. 13 व्या वित्त आयोगामध्ये 2011-12 या वर्षात या किल्ल्याच्या विकासाचा प्रस्ताव पाठविला होता. केंद्राने 2011-12 मध्ये 2 कोटी रुपये दिले होते. तसेच 2013-14 मध्ये 1 कोटी रुपये आणि 2014-15 मध्ये 1 कोटी अशा प्रकारे 4 कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. राज्य सरकारचा या संदर्भातील अहवाल केंद्र सरकारकडे गेला आहे. त्या अहवालावर केंद्रामध्ये त्रुटींची तपासणी करण्याचे काम सुरु आहे. तपासणीची प्रक्रिया जवळपास संपली आहे. माझ्या माहितीनुसार तो अहवाल आता गुजरात राज्यातील कार्यालयाकडे पाठविला आहे. भूदरगड किल्ल्याच्या विकासासाठी 1 महिन्याच्या आत 4 कोटी रुपये निश्चितपणे विकासासाठी मिळणार आहेत. शिवाय राज्याच्या पर्यटन विभागाने प्रत्येक जिल्ह्याला जिल्हा पर्यटन आराखडा तयार करण्यास सांगितले आहे. त्यानुसार कोल्हापूर जिल्ह्याचा प्लॅन आला आहे. या तालुक्याचा 13.5 कोटी रुपयांचा प्रस्ताव आहे. आपल्या जिल्ह्याचा एकंदरीत प्लॅन 1700 कोटी रुपयांचा आहे. प्रत्येक जिल्ह्याचा प्लॅन आल्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधान्याने कोणती कामे घ्यावीत हे ठरवून दिल्यानंतर राज्याचा प्लॅन ठरविणार आहोत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने विकासाची कामे करणार आहोत.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे....

महोदय, सन्माननीय सदस्यांनी एमआयडीसी बाबत विचारणा केली. हा विषय उद्योग विभागाशी निगडित आहे. माझ्या माहितीनुसार एमआयडीसीसाठी 52 हेक्टर जमिनीच्या भूसंपादनाची प्रक्रिया झाली आहे. भूसंपादनाबाबत सेक्शन-4, सेक्शन-6 ची प्रक्रिया झाली आहे. सन्माननीय सदस्यांना या विषयी सविस्तर माहिती हवी असल्यास उद्योग विभागाकडून या बाबतची माहिती घेऊन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, 4 कोटी रुपये लवकरात लवकर मिळण्यासाठी सरकार पाठपुरावा करेल काय ?

श्री.रणजित कांबळे : होय.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मतिमंद मूकबधिर आणि अपंगांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या शाळांमधील शिक्षक सेवानिवृत्ती वेतनापासून वंचित राहणे

मु. शी. : मतिमंद मूकबधिर आणि अपंगांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या शाळांमधील शिक्षक सेवानिवृत्ती वेतनापासून वंचित राहणे, यासंबंधी डॉ.सुधीर तांबे, चरणसिंग सप्रा, मितेश भांगडिया, विनोद तावडे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मतिमंद मूकबधिर आणि अपंगांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांची सेवानिवृत्तीसाठी सेवा विचारात घेताना, ती संस्था विनाअनुदानित असतांना झालेली सेवा ग्राह्य धरण्यात येत नसल्याने अनेक शिक्षक सेवानिवृत्ती वेतनापासून वंचित असणे, या संस्थांच्या शाळांमधील शिक्षकांना निवृत्त होताना शिक्षकांना सेवानिवृत्ती वेतन योजनेचा लाभ मिळतो, परंतु या शिक्षकांची संस्था विनाअनुदानित असतांना झालेली सेवा या योजनेसाठी ग्राह्य धरली जात नसणे, मात्र, शालेय शिक्षण विभागाच्या अखत्यारितील शाळांमधील शिक्षकांची सेवानिवृत्त होताना त्यांची विनाअनुदानित शाळेतील सेवा वेतन निश्चितीसाठी, वेतन वाढीसाठी उपदानासाठी व सेवानिवृत्ती वेतनासाठी ग्राह्य धरली जाते, परिणामी, मतिमंद, मूकबधिर आणि अपंगांसाठी काम करणाऱ्या शाळांमधील शिक्षकांमध्ये असंतोष निर्माण होणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

डॉ.सुधीर तांबे : सभापती महोदय, राज्यात 750 शाळांच्या माध्यमातून अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम केले जाते. या शाळांना सुरुवातीला विनाअनुदानित तत्त्वावर मान्यता देऊन 5-10 वर्षांनंतर त्या शाळांना अनुदान सुरु केले जाते. इतका प्रदीर्घ काळ विनाअनुदानित शाळांमध्ये काम करीत असताना त्या शाळांतील शिक्षकांना वेतन मिळत नाही. एका बाजूला त्यांना वेतन मिळत नाही आणि दुसऱ्या बाजूला सेवानिवृत्ती वेतनासाठी विना अनुदान काळातील त्यांची सेवा सुध्दा ग्राह्य धरण्यात येत नाही. त्यामुळे अनेक शिक्षक सेवानिवृत्ती वेतनापासून वंचित राहत आहेत. मुळात वेतनाच्या बाबतीत त्यांच्यावर मोठा अन्याय होत असताना दुसऱ्या बाजूला सेवानिवृत्ती वेतनाच्या बाबतीत सुध्दा त्यांच्यावर अन्याय होत आहे. राज्यात शालेय शिक्षण विभागात शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विनाअनुदानित काळातील सेवा ग्राह्य धरण्याचे तत्वता मान्य झालेले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या धर्तीवर सामाजिक न्याय विभाग सुध्दा अपंगांसाठी काम करणाऱ्या संस्थांच्या शिक्षकांची विनाअनुदानित काळातील सेवा ग्राह्य धरण्याचा निर्णय घेणार काय ?

श्री.सचिन अहिर : महोदय, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात नमूद केले आहे की, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळा खाजगी संस्थांना देण्याचा प्रयत्न केला जातो. वास्तविक पाहता या संस्थांनी सेवाभावी वृत्तीने काम करण्याचा प्रयत्न केला पाहिजे अशी अपेक्षा असते. अनुदान वाढविण्याचा प्रश्न असेल तर निश्चितपणे अनुदान वाढविण्याचा विचार करता येईल. परंतु सेवानिवृत्तीबाबतचा असा कोणताही निर्णय घेता येणार नाही.

श्री.विक्रम काळे : महोदय, हा विषय राज्यात कार्यरत असलेल्या अपंग शाळांतील शिक्षकांच्या बाबतीत आहे. परवा अपंगांच्या विषयी नियम 260 अन्वये उपस्थित केलेल्या प्रस्तावाला माननीय सामाजिक न्याय मंत्र्यांनी सविस्तर उत्तर दिले. त्यांनी उत्तर देताना सांगितले की, सरकार अपंगांच्या प्रश्नाकडे डोळसपणे बघत आहे. परंतु आता माननीय राज्यमंत्री सांगत आहेत की, या शिक्षकांच्या सेवानिवृत्तीचा विचार केला जाणार नाही. माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा या ठिकाणी उपस्थित आहेत. त्यांनी कबूल केले आहे की, खाजगी शाळा असो किंवा सरकारी शाळा असोत, त्या शाळांतील शिक्षकांना विना अनुदान काळातील सेवेचा लाभ दिला जातो.

नंतर श्री.बरवड.....

अशुद्धीत मत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

आपण अपंगांनाच का वंचित ठेवले आहे ? अपंगांच्या शाळेमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांची विनाअनुदान काळात जी सेवा झालेली आहे ती वरिष्ठश्रेणी व निवडश्रेणीसाठी ग्राह्य धरण्याबाबत पुढील अधिवेशनापूर्वी शासन निर्णय काढणार का ? या अपंगांच्या शाळांना अनुदान देण्याची त्यांची मागणी अनेक वर्षापासूनची आहे. 125 शाळांचे मूल्यांकन होऊन, तपासणी होऊन, वर्गीकरण होऊन, प्रस्ताव शासनाकडे आलेला आहे. त्याला अनेक वर्षे झालेली आहेत. त्यांना अनुदान देण्याच्या बाबतीत शासन कधी निर्णय घेणार ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या सुरुवातीच्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, जे विनाअनुदानित किंवा कायम विनाअनुदानित शिक्षक असतात त्यांची सेवाज्येष्ठता काऊंट करीत नाही. 2002 मध्ये मंत्रिमंडळाचा निर्णय झाला होता. आता आपण 737 संस्थांना ग्रॅट देतो. सर्वात जास्त संस्थांना आपल्या राज्यात ग्रँट दिली जाते. तरी सुध्दा जास्त संस्थांना अनुदान देण्याच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांचे प्रयत्न आहेत आणि आमचे सुध्दा खूप प्रयत्न आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागविलेला आहे. वित्त विभागाने सुध्दा बराच क्लिअरन्स केलेला आहे. हा प्रस्ताव मंत्रिमंडळासमोर गेल्यानंतर निश्चितपणे शंभरपेक्षा जास्त संस्थांना अनुदान मिळेल असा विश्वास आहे.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, ज्या अनुदानित कार्यशाळा आहेत तेथील कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतन दिले जात नाही, हे खरे आहे का, असल्यास त्यांना निवृत्तीवेतन केव्हा देणार ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, या बाबतीत असे धोरण आहे की, ज्या अनुदानित विशेष शाळा आहेत त्यांनाच निवृत्तीवेतन देतो, जे वर्कशॉप आहेत त्यांना निवृत्तीवेतन देत नाही.

श्री. मितेश भांगडिया : सभापती महोदय, अपंग संस्थांना दोन वर्षानतर अनुदान द्यावयास पाहिजे. कारण अपंगांसाठी 1995 स्वतंत्र केंद्रीय कायदा अस्तित्वात आहे. त्यानुसार अपंगांचे शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसन करण्याची संपूर्ण जबाबदिरी शासनाची आहे. परंतु शासन ही जबाबदारी स्वीकारत नसून त्यांना कायम विनाअनुदानित तत्वाचे धोरण लागू करुन या अपंग संस्थांना मागील दहा बारा वर्षापासून अनुदान दिलेले नाही. तरी या केंद्रीय कायद्यानुसार या संस्थांना लगेच अनुदान देणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, 1984 पूर्वीच्या 100 टक्के संस्था अनुदानित आहेत. 1984 नंतर विना अनुदानित संस्था सुरु केल्या. आश्रमशाळेप्रमाणे 1984 पूर्वी अनुदानासह या संस्थांना मान्यता देण्यात येत होती. 1990 पासून विनाअनुदानित तत्व मान्य केले आहे. 1995 मध्ये अपंगांचा कायदा आला आणि त्यामध्ये नोंदणी प्रमाणपत्र कंपल्सरी करण्यात आले. त्यानंतर कायमस्वरुपी विनाअनुदानित हे नवीन तत्व 2004 मध्ये आले. जो केंद्रीय कायदा आहे त्यामध्ये संस्था चालू करावयाची असेल तर लायसन्स दिले पाहिजे असे म्हटले आहे. त्यामध्ये ग्रॅट द्यावी असे म्हटलेले नाही.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : श्वेतकुष्ठ असलेल्या रुग्णांना संजय गांधी किंवा श्रावणबाळ निराधार योजनेचा लाभ मिळण्याची होत असलेली मागणी

मु.शी. : श्वेतकुष्ठ असलेल्या रुग्णांना संजय गांधी किंवा श्रामवणबाळ निराधार योजनेचा लाभ मिळण्याची होत असलेली मागणी यासंबंधी सर्वश्री अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात श्वेतकुष्ठ (कोड) या आजाराचे प्रमाण लोकसंख्येच्या 4 ते 8 टक्क्यांपर्यंत असणे, श्वेतकुष्ठ रुग्णांमध्ये महिला रुग्णांचे प्रमाण 67 टक्के इतके असणे, हा रोग 55 टक्के रुग्णांना वय वर्षे 10 ते 20 वयोगटात होणे, श्वेतकुष्ठ रुग्णास मधुमेह, उच्च रक्तदाब, केस गळणे, कर्ण बधिरता, मानसिक आजारांसारख्या रोगांची लागण होणे, राज्यात 14 लक्ष महिला आणि 8 लक्ष मुली या आजाराने त्रस्त असल्याचे एका खाजगी संस्थेच्या सर्वेक्षणात उघड होणे, महिला आणि पुरुष असे सुमारे 50 लाखांहून अधिक रुग्ण या आजाराने पीडित असणे, रोगाविषयीच्या गैरसमजामुळे समाजाने या रुग्णांना बहिष्कृत करण्याचे प्रकार घडणे, श्वेतकुष्ठ रुग्णांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी सामाजिक, आर्थिक मदत शासन स्तरावरुन करण्याची आवश्यकता, या रुग्णांसाठी संजय गांधी किंवा श्रावणबाळ निराधार योजनांचा लाभ या रुग्णांना देण्यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली मागणी, याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुरेश शेट्टी (सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मूळ लक्षवेधी सूचना ही श्वेतकुष्ठ असलेल्या महिला अथवा पुरुषांच्या बाबतीत उपाययोजना करणे, उपचार करणे याच्याशी संबंधित नसून संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत त्यांचा समावेश केला जावा अशा प्रकारची ही लक्षवेधी सूचना आहे. म्हणून मी विनंती करतो की, ही लक्षवेधी सूचना विशेष सहाय्य विभागाकडे वर्ग करावी.

उप सभापती : ही लक्षवेधी सूचना नंतर घेण्यात येईल.

... 6 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अकोला जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांना गेल्या एक वर्षापासून वाढीव वेतनातील फरकाची रक्कम प्राप्त न होणे

मु. शी. : अकोला जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांना गेल्या एक वर्षापासून वाढीव वेतनातील फरकाची रक्कम प्राप्त न होणे यासंबंधी श्री. गोपीकिसन बाजोरिया, डॉ. रणजित पाटील, ॲड. अनिल परब, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. गोपीकिसन बाजोरिया (अकसेलस तथा वाशिम तथा बुलढाणा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बालविकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अकोला जिल्ह्यातील 1200 पेक्षा अधिक अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांना गेल्या एक वर्षापासून वाढीव वेतनातील फरकाची रक्कम प्राप्त न होणे, 55 लक्ष रुपये रक्कम शासनाकडे थकीत असणे, सन 2012 पूर्वीच्या 6 ते 7 महिन्याच्या वाढीव वेतनातील फरकाची रक्कम देण्याचे शासनातर्फे जाहीर करणे, त्यानंतर अकोला जिल्ह्यातील बाळापूर तालुक्यात अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना वाढीव वेतनातील फरकाची रक्कम देण्यात येणे, मात्र उर्वरित सहा तालुक्यांमध्ये ही रक्कम देण्यात न येणे, कुपोषण मुक्तीसाठी झटणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना हक्काचे वेतन महिला व बालविकास विभागाला देता न येणे, त्यामुळे अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांमध्ये निर्माण झालेली चीड, असंतोषाची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

प्रा. वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...7 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गोपीकिसन बाजोरिया : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अंगणवाडी आणि मिनी अंगणवाडीच्या संदर्भात आहे. निवेदनामध्ये असे म्हटले आहे की, 1385 अंगणवाडी केंद्रे आहेत आणि त्यामध्ये 2558 अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस कार्यरत आहेत. 1572 अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना वेतनातील फरकाची पूर्ण रक्कम देण्यात आलेली आहे. लक्षवेधी सूचना लागल्यानंतर तत्काळ अनेक ठिकाणी मदत करण्यात आली याबद्दल मी मंत्री महोदयांचे स्वागत करतो.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गोपीकिसन बाजोरिया.....

986 अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना वाढीव मानधनाची थकबाकी अनुदान उपलब्ध नसल्यामुळे त्याची पूर्तता करता येऊ शकलेली नाही असे निवेदनात नमूद केलेले आहे. या अंगणवाडी सेविकांची वाढीव मानधनाची रक्कम किती आहे आणि किती दिवसामध्ये ती दिली जाणार आहे ? शासन मायनसमध्ये जाऊन या मानधनाची रक्कम देणार आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यातील 5 तालुक्यातील अंगणवाडी सेविका आणि मदतनिसांना मार्च महिन्यामध्ये मानधन दिलेले आहे. 986 अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या वाढीव मानधनाची रक्कम 99.02 लाख रुपयांची रक्कम देणे बाकी होती. परंतु ती थकबाकी कालच अदा केलेली आहे. त्यांना ती काल मिळाली असावी. त्यामुळे हा प्रश्न संपलेला आहे. या संदर्भात विभागाने वित्त विभागाच्या मान्यतेने दोन जी.आर.इश्यू केलेले आहेत. त्यानुसार विभागाला मायनस बीडीएस काढता येतो.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अकोला जिल्ह्यामध्ये अंगणवाडी सेविकांमार्फत व संबंधित अधिकाऱ्यांमार्फत मूठभर धान्य ही योजना राबविली गेली. संपूर्ण राज्यात केवळ अकोला जिल्ह्यात स्वयंस्फूर्तीने ही योजना राबविण्यात आली. या योजनेमार्फत 100 क्विंटल धान्य व इतर सामुग्री जमा करुन 10 हजार बालकांना कुपोषणातून मुक्त केलेले आहे. हे सर्व लोकांच्या सहभागातून शक्य झालेले आहे. तरी देखील बीडीएसची रक्कम मिळत नाही. बीडीएस मायनस आहे. वास्तविक अशा लोकांचे शासनाने कौतुक केले तर इतर लोकांचाही उत्साह वाढू शकतो. इतर लोकांना त्यातून बळ मिळते. जी मुले कॉन्व्हेण्ट स्कूलमध्ये जातात त्यांना ई-लर्निंगद्वारे शिकविता आले पाहिजे. त्याचे प्रस्ताव शासनाकडे आलेले आहेत. शासन या प्रस्तावाच्या अनुषंगाने विशेष बाब म्हणून काही आर्थिक मदत करणार आहे का ?

प्रा.वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्यांनी या लक्षवेधी सूचनेशी संबंधित नसलेला प्रश्न विचारलेला आहे. ही बाब तपासून पाहून सकारात्मक दृष्टीकोनातून धोरणात्मक निर्णय घेतला जाईल. ज्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांनी चांगले काम केलेले आहे त्यांचा माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते सत्कार करण्याचा कार्यक्रम या वर्षापासून सुरु केलेला आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, या अंगणवाडी सेविकांना दरवर्षी भाऊबीज दिली जाते. परंतु ती वेळेवर दिली जात नाही. पुरवणी मागण्यांद्वारे तरतूद केल्यानंतर भाऊबीजेची रक्कम दिली जाते. त्यामुळे त्यांना भाऊबीजेपूर्वी किंवा भाऊबीजेच्या दिवशी ही रक्कम दिली जाईल काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : होय.

श्रीमती विद्या चव्हाण : संपूर्ण राज्यात अंगणवाडी सेविका चांगले काम करीत आहेत. त्यांना देण्यात येणारे मानधन पुरेसे नाही. त्यामुळे त्यांना केवळ भाऊबीज देऊन भागणार नाही. तर त्यांच्या मानधनामध्ये वाढ केली पाहिजे. ते मानधन वाढविण्याचा प्रयत्न शासन करणार आहे का ?

प्रा.वर्षा गायकवाड : केंद्र शासनाच्या माध्यमातून अंगणवाडी सेविकांना 1500 रुपये व मदतनिसांना 750 रुपये मानधन वाढविलेले आहे. राज्य शासनाच्या माध्यमातून 2010 मध्ये त्यांचे मानधन वाढविण्याचा प्रयत्न केलेला आहे. केंद्र शासनाला शासनामार्फत विनंती करण्यात येईल. कारण मानधनाबरोबरच त्यांच्या इतरही मागण्या आहेत. त्यासंबंधीही प्रयत्न केले जातील.

<u>लक्षवेधी सूचना क्रमांक 11 बाबत</u>

उप सभापती : आजच्या कामकाज पत्रिकेत क्रमांक 11 वर दाखविण्यात आलेली लक्षवेधी सूचना सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आणि संबंधित माननीय नगरविकास राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव सभागृहात उपस्थित नसल्यामुळे पुढे ढकलण्यात येत आहे.

अशुद्धीत प्रत / शोधनीसाठी नाही

पृ. शी. : मुंबई व पुणे येथील पोलीस वसाहतींची झालेली दुर्दशा

मु. शी. : मुंबई व पुणे येथील पोलीस वसाहतींची झालेली दुर्दशा यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री चरणसिंग सप्रा, मोहन जोशी, सुभाष चव्हाण, अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती अलका देसाई,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माहीम (मुंबई) येथील पोलीस वसाहतीची झालेली दुर्दशा, तसेच, नायगांव, भोईवाडा, भायखाळा व पुणे येथील ब्रिटिशकालीन पोलीस वसाहतीमध्ये सोयीसुविधा, दुरुस्तीची कामे अपूर्ण असणे, घर भाड्यापोटी माहीम येथील इमारतीतील निवासी पोलिसांकडून वर्षाला साडेसहा कोटीची वसुली केली जात असून या इमारतींच्या दुरुस्तीवर आतापर्यंत केवळ साडेचार कोटी रुपयेच खर्च करण्यात आलेले असणे, दुरुस्तीच्या नावाखाली मोठ्या रकमांची देयके काढून निधीचा दुरुपयोग करण्यात येणे, पोलिसांच्या घरांचा प्रश्न सोडविण्यासाठी तसेच त्यांच्या कल्याणासाठी सन 1974 मध्ये पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाची स्थापना करण्यात आली. मात्र, स्थापनेपासून आजपर्यंत या महामंडळाने फक्त 28 हजार 527 निवासस्थाने उपलब्ध करुन दिलेली असणे, राज्यात एक लाखाहून अधिक पोलिसांना घरेच उपलब्ध नसणे, त्यामुळे पोलिसांच्या निवासस्थानाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून याबाबत शासनाकडून तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

4.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या लक्षवेधीमार्फत महत्वाच्या विषयावर शासनाचे लक्ष आकर्षित करण्याची मला संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे. या लक्षवेधी सूचनेचे निवेदन आज सकाळी 10.30 वाजता मला प्राप्त झालेले आहे. सन्माननीय सदस्यांना लक्षवेधीची निवेदने वेळेवर मिळाली तर त्यावर अभ्यास करुन निवेदनात असलेल्या त्रुटी शासनाच्या निदर्शनास आणता येतील. या लक्षवेधीबाबत आपल्याकडूनही माझी अपेक्षा आहे. या प्रश्नाबाबत सन्माननीय सदस्यांबरोबर आपणही वेळोवेळी आपली भूमिका मांडलेली आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त...

सभापती महोदय, लोकप्रतिनिधी आणि पोलीस कर्मचारी यांच्या विषयी असे म्हटले जाते की, हे थँकलेस जॉब करीत आहेत. यांनी 10 कामातील 9 कामे चांगली केली आणि एखादे काम राहिले तर त्या एकाच कामासंबंधी लोक टीका करीत राहातात अशी समाजाची वृत्ती आहे. खरे तर पोलिसांच्या ज्या दैनंदिन समस्या आहेत त्याकडे आपण लक्ष देत नाही. पोलिसांचे राहणीमान सुधारले तर त्यांच्या काम करण्याच्या क्षमतेमध्ये निश्चितपणे सुधारणा होईल आणि शासनाला त्याचा फायदा होईल. पोलिसांच्या समस्या सोडविण्याकडे शासनाने जेवढे लक्ष द्यायला पाहिजे तेवढे ते दिले गेले नाही असे मला येथे खेदाने नमूद करावेसे वाटते.

पोलिसांच्या समस्या दूर करण्यासंबंधी या सदनामध्ये विविध आयुधांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात आले. दिनांक 9 एप्रिल 2010, 13 एप्रिल 2010, 3 एप्रिल 2012, 18. डिसेंबर 2012, 26 जुलै 2011, 2 ऑगस्ट 2011 या तारखांना पोलिसांच्या समस्या विषयी या सभागृहामध्ये चर्चा झालेली आहे. माननीय उप सभापती महोदय, पोलिसांच्या समस्या दूर करण्यासंबंधी आपण देखील शासनाला सूचना केलेल्या होत्या. परंतु पोलिसांची जी परिस्थिती त्यावेळी होती ती आज देखील तशीच आहे. तेव्हा या पोलिसांच्या वसाहतींच्या संदर्भात शासनाने काही तरी ठोस धोरण ठरविले पाहिजे अशी माझी या सदनाच्या सर्व सन्माननीय सदस्यांच्या माध्यमातून माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे.

माझे दोन-तीन महत्वाचे प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित करणार आहे. पोलिसांच्या वसाहती ह्या 100 वर्षापेक्षा जुन्या झालेल्या आहेत. माहीम येथील पोलीस वसाहतींची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. तशा प्रकारची दुर्दशा राज्यातील इतर पोलीस वसाहतींची देखील झालेली आहे. या वसाहती दुरुस्त करण्यासाठी शासनाकडे तेवढा निधी नाही. सन 2013-14 मध्ये शासनाचे धोरण हे पोलिसांची पूर्वीची बिकट परिस्थिती बदलणारे राहाणार आहे की पूर्वी सारखेच राहाणार आहे ? या प्रश्नाबाबत मी मंत्री महोदयांकडून सकारात्मक उत्तराची अपेक्षा करीत आहे.

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण गिरणी कामगारांच्या संदर्भात गृहनिर्माण कायद्यामध्ये बदल केलेला आहे. तशा पध्दतीने कायद्यामध्ये बदल करुन पोलीस कर्मचा-यांसाठी गृहनिर्माणासंबंधीचे धोरण अवलंबिण्यात येणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त...

माझा तिसरा प्रश्न असा आहे की, पोलीस हौसिंगसाठी शासनाकडे किती जमीन आहे ? या जमिनीवर अतिक्रमण होऊ नये याकरिता या जमिनीच्या संरक्षणासाठी शासनाने काय पावले उचलली आहेत ? माझ्या तिन्ही प्रश्नाचे माननीय मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर द्यावे अशी माझी विनंती आहे.

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : पोलीस कर्मचा-यांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्याचे शासनाचे अनेक वर्षापासूनचे धोरण राहिलेले आहे. राज्यामध्ये 86400 निवासस्थाने उपलब्ध आहेत. मुंबईमध्ये 21275 निवासस्थाने उपलब्ध आहेत. दरवर्षी या नवीन निवास्थानांसाठी आणि दुरुस्तीसाठी 100 कोटी रु.ची तरतूद केली जाते. ही निवासस्थाने अद्यावत आणि सुस्थितीत रहावीत असा शासन नेहमी प्रयत्न करीत असते. सन 2009मध्ये एक जी.आर. काढून एफ.एस.आय.मध्ये वाढ करण्याचा प्रयत्न केला. त्यामध्ये काही कमतरता आहेत. तो जी.आर. बदलण्याचा शासनाचा प्रयत्न राहाणार आहे.

सन्माननीय सदस्यांनी निवासस्थानासाठी शासनाकडे किती जमीन उपलब्ध आहे असा प्रश्न विचारला. त्यासंबंधीची माहिती एकत्रित केलेली आहे. मुंबईमध्ये 1 लाख 40 हजार 446 स्क्वेअर मीटर जागा भविष्यातील निवासस्थानांसाठी उपलब्ध आहे. राज्यामध्ये 11 हजार हेक्टर पेक्षा अधिक जागा उपलब्ध आहे. सन्माननीय सदस्यांनी माहीम येथील वसाहतीचा प्रश्न उपस्थित केला. 100 वर्षापूर्वीच्या वसाहती आहेत. मूळ मालकीसंबंधीचे वाद चालू आहेत. म्हाडाची मालकी, पोलिसांची मालकी असे वाद चालू आहेत. हे वाद संपविण्याच्या दृष्टीने एक कार्यक्रम आम्ही हातामध्ये घेत आहोत. या जागांवर अतिक्रमण होऊ नये म्हणून दुरुस्तीमधून काही निधी बाजूला ठेवून त्या ठिकाणी बोर्ड लावण्याची मोहीम उघडण्यात येत आहे. तसेच संबंधित पोलीस स्टेशनच्या पीआयला त्याच्या पोलीस स्टेशनअंतर्गत किती जागा आहे

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-12... श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील...

याची माहिती आता पोलीस महासंचालक व पोलीस आयुक्त कार्यालयातून देण्याची व्यवस्था केली जाते, जेणेकरुन संबंधित पोलीस निरीक्षकांचे लक्ष कायमपणे त्या जागेवर राहील.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, शासनाचे धोरण हे या वसाहतींची बिकट अवस्था बदलणारे असणार आहे की पूर्वीचेच असणार आहे? ज्या प्रमाणे गिरणी कामगारांसाठी नियमात बदल केले तसे बदल या पोलीस वसाहतीतील पोलीस कर्मचाऱ्यांकरिता केले जातील काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी यापूर्वी उत्तर दिले आहे. यावर्षी अर्थसंकल्पात 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. नवीन इमारती बांधणे व जुन्या इमारतींची दुरुस्ती करणे याकरिता ही रक्कम खर्च केली जाईल. 2009 च्या जी.आर.मध्ये काही त्रुटी आहेत. ज्यामुळे या वसाहती विकसित करण्यास पुरेसा प्रतिसाद मिळू शकला नाही. त्यावेळी असे ठरले होते की, पीपीपी नुसार या वसाहतींचा पुनर्विकास करावा. शासनाने आता स्वत:च या वसाहती विकसित करायचे ठरविले किंवा म्हाडामार्फत विकसित करावयाचे ठरविले तर एफएसआयची सवलत त्यांना उपलब्ध होईल, त्यादृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न वेगळा आहे. त्या संदर्भातील माहिती उपलब्ध झाल्याशिवाय मला काही भाष्य करता येणार नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या अर्थमंत्र्यांनी या वर्षी अर्थसंकल्पात 100 कोटी रुपये पोलिसांच्या गृहनिर्माणासाठी तरतूद केल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. सभापती महोदय, आपण ठाणे जिल्हयाचे प्रतिनिधीत्व करीत आहात. ठाणे जिल्हयातील वर्तकनगर पोलीस स्टेशनच्या हद्दीमध्ये असलेल्या पोलीस वसाहतीची अवस्था अतिशय बिकट झाली आहे.

उप सभापती : हा विषय मी 100 वेळा उपस्थित केला आहे. तेथे नवीन इमारती न होता स्मारके होतील अशी वेळ आलेली आहे. त्यामुळे हा प्रश्न उपस्थित करुन काही होणार नाही.

श्री.नरेंद्र पाटील : सभापती महोदय, आपण पीठासीन अधिकारी असताना हा प्रश्न सुटत नसेल तर आम्ही मत मांडून काय होणार आहे? आपले प्रश्न सुटत नसतील तर आम्ही विचारलेले प्रश्न कधी सुटणार आहेत?

उप सभापती : मी विचारलेल्या प्रश्नाचे उत्तर कधी मिळेल याचे उत्तरही आपणच द्यावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नरेद्र पाटील : सभापती महोदय, भायखळा पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये पोलीस वसाहत होती. तेथील दोन इमारती पाडून त्या ठिकाणी ट्रॅफिक विभागाचे प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. तेथे राहणाऱ्या पोलिसांना पर्यायी जागा कुठे उपलब्ध करुन देण्यात आली?

सभापती महोदय, आज मुंबईच्या किंवा राज्यातील मोठमोठ्या शहरी भागातील जनतेचे रक्षण करण्याचे काम पोलीस अहोरात्र करीत आहेत. त्यांच्याकरिता निवासाची सोय होत नाही. मुंबई, पुणे, ठाणे, नवी मुंबई, नाशिक, कोल्हापूर अशा मोठया शहरांमध्ये पोलीस विभागाच्या माध्यमातून पोलिसांसाठी निवासस्थाने बांधण्यात येतील काय?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.नरेंद्र पाटील यांनी भायखळा पोलीस स्टेशन येथील पोलीस वसाहतीच्या संदर्भात प्रश्न विचारला आहे, त्याची माहिती निश्चितपणे पटलावर ठेवली जाईल.

राज्यातील पोलिसांना निवासस्थाने उपलब्ध करुन देण्यासाठी प्रथम जागा उपलब्ध करुन घेतली जाते. ज्या जागा ताब्यात मिळतील त्या जागांचे रेकॉर्ड बँक तयार करीत आहोत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व जागा विकसित करता येतील. 2009 च्या जी.आर.मध्ये पीपीपी मॉडेलनुसार जुन्या वसाहती विकसित कराव्यात अशा पध्दतीने निर्णय घेतला होता. आता राज्य शासनाच्या किंवा म्हाडाच्या माध्यमातून विकसित करण्याबाबत आम्ही प्रयत्नशील आहोत.

उप सभापती: ही लक्षवेधी सूचना अत्यंत महत्वाची आणि व्यापक स्वरुपाची आहे. या लक्षवेधी सूचनेबाबत माझे असे मत आहे की, या विषयाबाबत माननीय गृहमंत्री, आपण आणि संबंधित माननीय सदस्य यांची एक वेगळी बैठक हे अधिवेशन संपण्यापूर्वी बोलावू. हा प्रश्न खरोखर व्यापक आहे. मी स्वत: देखील सभागृहात अनेक वेळा या संदर्भात बोललो आहे. याबद्दल शासनाची भूमिका निगेटिव्ह आहे, सरकार अत्यंत उदासीन आहे. या संदर्भातील बैठक अधिवेशन संपण्यापूर्वी आपण आपल्याकडे घेऊ. हा विषय संपला आहे. मी आता पुढील लक्षवेधी सूचना पुकारीत आहे.

नंतर एम..1...

अशुद्धीत मत / मुद्रितशोधनासाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मला लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून एक प्रश्न विचारावयाचा आहे. नायगाव, माहिम, अंधेरी, कांदिवली या ठिकाणी खूप जागा आहे. जानुपाड्याच्या सारख्या ठिकाणी पोलीस हवालदार झोपडपट्टीमध्ये राहत आहेत. पोलीस 15-18 तास ड्युटीवर असत. त्यामुळे त्यांच्या पत्नीवर घराचा सर्व भार पडतो, त्यांच्या मुलांचे प्रश्न असतात. शासनाने या संदर्भात शंभर कोटी रूपयांची तरतूद करून सुध्दा त्यांना सुविधा मिळत नाहीत. शासनाने या संदर्भात व्यवस्थित प्लॅन केला पाहिजे. शासनातर्फे प्रत्येक पोलीस हवालदार, पीएसआय यांना भाड्याचे घर तरी उपलब्ध करून दिले पाहिजे. शासन या संदर्भात लवकरात लवकर कार्यवाही करणार आहे का ?

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, मी सभागृहाच्या वतीने आपले आभार मानतो. माझी एकच विनंती आहे की, बैठकीसाठी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना बोलवावे.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी सर्व संबंधितांना बैठकीस बोलाविणार आहे, असे सांगितले आहे.

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, हा गंभीर विषय अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. मी सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांच्या वतीने विनंती करतो की, आपण सदर महत्त्वाच्या बैठकीस माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांना उपस्थित राहण्यासाठी संदेश पाठवून ते उपस्थित राहावेत यासाठी प्रयत्न करावेत.

उप सभापती : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : शासनाकडून शेळ्या, मेंढ्यांसाठी चारा व पाण्याची कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे.

मु.शी. : शासनाकडून शेळ्या, मेंढ्यांसाठी चारा व पाण्याची कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे या संबंधी सर्वश्री. रमेश शेंडगे, किरण पावसकर, प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय पुनर्वसन व मदत कार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्या बाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर आणि संगमनेर तालुक्यात सुमारे चार लाख मेंढ्या तर 9 लाख शेळ्या असणे, गाई, म्हशी, बैल आदि जनावरांसाठी छावण्या उभारण्यात येतात, तथापि शेळ्या मेंढ्यासाठी कोणतीही उपाययोजना शासनामार्फत करण्यात न येणे, परिणामी मेंढपाळांना आपल्या मेंढ्या स्वस्तात विकण्याची आलेली पाळी, याबाबत शेळ्यामेंढ्यांसाठी चारा, पाणी याबाबत उपाययोजना करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करण्यांत येत असलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री. प्रकाश सोळंके (पुनर्वसन व मदत कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, अहमदनगर जिल्ह्यात जवळजवळ 4 लाख मेंढ्या व 9 लाख शेळ्या आहेत. राज्य शासनाने टंचाईग्रस्त भागात सर्व ठिकाणी छावण्या सुरू केलेल्या आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील टंचाईग्रस्त भागात शेळ्या, मेंढ्यासाठी कोणत्याही प्रकारचे नियोजन किंवा उपाययोजना केलेल्या नाहीत. मी सभागृहात अनेक वेळा या संदर्भात पोटतिडकीने मागणी केली आहे. परंतु, शासनाकडून अजूनही कोणत्याही प्रकारच्या विशेष सोयी-सवलती या व्यवसायाच्या बाबतीत मेंढपाळ्यांच्या, गोरगरीब शेतकऱ्यांना देण्यात आलेल्या नाहीत. मला सदर लक्षवेधी सूचनेचे निवेदन 5 सेकंदापूर्वी मिळाले आहे. त्यामुळे शासन या बाबतीत अजून सुध्दा किती उदासीन आहे, हे दिसते. निवेदनात म्हटले आहे की, कोणत्याही प्रकरची मागणी करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, मी स्वत: सभागृहात किती तरी वेळा शेळ्या, मेंढ्यांसाठी छावण्या सुरू करण्याबाबत, त्यांना चारा वाटप करण्याबाबत सांगितले आहे. त्यामुळे मेंढपाळांना, गोरगरीब शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. अनेक जिल्ह्यांत शेळ्या, मेंढ्यांची संख्या कमी होऊ लागली आहे. शेळ्या, मेंढ्या परराज्यात कत्तलखान्याकडे विकण्यासाठी नेल्या जात आहेत. आपल्या राज्यात मटणाचे दर वाढू लागले आहेत आणि त्याचे हे एकमेव कारण आहे. आपण याकडे दुर्लक्ष केले तर गोरगरीब कुटुंबाला अतिशय मोठ्या संकटाला सामोरे जावे लागणार आहे.

महाराष्ट्र शासनाकडून मोठ्या जनावरांसाठी 60 रूपये देण्यात येतात आणि छोट्या जनावरांसाठी 30 रूपये देण्यात येतात. छोट्या जनावरांच्या मध्ये देखील शेळ्या, मेंढ्यांची गणना केली जात नाही. छोट्या जनावरांसाठी सोयी-सवलती देऊन त्यांना 30 रूपये देण्यात येतात, त्यामध्ये त्यांना चारा, पाणी यांचे वाटप केले जाते. माझा प्रश्न असा आहे की, शेळ्या, मेंढ्यांना छोट्या जनावरांप्रमाणे सोयी- सवलती देणार का ?

सभापती महोदय, शेळ्या, मेंढ्यांसाठी छावण्या होऊ शकत नाहीत. एका छावणीत हजारो जनावरे म्हणजे गायी, म्हशी असतात. एका मेंढपाळाकडे 150-200 मेंढ्या असतात. त्यामुळे त्या छावणीमध्ये जाऊ शकत नाही. त्या एका ठिकाणी देखील बसून राहू शकत नाहीत. आपण जनावरे म्हणजे गायी, म्हशी छावणीमध्ये बसवून ठेवतो. तेथे संबंधित कुटुंबे देखील असतात. मेंढपाळांना शेळ्या, मेंढ्यांना फिरवावेच लागते. 6 महिने भटकंती करावी लागते. मेंढपाळ ज्या भागात भटकंती करतात, त्या भागात तीव्र दुष्काळ आहे. चराऊ कुरणे नाहीत, चारा नाही. ..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ....

मेंढ्या माती खाऊन मेल्या आहेत. त्यांचे पोस्टमार्टेम केले असता, त्यांच्या पोटात खडे, माती, दगड सापडले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या वतीने शेळ्या, मेंढ्या जास्त असलेल्या ठिकाणी 4 गावांच्या माध्यमातून एक चारा डेपो सुरू केला पाहिजे, असे मला वाटते. आपण तसे करून त्यांना 5 किलो ओला चारा, 1 किलो सुका चारा, 300 ग्रॅम पेंडेची गोळी देण्याची व्यवस्था करणार का ?

सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, मागणीच करण्यात आलेली नाही. मी अनेक वेळा या संदर्भात मागणी केली आहे. आपण म्हणत आहात की, शेळ्या, मेंढ्यांसाठी चारा छावणी सुरू करीत आहोत. अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनानुसार चारा छावणी यशस्वी होणार असेल तर सुरू करा. परंतु, तसे होणार नसेल तर ज्या ठिकाणाहून चाऱ्यासाठी मागणी येईल त्या ठिकाणी चारा वाटप करणार आहात का ? तसेच, छोट्या जनावरांप्रमाणे शेळ्या, मेढ्यांना 30 रूपये प्रमाणे अनुदान सुरू करणार आहात का ?

(नंतर श्री. भारवि ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे हे या प्रश्नासंबंधी नेहमीच आग्रही राहून पोटतिडकीने प्रश्न मांडत असतात. सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी अहमदनगर जिल्ह्यातील शेळ्या-मेंढ्यांबाबत प्रश्न उपस्थित केला आहे. अहमदनगर जिल्ह्यात अंदाजे साडेतीन लाख शेळ्या आणि नऊ लाख सोळा हजार मेंढ्या आहेत. दिनांक 19 एप्रिल 2010 च्या शासन निर्णयान्वये शेळ्या-मेंढ्यांना छावण्यामध्ये ठेवण्याची अनुमती दिलेली आहे. प्रत्येक शेळी मागे 5 रूपये अनुदान दिले जाईल असे त्यामध्ये नमूद केलेले आहे. परंतु, यात वाढ करणे गरजेचे आहे. सन्माननीय सदस्यांनी मागणी केल्याप्रमाणे ही वाढ किती प्रमाणात देता येईल त्याबाबत लवकराल लवकर निर्णय घेण्यात येईल एवढे मी त्यांना आश्वासित करू इच्छितो. आता पर्यंत मागणी करण्यात आला नाही याचा अर्थ असा आहे की, जिल्हाधिकाऱ्यांकडे शेळ्या-मेंढ्यांसाठी छावणी उघडण्याची मागणी करण्यात आलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न सभागृहात वेळोवेळी उपस्थित केलेला आहे. जिल्हाधिकाऱ्याकडे कुठल्याही संस्थेने मागणी केली तर त्यास देखील मंजुरी दिली जाईल हे मला या निमित्ताने सन्माननीय सदस्यांना सांगावयाचे आहे.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, संपूर्ण राज्यामध्ये जवळ जवळ 1 लाख 30 हजार शेळ्या व 50 हजार मेंढ्या आहेत. आज अर्धा महाराष्ट्र दुष्काळाच्या खाईत आहेत. त्यामुळे अर्ध्या भागावर विपरित परिणाम झालेला आहे. लाखो शेळ्या-मेंढ्या आपल्याला वाऱ्यावर सोडता येणार नाहीत. शेळ्या-मेंढ्यांना आपण छोट्या जनावरांमध्ये का धरत नाही, हेच मला कळत नाही. आपल्याकडे छोटी जनावरे ही कॅटेगरी आहे. त्यात आपण शेळ्या-मेंढ्यांना का धरत नाही किंवा त्या पद्धतीने त्यांना सोयी सवलती का देत नाहीत ? ज्या प्रमाणे छोट्या जनावरांना सोयी सवलती दिल्या जातात त्या शेळ्या-मेंढ्यांना लागू होणार आहेत काय ? शेळ्या-मेंढ्यांसाठी सन 2010 चा जी.आर.लागू केला आहे. बाकी संपूर्ण टंचाईसाठी जानेवारी 2013 चा जी.आर.लागू केला आहे. आपण सर्वांसाठी नवीन जी.आर.काढला आहे. मात्र शेळ्या-मेंढ्यांसाठी पाच रूपये असलेला सन 2010 चा जी.आर.लागू केला आहे. त्यामुळे माझा प्रश्न आहे की, सन 2013 च्या जी.आर.मध्ये जी छोटी जनावरे गृहीत धरली आहे त्याप्रमाणे शेळ्या-मेंढ्यांना सोयी सवलती देणार आहेत काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, छोट्या जनावरांप्रमाणेच शेळ्या मेढयांना अनुदान मिळावे अशी सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे. मी यासंबंधी आताच सांगितले आहे की, अनुदानामध्ये वाढ करण्यासाठी निश्चित प्रयत्न केला जाईल. शेळ्या मेंढ्यांना रोज किती पाणी लागते, किती चारा लागतो, कुठल्या पद्धतीचा चारा खातात, याला सुद्धा महत्व आहे. शेळ्या-मेंढ्या झाडपाला खातात. तो जर उपलब्ध करून द्यायचा असेल तर जी संस्था छावणी चालवते त्यांची ती जबाबदारी राहील. कारण शेळ्या-मेंढ्या ऊस खाणार नाही. आता जनावरांना ऊस हे मुख्य खाद्य दिले जाते. त्यामुळे यामध्ये निश्चितपणाने वाढ देण्यात येईल. त्यांना चारा-पाणी किती आवश्यक आहे हे गृहीत धरून ही वाढ देण्यात येईल.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, यासंबंधी काही तरी ठोस निर्णय घ्यावा. या प्रश्नासंबंधी मी सभागृहामध्ये अनेक वर्षापासून झगडत असल्यामुळे आपण न्याय द्यावा. शासन विचार करीत आहे अशा प्रकारचे उत्तर नेहमीच दिले जाते. छोट्या जनावरांप्रमाणे अनुदान देण्यात येईल असे आपण येथे जाहीर केले पाहिजे. आज पाच रूपयांमध्ये काय होते ? रस्त्यावरील भिकारी सुद्धा पाच रूपये घेत नाही. उलट तो आपल्या हातामध्ये पाच रूपये देतो आणि म्हणतो की, आपके पास रखो. शासन छोट्या जनावरांप्रमाणे शेळ्या-मेंढ्यांसाठी अनुदान का देत नाही ? त्यामुळे माझी विनंती आहे की, छोट्या जनावरांप्रमाणेच शेळ्या-मेंढ्यांना अनुदान लागू होईल असे जाहीर करावे. त्यासाठी मंत्रिमंडळापुढे जाऊन जी.आर.काढण्यात येईल असे काही तरी आश्वासन द्यावे. पण शासनाकडून कुठल्याही प्रकारचे उत्तर देण्यात येत नाही. हा वर्ग उद्ध्वस्त व्हायला लागला आहे. त्यामुळे छोट्या जनावरांप्रमाणे शेळ्या-मेंढयांना अनुदान देण्यात येईल, असे शासनाने जाहीर करावे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, कुठलाही निर्णय घ्यायचा असेल तर त्यासाठी मंत्रिमंडळापुढे जावे लागते हे सन्माननीय सदस्यांना माहिती आहे. मंत्रिमंडळाच्या मान्यतेशिवाय सभागृहात घोषणा करणे शक्य नाही. सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न मांडला आहे त्यासंबंधी हे अधिवेशन संपण्याच्या आत निर्णय घेतला जाईल.

उप सभापती : आता तरी मटण स्वस्त होईल काय, त्याचे उत्तर आपण द्यावे.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: जमनालाल गोयंका दंत महाविद्यालय अकोला येथील विद्यार्थी परीक्षेपासून वंचित रहाणे

मु.शी : जमनालाल गोयंका दंत महाविद्यालय अकोला येथील विद्यार्थी परीक्षेपासून वंचित रहाणे या संबंधी सर्वश्री.वसंतराव खोटरे,डॉ.अपूर्व हिरे, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.वसंतराव खोटरे (अमरावती विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"असोसिएटसची सेट (Associate CET) परीक्षा माहे मे 2011 मध्ये घेऊन दिनांक 6 सप्टेंबर 2011 रोजी जमनालाल गोयंका दंत महाविद्यालय अकोला येथे तिसऱ्या फेरीमध्ये यादी घोषित करणे, दिनांक 12 सप्टेंबर 2011 रोजीपर्यंत दिलेल्या अंतिम तारखेच्या यादीत 5 विद्यार्थ्यांचा मुदतीत प्रवेश घेणे, उर्वरित 34 विद्यार्थ्यांनी दिनांक 30 सप्टेंबर 2011 रोजीपर्यंत सर्व अटी पूर्ण करुन प्रवेश होणे, दंत महाविद्यालयाच्या प्रवेशावर बंदी असूनही या संस्थेने याचिका क्रमांक 3982/2011 दाखल करुन प्रवेश बंदीवर स्टे ऑर्डर घेऊन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करणे, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष सुरु होऊन अभ्यासक्रम पूर्ण होणे, माहे मे-जून 2012 मध्ये विद्यापीठाच्या परीक्षेला पात्र असून प्रविष्ठ होण्यासाठी परीक्षेचे प्रवेश पत्र विद्यापीठाने पाठविलेले नसणे, त्यामुळे 39 विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणे, ह्या दंत महाविद्यालयाची मान्यता काढल्यामुळे परीक्षा होऊ न शकणे, या विरुध्द न्याय मागण्यासाठी मुंबई उच्च न्यायालय, नागपूर, ख्वंडपीठ, नागपूर येथे केस नं.2502/12 नुसार दाखल करणे, याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दिनांक 19 डिसेंबर, 2012 रोजी निर्णय देऊन महाराष्ट्र शासनाला सर्व विद्यार्थ्यांचे राज्यातील इतर दंत महाविद्यालयात स्थलांतर करुन परीक्षा घेण्याचे आदेश देणे, ही प्रक्रिया दिनांक 28 फेब्रुवारी 2013 रोजीपर्यंत पूर्ण करणे, भारतीय दंत परिषद (D.C.I.) यांनी महाराष्ट्र शासनास सर्व विद्यार्थ्यांना स्थलांतरित करुन परीक्षा घेण्याबाबत दिनांक 16 मार्च 2013 च्या पत्राव्दारे लेखी कळविणे, याबाबत मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व मा.आरोग्य व वैद्यकीय शिक्षण मंत्री,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सर्व विद्यार्थ्यांच्या

ओ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे . . . .

सहीनिशीचे एक निवेदन मा.जिल्हाधिकारी, जि.अकोला यांचे मार्फत दिनांक 25 मार्च 2013 रोजी किंवा त्या दरम्यान पाठविणे, परंतु अद्याप पर्यंत कोणतीही कार्यवाही शासनाकडून न होणे, याबाबत शासनाविषयी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संभ्रम व पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

ओ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, ही अतिशय महत्वाची लक्षवेधी सूचना आहे. जमनालाल गोयंका दंत महाविद्यालय, बाभूळगाव, जिल्हा अकोला येथील विद्यार्थ्यांचा हा प्रश्न आहे. सन 2011-2012 च्या बीडीएस प्रथम वर्षाच्या 40 विद्यार्थ्यांना मान्यता प्राप्त दंत महाविद्यालयामध्ये स्थलांतरित करुन त्यांची परीक्षा घेणे हा त्यामागील महत्वाचा भाग आहे. याठिकाणी मी प्रथमत: माननीय मंत्री महोदयांचे आभार मानतो की, त्यांनी अतिशय चांगल्या प्रकारे उत्तर दिलेले आहे. परंतु दोन-चार प्रश्न विचारुन मी त्याबाबतीत अधिक माहिती घेणार आहे. याठिकाणी या दंत महाविद्यालयाची मान्यता 2011-2012 मध्ये डेंटल कौन्सिल व महाराष्ट्र राज्य आरोग्य विभाग यांनी काढून घेतली. त्यामुळे 2011-2012 मध्ये होणाऱ्या विद्यापीठाच्या परीक्षेस विद्यार्थ्यांना प्रवेश दिलेला नाही आणि त्यामुळे त्यांचे वर्ष वाया गेले. तसेच दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षामध्ये शिकणाऱ्या मुलांना इतरत्र स्थलांतरित केले आणि त्यांना कॉलेजमध्ये त्यांना प्रवेश मिळाला. परंतु 40 विद्यार्थ्यांमध्ये 34 मुली आहेत आणि 6 मुले आहेत. या महाविद्यालयाची मान्यता काढल्यामुळे त्या मुलांची परीक्षा झाली नाही. म्हणून विद्यार्थ्यांनी मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे 25/02/12 मध्ये याचिका दाखल केली. त्यानंतर याचा निकाल लागला 19-12-2012 रोजी निर्णय घेऊन महाराष्ट्र शासनाने सर्व 40 विद्यार्थ्यांचे स्थलांतर राज्यातील इतर मान्यताप्राप्त दंत महाविद्यालयामध्ये करुन त्यांची परीक्षा घेण्याचे आदेश दिले.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.वसंतराव खोटरे यांना सांगू इच्छितो की, त्यांनी भाषण करु नये.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मी भाषण करीत नाही तर तुम्हाला सांगत आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी जो पहिला प्रश्न विचारला होता, त्याला माननीय मंत्री महोदयांनी चांगले उत्तर दिले आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, न्यायालयाने या सर्व विद्यार्थ्यांचे राज्यातील इतर दंत महाविद्यालयात स्थलांतर करुन परीक्षा घेण्याचे आदेश दिले आणि महाराष्ट्र शासनाला संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यास दिनांक 28-2-2013 पर्यंत भाग पाडले. परंतु अजूनही याबाबतीत शासनाने कोणताही विचार केलेला नाही. त्याचबरोबर महत्वाचे म्हणजे डी.सी.आय.यांनी सुध्दा पत्र लिहून सांगितले की, या सर्व विद्यार्थ्यांना यामध्ये समाविष्ट करुन घ्यावे. यासंदर्भातील 'Dental Council of India' यांचे दिनांक 18 मार्च, 2013 चे पत्र मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यात असे म्हटले

...4/-

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे की, "In this connection, I am directed to state that the State of Maharashtra has 35 dental colleges including 4 Government dental colleges with an anual sanctioned intake capacity of 3020 BDS admissions and the State Government to Maharashtra is requested to transfer the 40 BDS students of Jamnalal Goenka Dental College, Akola in the State of Maharashtra only within the sanctioned annual intake capacity. Moreover, it is also informed that the DCI cannot permit to transfer the students beyond the sanctioned annual intake capacity of the dental colleges (in which they have to transfer), in violation to its own Rules and Regulations."

माझा असा प्रश्न आहे की, या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये. हे अतिशय गरीब विद्यार्थी आहेत. माननीय मंत्री महोदय देखील आदिवासी विभागातील आहेत. त्यांना सुध्दा डॉक्टरची पदवी कशी मिळाली हे त्यांना देखील माहिती आहे. ही आमची गरिबाची मुले आहेत. माझा प्रश्न असा आहे की, या विद्यार्थ्यांचे वर्ष वाया जाऊ नये, ते परीक्षेपासून वंचित राहू नये. यामध्ये एकंदर 36 मुली आहेत.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारावा.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माझा स्पेसिफीक एकच प्रश्न आहे की, या मुलांचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून या विद्यार्थ्यांना इतर कॉलेजमध्ये स्थलांतरित करुन त्यांना या वर्षीच्या परीक्षेला बसण्यासाठी परवानगी देणार आहात काय आणि त्यादृष्टीने निर्णय घेणार आहात काय?

उप सभापती : याबाबतीत सांगावयाचे तर विद्यार्थी जसे पास होतील, त्याप्रमाणे ते करतील.

डॉ.विजयकुमार गावित :सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून जो महत्वाचा विषय आहे, त्याकडे लक्ष वेधले आहे. याबाबत विद्यार्थ्यांनी याचिका क्र.2502/2012 मध्ये केली होती, त्याबाबत हाय कोर्टाने डायरेक्शन देताना सांगितले की, या 40 विद्यार्थ्यांनाही दुसऱ्या कॉलेजध्ये ट्रान्सफर करावे. त्याचबरोबर मे 2013 मध्ये होणाऱ्या परीक्षेला बसू द्यावे असे आदेश दिले. ते दिल्यानंतर त्यांना कुठे आणि कसे ट्रान्सफर करावे याबाबत डीसीआयला आपण पत्र लिहीले होते आणि डीसीआय ने उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, कॉलेजमध्ये मंजूर केलेली

...5/-

श्री.वसंतराव खोटरे . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जी स्ट्रेन्थ आहे, याच्या बाहेर तुम्हाला देता येणार नाही. त्यामध्येच समावेश केला पाहिजे. त्या अनुषंगाने फक्त 6 जागा रिक्त आहेत. कारण हे असोसिएट कॉलेज मधील विद्यार्थी असल्याने त्यांना असोसिएट कॉलेज मध्येच ट्रान्सफर करता येईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित..

त्या ठिकाणी फक्त सहा जागा रिक्त आहेत. दिनांक 5 एप्रिल रोजी एमएचयुएसने सर्वोच्च न्यायालयात एसएलपी दाखल केलेली आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, सन 2011-2012 या वर्षाचे या कॉलेजला ॲफिलेशन नाही. डी.सी.आय.ने जेवढ्या जागा रिक्त आहेत तेवढ्याच जागा भराव्यात असे सांगितले आहे. या संदर्भातील हिअरींग दिनांक 29 एप्रिल, 2013 रोजी होणार आहे. त्या संदर्भात जो काही निकाल लागायचा आहे तो लागेल. परंतु विद्यार्थ्यांना सामावून घेण्याबाबत राज्य सरकारला जे काही अधिकार आहेत त्या बाबत काय करता येईल यासाठी विधी व न्याय विभागाचे मत मागविले आहे. विद्यार्थ्यांचे नुकसान होणार नाही यादृष्टीने राज्य शासन काळजी घेईल. या विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्यात येतील आणि त्या दृष्टीने देखील निश्चितपणे प्रयत्न केले जातील.

डॉ.दीपक सावंत : गोयंका डेन्टल कॉलेज संदर्भात ही लक्षवेधी सूचना आहे. महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामध्ये या विद्यार्थ्यांना सामावून घेण्यात येईल काय ? गोयंका कॉलेजवर काय कारवाई केली आहे तसेच या कॉलेजला पुन्हा रजिस्ट्रेशन मिळू नये यासाठी शासन काय कारवाई करणार आहे ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, या कॉलेजची मान्यता कायम स्वरुपी रद्द करण्यात आलेली आहे. त्यामुळे तो प्रश्न उद्भवणार नाही. ते कॉलेज कोर्टामध्ये गेलेले आहे. त्या संदर्भात जो काही निर्णय होईल तो होईल. परंतु राज्य शासनाच्या अधिकारामध्ये काय करता येईल या बाबत विधी व न्याय विभागाचे मत मागितलेले आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये जी काही डेन्टल कॉलेजेस आहेत त्यातील एक कॉलेज बंद झालेले आहे. माझा प्रश्न आहे की, त्या ठिकाणी शासनाचे डेन्टल कॉलेज सुरु करणार आहात काय ? या संस्थेबद्दल मागील पाच वर्षापासून येथे सतत प्रश्न मांडले जात आहेत. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, त्यांची परमिशन रद्द केलेली आहे. परंतु ते कॉलेज आजही लिटिगेशनमध्ये आहे. उद्या पुन्हा ते गैरफायदा घेतील आणि विद्यार्थ्यांना ॲडमिशन देतील. तेव्हा शासन आपल्या स्तरावर कायम स्वरुपी उपाय योजना करणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, ते कॉलेज लिटीगेशनमध्ये गेले होते. त्या संदर्भात निकाल लागला असून त्या कॉलेजचे ॲफिलेशन रद्द केलेले आहे.

श्री.गोपीकिशन बाजोरिया : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. अकोला जिल्ह्यातील गोयंका डेन्टल कॉलेजमधील 40 विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. मागील वेळी पाच-दहा विद्यार्थी आपोआप सेटल झालेले आहेत. आता फक्त दहा-पंधरा विद्यार्थी राहिलेले आहेत. तेव्हा या प्रकरणी माननीय मंत्री महोदय आपल्या दालनात एक बैठक घेऊन तत्काळ निर्णय घेतील काय ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, फक्त आठ-दहा विद्यार्थी राहिले आहेत. परंतु तशी परिस्थिती नाही. एकूण 40 विद्यार्थीपैकी 38 विद्यार्थी राहिलेले आहेत. या संदर्भात मी बैठक देखील घेतली होती. परंतु एमयुएचएस सर्वोच्च न्यायालयात गेल्यामुळे त्या संदर्भातील हिअरींग होईपर्यंत आपणास थांबावे लागेल. शासनाच्या वतीने काय करता येईल याबाबत प्रयन सुरु आहेत.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.विक्रम काळे)

पृ. शी. : इयत्ता दहावी व बारावीच्या पेपरमधील अडचणी समजावून सांगण्यासाठी विषयातील जाणकार शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्न पत्रिकेच्या स्वरुपाबद्दल उचित मार्गदर्शन न मिळणे

मु. शी. : इयत्ता दहावी व बारावीच्या पेपरमधील अडचणी समजावून सांगण्यासाठी विषयातील जाणकार शिक्षक नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्न पत्रिकेच्या स्वरुपाबद्दल उचित मार्गदर्शन न मिळणे, या संबंधी डॉ.दीपक सावंत, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"माध्यमिक व उच्च माध्यमिक शालेय शिक्षण मंडळाच्या (बोर्ड) एच.एस.सी. इयत्ता बारावी (H.S.C.) परीक्षेच्या वेळी माहे फेब्रुवारी-मार्च, 2013 मध्ये झालेल्या अनेक परीक्षा केंद्रात विद्यार्थ्यांना पेपर मध्ये अडचणी असल्यास समजावून सांगण्यासाठी परीक्षेच्या ठिकाणी त्या विषयातील एकही जाणकार नसणे, त्यामुळे विद्यार्थ्यांना प्रश्नपत्रिकेच्या स्वरुपाबद्दल उचित मार्गदर्शन मिळण्यात निर्माण झालेल्या अडचणी, परिणामी बारावीच्या फिजिक्सच्या पेपरला विद्यार्थी संभ्रमात पडणे, नियोजित वेळेत पेपर पूर्ण न होणे, परिणामी विद्यार्थ्यांचे होणारे नुकसान आणि या संदर्भात मंडळाकडे तक्रारी करुनही कोणतीही कारवाई न होणे, परिणामी विद्यार्थ्यांमध्ये व पालकांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, या बाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

निवेदनानंतर

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मी विचारलेल्या लक्षवेधी सूचनेचा रोख वेगळा होता आणि या लक्षवेधी सूचनेचे जे निवेदन आले आहे ते वेगळे आहे, हे मी प्रथम माननीय मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देतो.

सभापती महोदय, फिजिक्सचा पेपर, पर्यवेक्षणाचा प्रश्न आणि विद्यार्थ्यांचे नुकसान अशा तीन भागांमध्ये हा विषय विभागलेला आहे. ज्यावेळी एच.एस.सी. मध्ये कला, वाणिज्य व विज्ञान या शाखेतील विद्यार्थी पीसीएमबी, पीसीएम या परीक्षेला बसतात त्या वेळी एखाद्या स्पेलींग मिस्टेक मुळे, शब्द व्यवस्थित वापरला नसेल तर प्रश्नाच्या उत्तरामध्ये संभ्रम निर्माण होतो. म्हणूनच त्यावेळी परीक्षा केंद्रावर कोणीतरी विषय प्रमुख किंवा विषय तज्ज्ञ असावयास पाहिजे. आपण पर्यवेक्षक किंवा विषय तज्ज्ञ नेमावा असे मी सांगत नाही. परंतु परीक्षा केंद्राचे प्रमुख किंवा तीन परीक्षा केंद्र मिळून त्यावर विषय तज्ज्ञ असावा जेणेकरुन ते हा प्रश्न समजून स्पेलींग मिस्टेक किंवा ज्या बाबतीत विद्यार्थ्यांना अडचण असेल ते समजून सांगून विद्यार्थ्यांना दिलासा देऊ शकतील. त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी मी केलेली सहानुभूतीची मागणी माननीय मंत्री मान्य करतील काय ? तसेच राज्य सरकारने सीबीएसईचा अभ्यासक्रम व परीक्षा पध्दती अंगिकारलेली आहे. शिवाय पूर्वी दोन तासांचा असलेला पेपर तीन तासांवर आणला आहे. त्यामुळे 80 गुणांऐवजी 70 गुणांचे पेपर झाले. या मुळे विद्यार्थ्यांवर स्कोअरींगची अडचण आली आहे. त्यामुळे या बाबतचा पुनर्विचार करण्यात येईल काय ? पूर्वी आठवड्याला 10 तासिकांची गरज होती. परंतु आता आठवड्याला 8 तासिका ठरविल्या आहेत. म्हणजेच पूर्वीपेक्षा 80 तासिक कमी झाल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम कमी झाला हे मंत्री महोदयांना मान्य आहे काय ? रसायन शास्त्र या विषयाचा पेपर उशिरा आला. रसायन शास्त्र विषयाचे पुस्तक 456 पृष्ठांचे आहे. त्यामुळे हा अभ्यासक्रम संपूर्णपणे शिकविला गेला नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे येणाऱ्या वर्षात या संदर्भात नेमके काय करणार आहात ? फिजिक्सच्या पेपरमध्ये प्रश्नाची भाषा बदलल्यामुळे विद्यार्थी संभ्रमात पडले. विद्यार्थ्यांना सहानुभूतीची आवश्यकता असल्यामुळे त्यांचे पेपर सहानुभूतीपूर्वक तपासण्यात येतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : महोदय, मी सुरुवातीलाच अत्यंत नम्रपणे सांगू इच्छितो की, लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात काही चूक नाही. दुर्दैवाने लक्षवेधी सूचनेचा जो विषय पाठविण्यात आला होता त्या अनुषंगाने लक्षवेधी सूचनेला उत्तर देण्यात आले होते. मात्र रात्री जी पुस्तिका आली त्यामध्ये त्यातील पुष्कळ भाग काढून टाकण्यात आला. या लक्षवेधीच्या विषयाचा रोख मला सुध्दा कळालेला आहे. विद्यार्थ्यांना विषयाबद्दलची माहिती हवी असेल तर त्या बाबत आपण काय करणार आहात, नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून एका पेपरचे दोन पेपर करणार काय, अशी सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली आहे. राज्यातील शिक्षणाचा दर्जा वाढावा आणि तो देशातील अभ्यासक्रमाबरोबर असावा म्हणूनच राज्य सरकारने निर्णय घेतला की, जे विषय आहेत त्यांच्या अभ्यासक्रमाचे उच्चीकरण केले पाहिजे. त्यामुळे दोन वर्षापूर्वीच आराखडा प्रसिध्द केला होता. इयत्ता 11 वी आणि 12 वीच्या पूर्व परीक्षा त्याच पॅटर्न प्रमाणे झाल्या आहेत.

आपल्याला माहीत आहे की, अभ्यासक्रम बदलल्यानंतर शिक्षकांचे प्रशिक्षण होणे सुध्दा महत्त्वाचे असते. त्या दृष्टिकोनातून विषय तज्ज्ञांकडून विषय शिक्षकांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेण्यात आली. जे महत्त्वाचे विषय होते, त्यामध्ये काही गॅप्स होत्या.

नंतर श्री.बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा ....

25 फेब्रुवारीला फिजिक्स, 4 मार्चला गणित, 17 मार्चला बायोलॉजी आणि 27 मार्चला केमिस्ट्री अशा पध्दतीने गॅप दिलेली आहे. परीक्षा संचालनाबद्दलची जी मार्गदर्शक पुस्तिका आहे त्यामध्ये स्पष्ट नमूद केले आहे की, जो पर्यवेक्षक असतो तो मुळात त्या विषयाशी संबंधित असू नये. कारण महाराष्ट्रामध्ये यापूर्वी काय झालेले आहे याची आपल्याला कल्पना आहे. सुदैवाने गेल्या तीन वर्षामध्ये महाराष्ट्र आपण कॉपीमुक्त केलेला आहे त्यातलाच तो एक भाग होता. सन्माननीय सदस्यांनी सूचना केली की, त्या ठिकाणी आजूबाजूला म्हणजे या शाळेत नव्हे तर दुसऱ्या शाळेमध्ये या संदर्भातील एखादा एक्स्पर्ट असू शकतो का ? आपली सूचना निश्चितपणे एस.एस.सी. बोर्डाकडे पाठविण्यात येईल आणि त्यांनी त्याबद्दल विचार करावा पण त्याबद्दल या ठिकाणी कोणताही शब्द देता येणार नाही.

सभापती महोदय, आमच्याकडे सुध्दा तक्रारी आल्या की, जे प्रश्न आहेत त्याचे काठिण्य जास्त होते म्हणजे प्रश्न कठीण होते. सुरुवातीला तर एक हजार एसएमएस एकाच रात्री असे आले की, प्रश्नपत्रिकेमधील प्रश्न हे बाहेरचे आहेत. माझ्याकडे प्रत्येक प्रश्न, त्याचा उपप्रश्न आणि त्याचे उत्तर कोणत्या पानावर आहे याचा पूर्ण रेकॉर्ड आहे. एकही प्रश्न अभ्यासक्रमाच्या बाहेरचा किंवा पुस्तकाच्या बाहेरचा नाही. कोणताही अभ्यासक्रम जेव्हा आपण बदलतो तेव्हा निश्चितपणे पहिल्या वर्षी त्याची अडचण विद्यार्थ्यांनाही होते आणि शिक्षकांनाही होते हे आपण मान्यच केले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, पूर्वी 2 पेपर्स होते आणि परत आता दोन पेपर्स करणार का ? तसे करणार नाही. 3 तासाचा 70 मार्काचा एकच पेपर राहील. कारण सीबीएसईमध्ये सुध्दा याच पध्दतीने प्रश्नपत्रिकेचे नियोजन केले जाते.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी प्रश्न उपस्थित केला आणि माझा सुध्दा पॉइन्टेड प्रश्न आहे. आपण अभ्यासक्रम बदलला आणि आपणही हे मान्य केले आणि सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनीही मान्य केले की, हा अभ्यासक्रम व्हास्ट आहे. आता आपण त्या विषयाला जो कार्यभार देतो किंवा ज्या तासिका देतो त्यामध्ये नवीन वाढीव अभ्यासक्रम विचारात घेता त्या त्या विषयाला कार्यभार वाढवून देण्याच्या संदर्भात शासन फेरविचार करणार का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत किंवा सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी सूचना केलेली आहे की, तासिका वाढवून देणे आवश्यक आहे. निश्चितपणे त्याचा विचार करण्यात येईल.

श्री. भगवानराव साळुंखे : सभापती महोदय, एस.एस.सी. बोर्डाने यावेळेला बारावीचे जे पेपर्स काढले ते पाठ्य पुस्तकावर आधारित काढले आणि ते योग्य होते हे पहिल्यांदा मान्य केले पाहिजे. कारण खाजगी क्लासेसवाले आणि खाजगी गाईड-बुक्सवाले यांचे फार मोठे मार्केटिंग यामध्ये लपलेले होते. त्याला छेद देण्याचे काम शासनाने केले आहे त्याबद्दल मंडळाला तसेच मंत्री महोदयांनाही धन्यवाद देतो. आम्ही ज्या प्रश्नपत्रिका काढणार आहोत त्याचे बदललेले स्वरुप पाठ्य पुस्तकावर आधारित राहणार आहे त्यामुळे तुम्ही बाह्य यंत्रणेवर विसंबून राहू नका, अशा पध्दतीचे उद्बोधन विद्यार्थ्यांना देण्याचे काम शालेय स्तरावर करण्याच्या दृष्टीने शिक्षकांचे प्रशिक्षण होण्याची आवश्यकता आहे. अशी यंत्रणा यापुढे सरकार उभी करणार का ?

श्री. राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांचे मी आभार व्यक्त करतो. यावेळेला जी प्रश्नपत्रिका होती ती संपूर्णपणे ज्यांनी पुस्तक वाचलेले आहे त्यांच्यासाठी होती आणि कोचिंग क्लासेसच्या नावाखाली विद्यार्थ्यांना चुकीचे मार्गदर्शन करणाऱ्यांच्या निश्चितपणे विरोधात होती. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, त्या दिवशी जे 1 हजार दूरध्वनी आले किंवा एसएमएस आले त्यांचा उगम कोणत्या कोचिंग क्लासमधून झाला होता याचा सुध्दा आम्ही शोध घेतलेला आहे. आज या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी उपस्थित आहेत. कोचिंग क्लासेसमधून बेस्ट ऑफ 21 अशा पध्दतीने शिकविण्यात येते. पण आता निश्चितपणे विद्यार्थ्यांच्या आणि शिक्षकांच्या लक्षात आलेले आहे की, पुस्तकच वाचले पाहिजे. कारण पुस्तकावर आधारितच प्रश्न येतील. सन्माननीय सदस्य श्री. भगवानराव साळुंखे यांनी सूचना केलेली आहे की, शिक्षकांचे प्रशिक्षण करताना त्यांना निश्चितपणे सांगितले पाहिजे की, आपण याच पध्दतीने पुस्तकावर आधारित विद्यार्थ्यांना शिकवावे. ते सुध्दा करण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, खाजगी शाळा मर्यादित जागा उपलब्ध असताना त्यापेक्षा अधिक फॉर्मचे वाटप करीत असतात. नेरुळ येथील डीव्हीए पब्लिक स्कूल शाळेत 500 फॉर्मचे वाटप करुन प्रत्येकी 725 रुपये घेण्यात आले आहेत. मर्यादित जागा असताना क्षमतेपेक्षा फॉर्मचे वाटप केले जाते. अनेकांना शाळेत प्रवेश मिळत नाही. त्यामुळे ज्यांना प्रवेश मिळत नाही त्यांच्या प्रवेश पत्रिकेचे पैसे परत मिळाले पाहिजेत. त्यासाठी शासन काही प्रयत्न करणार आहे का ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेचा स्कोप मी वाढविणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांच्या प्रश्नाला मी उत्तर देणार नाही. मात्र सन्माननीय सदस्यांनी दिलेल्या माहितीसंबंधी मी त्यांना बोलावून सभागृहाच्या बाहेर कार्यवाही करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, बारावीची परीक्षा म्हणजे मेडिकलच्या सीईटीचा व इंजिनिअरिंगच्या सीईटीचा उंबरठा असतो. बारावीच्या नवीन अभ्यासक्रमाबाबत मला मंत्री महोदयांना एक प्रश्न विचारावयाचा आहे. केमिस्ट्री या विषयाचा 75 टक्के अभ्यासक्रम बदललेला आहे. फिजिक्सचा 15 टक्के आणि बायोलॉजीचा 33 टक्के अभ्यासक्रम बदललेला आहे. केमिस्ट्री विषयात लक्षणीय बदल केलेला आहे. एस.एस.सी.बोर्डाचे विद्यार्थी सीबीएसईच्या अभ्यासक्रमाचा अभ्यास करतात त्यावेळी त्यांना ते कठीण जाते. त्यामुळे शिक्षकांचे प्रशिक्षण घेणे अत्यंत आवश्यक आहे. तशा प्रकारचा कार्यक्रम शासन आखणार आहे काय ? नवीन अभ्यासक्रमाच्या पॅटर्नचा फेरविचार करणार आहे का ? फिजिक्स व केमिस्ट्री हे विषय गणिताशी संबंधित आहेत. बायोलॉजी हा विषय गणिताशी संबंधित नसला तरी त्या विद्यार्थ्यांना गणित हा विषय घ्यावा लागतो. पीसीएमबीचे विद्यार्थी जास्त आहेत. त्यामुळे तज्ज्ञांचा सल्ला घेऊन शासन नवीन अभ्यासक्रमाच्या पॅटर्नचा फेरविचार करणार आहे का ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, हा नवीन अभ्यासक्रम तज्ज्ञांनी एकत्र बसून तयार केलेला आहे. या अभ्यासक्रमाची काठीण्य पातळी अधिक असल्याची शासनाकडे तक्रार आली आहे. या तक्रारीच्या संदर्भात या अभ्यासक्रमातील जेवढे तज्ज्ञ आहेत त्या सर्वांना पाचारण

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा....

करण्यात आले होते. या अभ्यासक्रमांमध्ये बदल करण्यात येऊ नये असे त्यांचे मत आहे. अभ्यासक्रमातील पुस्तके बदलतात, काही विषयाचा 75 टक्के, 33 टक्के किंवा 15 टक्के अभ्यासक्रम बदलतो त्यावेळी निश्चितपणे शिक्षकांचे प्रशिक्षण होणे आवश्यक असते. हे प्रशिक्षण कागदोपत्री न होता चांगले झाले पाहिजे. खऱ्या अर्थाने प्रशिक्षण झाले पाहिजे. त्या दृष्टीकोनातून शासनाकडून कार्यवाही केली जाईल.

तालिका सभापती : सभागृहाच्या निदर्शनास आणताना मला आनंद होत आहे की, माननीय शालेय शिक्षण मंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांनी लक्षवेधी सूचनेला उत्तर देत असताना टॅब्लेटचा वापर केलेला आहे. या सभागृहात एखाद्या मंत्री महोदयांकडून उत्तरे देण्यासाठी अद्ययावत यंत्रणेचा पहिल्यांदाच वापर करण्यात आल्यामुळे सर्व सन्माननीय सदस्यांनी त्यांचे अभिनंदन करणे आवश्यक आहे.

(सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी बाके वाजवून मंत्री महोदयांचे अभिनंदन केले.)

3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : वडाळा येथील जे.के.नॉलेज सेंटरमधील भारतीय पुनर्रचना संस्था (औरंगाबाद) संचालित,मुंबई माध्यमिक विद्यालयातील एक एक करुन जुन्या शिक्षकांना कामावरुन काढून टाकण्यात येणे

मु. शी. : वडाळा येथील जे.के.नॉलेज सेंटरमधील भारतीय पुनर्रचना संस्था (औरंगाबाद) संचालित,मुंबई माध्यमिक विद्यालयातील एक एक करुन जुन्या शिक्षकांना कामावरुन काढून टाकण्यात येणे यासंबंधी श्रीमती अलका देसाई,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबईतील वडाळा येथील जे.के.नॉलेज सेंटरमधील भारतीय पुनर्रचना संस्था (औरंगाबाद) संचालित, मुंबई माध्यमिक विद्यालयातील जुन्या शिक्षकांना एक एक करुन कामावरुन काढून टाकण्यात येत असल्याचे माहे फेब्रुवारी, 2013 च्या दरम्यान उघडकीस येणे, दिनांक 1 डिसेंबर, 2012 रोजी 2 शिक्षकांना, 20 डिसेंबर, 2012 रोजी लिपिकांना व मुख्याध्यापकांसहीत 7 शिक्षकांना, दिनांक 24 डिसेंबर, 2012 रोजी औरंगाबाद येथे बदली करण्यात येणे, व एका शिपायास तोंडी सांगून काढण्यात येणे, शाळेतील शिक्षक व पालक वर्गात निर्माण झालेली नाराजीची भावना याबाबतीत शासनाने तातडीने लक्ष घालून शाळेच्या शिक्षकांना त्वरीत कामावर घेऊन नियमित वेतन मिळण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

तालिका सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

4....

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, जे.के.नॉलेज सेंटरमधील भारतीय पुनर्रचना संस्था (औरंगाबाद) संचालित, मुंबई येथील वडाळा येथे एक शाळा चालविली जाते. त्या शाळेला इयत्ता 8 वी ते 10 वी पर्यंत शासनाने परवानगी दिलेली आहे. श्री.जे.के.जाधव यांची ही संस्था आहे. या संस्थेने तेथे दुकानदारी सुरु केलेली आहे. त्या दुकानदारीच्या जोरावर त्यांनी शिक्षकांना त्रास देण्याचा उद्योग सुरु केलेला आहे. या संस्था चालकाने शासनाला फसविण्याचेही काम केलेले आहे. संस्था चालकाने शिक्षकांच्या सूडबुध्दीने बदल्या केलेल्या आहेत. त्या रद्द करुन त्यांना पुन्हा वडाळा येथे रुजू करण्याचे शासन आदेश देईल काय तसेच संस्थेने त्या शिक्षकांचा नोव्हेंबर, 2012 पासून पगार थांबवून त्यांना त्रास दिलेला आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई...

या शिक्षकांना शाळेमध्ये येण्यास देखील बंदी करण्यात आलेली आहे. एवढयावरच ते थांबले नाहीत तर त्या शिक्षकांच्या विरुध्द पोलीस स्टेशनला तक्रारी देखील करण्यात आलेल्या आहेत. अशा प्रकारचे सर्व उद्योग त्या संचालकांनी केलेले आहेत. त्या भागातील लोकप्रतिनिधी श्री. कालिदास कोळंबर यांच्या मतदारसंघामध्ये ही शाळा असून त्यांनी स्वत: संचालकांना समज दिलेली आहे. परंतु त्यांना देखील ते बधले नाहीत. तेव्हा त्या शिक्षकांना पुन्हा कामावर घेण्याचे आदेश शासन संचालकांना देईल काय ? या प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदय समंजसपणे पहात असले तरी शाळेतील मुलांचे नुकसान होत आहे, आता परीक्षा सुरु झालेल्या आहेत. डिसेंबर महिन्यापासून संचालकांनी हा तमाशा चालविलेला आहे. तेव्हा ज्यानी शिक्षणाचा खेळखंडोबा केला त्या के.के.जाधव या संचालकांना 25 संस्था चालविण्याचा अधिकार नाही. त्यांनी इंडस्ट्री डिपार्टमेण्टमध्ये केलेले उद्योग या ठिकाणी करु नयेत. तेव्हा याबाबतीत शासन कोणती कडक कारवाई करणार आहे ?

श्री. राजेंद्र दर्डा : भारतीय पुनर्रचना संस्थेच्या मुंबईमध्ये एकूण 5 मराठी माध्यमाच्या शाळा असून त्यापैकी 3 शाळा अनुदानित आणि 2 शाळा विनाअनुदानित आहेत. 8 वी ते 10वी पर्यंत प्रत्येकी एक तुकडी त्या ठिकाणी आहे. या संस्थेने दिनांक 24 डिसेंबर 2012 रोजी शिक्षकांच्या बदल्या केलेल्या आहेत. नियमाप्रमाणे कोणत्याही शिक्षकाची बदली ही शैक्षणिक वर्षाच्या मध्ये करता येत नाही. यासंबंधी 2 जानेवारी 2013 रोजी तक्रार प्राप्त झाल्यानंतर शिक्षण विभागाने त्या संस्थेला असे कळविलेले आहे की, तुम्हाला अशा पध्दतीने बदल्या करता येणार नाहीत. त्या शिक्षकांना तातडीने पुन्हा कामावर रुजू करुन घ्यावे. परंतु त्या शिक्षकांना कामावर रुजू करुन घेण्यात न आल्याची तक्रार प्राप्त झाल्यानंतर दिनांक 30 जानेवारी रोजी एक समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. त्या समितीचा अहवाल चार-पाच दिवसात प्राप्त होईल. तो प्राप्त झाल्यानंतर अहवालातील शिफारशी नुसार कारवाई करण्यात येईल.

श्री. निरंजन डावखरे : महाराष्ट्रभर विशेषत: कोकणामध्ये अशा प्रकारे अनेक संस्था शिक्षकांच्या बदल्या करतात, त्यांचे निलंबन करतात. या बाबतीत शिक्षण विभागामार्फत संस्थांना आदेश देण्यात आले तरी त्या आदेशांना त्या संस्था दाद देत नाहीत. तेव्हा असे प्रकार होऊ नयेत यासाठी शासन कडक धोरण अवलंबिणार आहे काय ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा : होय.

श्री. भगवान साळुंके : सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या अनुरोधाने संपूर्ण महाराष्ट्रातील प्रश्नाकडे लक्ष वेधलेले आहे. संचालक शिक्षकांच्या मनमानी पध्दतीने बदल्या करतात, त्यांना नोकरीवरुन काढून टाकतात. अशा संस्थावर प्रशासक नियुक्त करणे किंवा त्या संस्थांची मान्यता काढून घेणे या व्यतिरिक्त शासनाला कोणतीही कारवाई करता येत नाही. अशा प्रकारे नियमबाह्य पध्दतीने वागणा-या संस्थाचालकांवर कडक कारवाई करण्याचे धोरण शासन अवलंबिणार आहे काय ? संबंधित संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती केली जाणार आहे काय ?

श्री. राजेंद्र दर्डा : जेव्हा एखादी संस्था अनुदानावर येण्याची वेळ येते त्यावेळी जे जुने शिक्षक किंवा कर्मचारी असतात त्यांना बाजूला करुन नवीन कर्मचारी आणि शिक्षक वेगळया पध्दतीने घेण्याचे प्रयत्न होत असतात. या बाबतीत शासनाने अशी भूमिका घेतलेली आहे की, ज्या शिक्षकाला मान्यता मिळालेली आहे अशा शिक्षकाला कोणत्याही परिस्थितीमध्ये आणि संस्थाचालकाने कितीही प्रयत्न केले तरी काढता येणार नाही या दृष्टीकोनातून आम्ही कारवाई केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-5..... श्री.राजेंद्र दर्डा....

विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने मी काल माहिती घेतली. त्या ठिकाणी इतर शिक्षकांच्या माध्यमातून अभ्यासक्रम पूर्ण करण्यात आला आहे हे मात्र निश्चितपणे तपासून घेतले आहे.

श्री.कपिल पाटील : मंत्री महोदयांनी शिक्षकांना आश्वासन दिल्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. विना अनुदानित आणि कायम अनुदानित शाळामधील शिक्षकांकरिता मान्यता घेतली जात नाही. अशी गेली अनेक वर्षाची प्रकरणे आहेत. तत्कालीन शालेय शिक्षण मंत्री महोदयांनी स्पेशल कॅम्प घेऊन मान्यता देण्याचे आदेश काढले होते. त्या आदेशाची अंमलबजावणी काही ठिकाणी झाली परंतु पूर्णपणे अंमलबजावणी झालेली नाही. मे, 2013 अखेरपर्यंत स्पेशल कॅम्प घेऊन या सर्व शाळातील शिक्षकांची मान्यता घेण्याबाबत शासनाला सु-मोटो कारवाई करावी लागेल. शासन तसे आदेश देणार आहे का?

श्री.राजेंद्र दर्डा : तीन वर्षापूर्वी नव्हे तर यावर्षी काही महिन्यापूर्वी सुध्दा कॅम्प घेऊन मान्यता देण्याचा प्रयत्न केला आहे. निश्चितपणे माननीय सदस्यांना अपेक्षित असलेले उत्तर मी देतो. एखादा कॅम्प पुन्हा घेऊन प्रलंबित केसेस असतील तर त्याना निश्चितपणे मान्यता मिळेल असे पाहण्यात येईल.

श्री.भाई गिरकर : काही संस्था चालकांचे लागेबांधे असल्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई केली जात नाही, असे दिसून येते. असे संस्था चालक नंतर शिक्षक पदासाठी टेंडर काढतात. ज्या संस्था शिक्षक पदांना मान्यता घेत नाहीत त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करुन तेथे प्रशासक नेमण्यात येईल काय?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, गेल्या वर्षभरात ज्या ठिकाणी गैरप्रकार आढळून आले अशा अनेक संस्थांवर प्रशासक नेमल्याचे दिसून येईल. या प्रकरणी 15 दिवसात अहवाल प्राप्त होईल. अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यकता भासली तर निश्चितपणे आपल्या मनात असलेली कारवाई देखील करण्यात येईल.

तालिका सभापती (श्री.विक्रम काळे) : माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई यांनी शिक्षकांच्या बदलीच्या संदर्भात ही लक्षवेधी सूचना उपस्थित केली आहे. शैक्षणिक वर्षामध्ये शिक्षकांची बदली करु नये याबाबत शासन आदेश काढला पाहिजे, तो आपण काढावा.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, या संदर्भात आदेश काढण्याची गरज नाही. याचे कारण असे की, राज्यात महाराष्ट्र राज्य खाजगी शासकीय सेवेच्या शर्ती लागू केलेल्या आहेत. 1981 च्या नियम क्रमांक- 41 मधील तरतुदीनुसार मध्येच बदली करता येत नाही. झालेली बदली निश्चितपणे चुकीची आहे.

तालिका सभापती : सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 11.43 ते 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण नियम 289 संदर्भातील प्रस्तावाच्या सूचनेवर बोलण्यासाठी केव्हा वेळ देणार आहात ?

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर मी बाकीचे कामकाज घेणार आहे.

पृ.शी./मु.शी. : तोंडी उत्तरे

महाराष्ट्र लक्ष्मी व इतर तीन या लॉटरीच्या छपाई, विक्री व सोडतीत मोठ्या प्रमाणात झालेला गैरव्यवहार

(1) * 36737 श्री.विनोद तावडे, श्री.चंद्रकांत पाटील, श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) महाराष्ट्र लक्ष्मी, सागर लक्ष्मी, पद्यमिनी, अक्षय पुष्कराज, वैभवलक्ष्मी या लॉटरीच्या छपाई, विक्री व सोडत यात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याची बाब मा. विरोधी पक्षनेते, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विधानमंडळाच्या सन 2012 च्या पावसाळी अधिवेशनात लक्षवेधी सूचनेद्वारे उपस्थित केली असता मा.उपमुख्यमंत्र्यांनी या संपूर्ण प्रकरणाची आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करून हिवाळी अधिवेशनाच्या आत चौकशी पूर्ण करण्यात येईल असे आश्वासन दिले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या प्रकरणी चौकशी करून शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, अद्यापपर्यंत या प्रकरणी चौकशी न करण्याची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री. अजित पवार यांच्याकरिता : (1), (2) व (3)

सदर प्रकारण वित्त विभागाकडून गृह विभागाकडे पाठविण्यात आलेले आहे. गृह विभागाने त्यांच्या दि. 20.11.2012 च्या पत्रानुसार आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी करण्याबाबतचे आदेश दिले असून या प्रकरणी आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागामार्फत चौकशी सुरु आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही विधानपरिषदेत विविध आयुधे वापरतो. प्रश्न विचारून न्याय मिळाला नाही तर लक्षवेधी सूचना मांडतो. माननीय मंत्री, माननीय राज्यमंत्री यांच्याकडून त्या संदर्भात आश्वासने दिली जातात. त्या प्रमाणेच या संदर्भात आश्वासने दिली होती. राज्यात महाराष्ट्र लक्ष्मी, सागर लक्ष्मी, पद्मिनी इत्यादी लॉटरींच्या छपाई, विक्री व सोडत यात

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होत असल्याने तसेच ऑनलाईन लॉटरीचा ड्रॉ मोठ्या प्रमाणात काढला जात असल्याने शासनाचे महसुली उत्पन्न बुडत आहे, या बाबतचा विषय सविस्तर पुराव्यांसह मी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून पावसाळी अधिवेशनात मांडला होता. त्यावेळी माननीय उप मुख्यमंत्र्यांनी असे उत्तर दिले होते की, या प्रकरणाच्या संदर्भातील सविस्तर चौकशी करून पूर्ण अहवाल डिसेंबरच्या अधिवेशनात सभागृहाला देण्यात येईल. सरकार दिलेली आश्वासने बऱ्याच वेळा विसरते. त्यामुळे मी या संदर्भात संबंधित खात्याला 3 स्मरण पत्रे लिहिली होती. राज्याचा शेकडो कोटी रूपयांचा महसूल बुडत आहे.

सभापती महोदय, मी या संदर्भात पाठपुरावा करीत असताना मला काही मंडळी येऊन भेटण्याचा प्रयत्न करीत होते आणि मला सांगत होते की, आम्ही वरच्यांना शांत केले आहे, तुम्ही देखील शांत व्हा. हे काय चालले आहे ? ऑनलाईनचे सर्व प्रूफ एकत्र घेऊन ते आले होते. माझे म्हणणे आहे की, या पध्दतीने वेळ काढण्याचे काम सुरू आहे. सेटलमेंट करण्याचे काम सुरू आहे. दुष्काळाला देखील पैसे मिळत नाहीत. डिसेंबरच्या अधिवेशनात या संदर्भात अहवाल देण्यात येईल, असे सांगितले होते. माझा प्रश्न असा आहे की, आपण हे प्रकरण इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे कोणत्या तारखेला सोपविले, सदर प्रकरण इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे सोपविण्यास उशीर का झाला, सदर प्रकरणी कोणाकोणाला चौकशीला बालाविले आणि प्राथमिक चौकशीअंती कोणाला अटक केली ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, सन 2006-07 या कालावधीत झालेल्या सोडतींची संख्या 758 होती. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यावेळी अधिवेशनात विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात माननीय उप मुख्यमंत्र्यांनी सांगितले होते की, सदर प्रकरणी काही गैरव्यवहार झाला असेल तर इकॉनॉमिक इंटेलिजन्स विंगच्या माध्यमातून संपूर्ण विषयाची चौकशी केली जाईल

(नंतर श्री. भारवि ....

अशुद्धीत प्रत/ग्रंथिक्षेपाही नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

श्री.राजेंद्र मुळक...

आणि चौकशी झाल्यानंतर त्यासंबंधातील कारवाई सभागृहाला अवगत केली जाईल असे डिसेंबरच्या अधिवेशनात सांगितले होते. ज्या सर्व लॉटरी निघाल्या आहेत त्यांचा व्हॉल्यूम फार मोठा होता. त्यानंतर आपण जी कारवाई केली त्याची थोडक्यात माहिती माननीय विरोधी पक्ष नेत्यांना देऊ इच्छितो. माहिती तयार करण्यासाठी कार्यालयातील जुने अभिलेख संकलित करण्यात आले व त्याची संपूर्ण पडताळणी करून सविस्तर माहिती तयार करण्यासाठी उप संचालक, वि.व ले.,शिवडी या कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांना नेमण्यात आले व साधारणपणे तीन महिन्यांचा कालावधी सर्व कागदपत्रे गोळा करून त्याची माहिती संकलित करण्यासाठी लागला. त्यानंतर उप संचालक, वि.व ले., शिवडी यांनी सदरची माहिती दिनांक 8.10.2012 रोजी आयुक्तालयास सादर केली. प्राप्त माहितीवरून संपूर्ण पडताळणी, विश्लेषण करून वित्त विभागाने दिनांक 7.11.2012 रोजी टिप्पणीन्वये संपूर्ण प्रकरण माहिती आणि चौकशीसाठी गृह विभागाकडे पाठविले. गृह विभागाने दिनांक 20.11.2012 च्या पत्रान्वये प्रकरण पोलीस महासंचालकाकडे पाठविले. पोलीस महासंचालकांनी दिनांक 30.11.2012 च्या पत्रान्वये सदर प्रकरण चौकशीसाठी इओयु कडे पाठविले. वित्त विभागाने दिनांक 7.12.2012 च्या पत्रान्वये चौकशी पूर्ण करण्यासाठी मुदत वाढ मागितली. विहित मुदतीमध्ये चौकशी करू असे आपण सांगितले होते. कागदपत्रांची माहिती घेणे त्यांचे विश्लेषण करणे, विभाग निहाय पूर्ण तयारी करणे यासाठी अवधी लागला. त्यामुळे मुदतवाढीसाठी माननीय सभापती यांच्याकडे विनंती करण्यात आली.

मी तारीख निहाय घटनाक्रम सांगत आहे. इओयुच्या दिनांक 23.1.2013 च्या पत्रान्वये या प्रकरणासंबंधातील छापलेल्या तिकिटासंबंधातील माहिती, न छापलेल्या तिकिटांची माहिती, लॉटरी निकालाची माहिती, लॉटरी विक्रेत्यांच्या घरांच्या पत्त्यासह माहिती मागविली. सदर माहिती दिनांक 12.2.2013 च्या इओयुला देण्यात आली. तेव्हा पासून सदर चौकशी सुरू आहे. सदर माहितीवरून सोडतीची संख्या, तिकिटांची एकूण संख्या, छापलेल्या व न छापलेल्या तिकिटांची संख्या, एकूण बक्षिसांची संख्या, व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36737....

श्री.राजेंद्र मुळक...

पत्ते इत्यादी सर्व बाबी काढण्याचा प्रयत्न या चौकशीमध्ये सुरू आहे. प्राप्त माहिती अत्यंत गुंतागुंतीची व क्लिष्ट असून प्रकरणांची व्याप्ती फार मोठ्या प्रमाणात असून संपूर्ण राज्यातील प्रकरण असल्यामुळे या प्रकरणांची चौकशी पूर्ण करून अहवाल सादर करण्यास साधारणत: नऊ महिन्याचा कालावधी अजून लागेल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, लॉटरी संबंधातील विषय या पूर्वी देखील सभागृहापुढे आला होता. लॉटरीमुळे वर्षाला रूपये 1200 ते 1500 कोटी इतका महसूल बुडतो अशा प्रकारचे पुरावे देखील देण्यात आले होते. सदर महसूल हा किती वर्ष बुडत आहे. 100 कोटी रूपयांचा महसूल बुडाला तरी चालेल पण राज्याच्या जनतेचे आरोग्य चांगले राहण्यासाठी माननीय वित्त मंत्र्यांनी गुटख्यावर बंदी घातली. पण येथे आपला 1200 ते 1500 कोटीचा महसूल बुडत आहे. त्यामुळे गृह विभागाने हे प्रकरण इओडब्ल्यूकडे सुपूर्द केले आहे. 50 लाख रूपयाच्या वर घोटाळा असेल तर त्याचा एफआयआर इओडब्ल्यू नोंदवून घेऊन चौकशी करते. 1200 ते 1500 कोटी रूपयांचा महसूल बुडण्यापुरता हा प्रश्न मर्यादित नाही, तर हा भ्रष्टाचाराचा प्रकार आहे. दोन दिवसांपूर्वीच अधिकाऱ्यांना पकडले आहे. त्यांनी पाच वर्षामध्ये पाच तिकिटे लागली असे दाखविले. त्यातून आपला पैसा व्हाईट कसा करायचा हा मार्ग त्यांनी दाखविलेला आहे. हे चौकशीमध्ये देखील आले आहे. त्या संबंधातील पुरावे देखील मी दिलेले आहेत. सदर महसूल किती वर्षे बुडतो आहे, हा महसूल गोळा करणारे जे अधिकारी आहेत त्यांच्या विरूद्ध शासन ठोस कारवाई करणार आहे काय ? कारण हा महसूल कमी नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लॉटरीचा बिझनेस आता परसेंटेजवाईज कमी असेल पण मागील 5-10 वर्षात जास्त होता आणि त्यावेळी हा रेव्हीन्यू गेलेला आहे आणि त्या रेव्हेन्यूची जबाबदारी कोणावर आहे आणि त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात? हा प्रश्न आहे. तेच इकॉनॉमिक ऑफेन्स वींगला चौकशी साठी एकेक वर्ष लागत नाही. त्यामुळे या सर्व बाबी आपण कमी कालावधी मध्ये उघड करणार आहात काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर साहेबांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे. याबाबतीत सन्माननीय विरोधी पक्षनेते माननीय श्री. विनोद तावडे यांनी विचारलेल्या प्रश्नाला माननीय राज्यमंत्र्यांनी विस्तृत उत्तर दिलेले आहे आणि हा काळ 2005 ते 2007 पर्यंतचा आहे. या कालावधीमध्ये एकूण सोडतीची संख्या 758, एकूण तिकिटांची संख्या 73.36 कोटी, छापण्यात आलेल्या तिकीटांची संख्या 18.62 कोटी, न छापलेल्या तिकिटांची संख्या 54.80 कोटी, छापण्यात आलेल्या तिकिटांपैकी परंतु विक्री झालेल्या तिकिटांची संख्या 7.35 कोटी, छापण्यात आलेल्या तिकिटांपैकी विक्री न झालेल्या तिकिटांची संख्या 11.82 कोटी आहे. त्याबद्दल आपण इकॉनॉमिक आफेन्स विंगकडे यासंबंधातील काम दिलेले आहे. याबाबत त्यांनी असे सांगितले आहे की, आम्हाला या कामासाठी अजून जवळजवळ 9 महिने लागतील कारण जवळपास दीड टेम्पो भरतील एवढी कागदपत्रे डी.सी.पी.श्री.रजपूत साहेब यांच्याकडे तपासासाठी पाठविलेली आहेत. त्यांनी आजही मला तेच सांगितले. मात्र दुसरा जो मुद्दा होता त्याबाबत सांगावयाचे तर अर्थसंकल्पावरील चर्चेच्या वेळी मी विधान सभा आणि विधान परिषदे मध्ये आश्वासन दिले, त्यानुसार श्री.नितीन करीर विक्रीकर आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता, त्यासंदर्भात चौकशी करण्याचे आदेश दिलेले असून, श्री.करीर यासंबंधातील चौकशी सुरु करतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, याबाबत मी प्रश्न विचारत असताना ऑन लाईन ज्या लॉटरी कंपन्या आहेत, त्यामध्ये सेरेड एन्टरप्राईज, झी, एफ-मार्टीन, सुगंध दमानिया, जलाराम, प्ले-वीन, मेनस्टार इ.आहेत व मी त्यांचा उल्लेख केला. मला त्याबाबत उत्तर अपेक्षित आहे. याठिकाणी माननीय मंत्री महोदय केवळ छापील लॉटरीबाबत सांगत आहेत. पण ऑन लाईन लॉटरीच्या विषयामध्ये भ्रष्टाचार झाला हे मी यापूर्वी देखील मांडले आहे आणि स्वत: माननीय वित्त

असुधारीत प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.36737 . . ..

श्री.विनोद तावडे . . ..

मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी सांगितले होते की, मी पावसाळी अधिवेशनामध्ये सर्व माहिती देईन. त्या दरम्यान मी पत्रे पाठविली पण त्याचे उत्तर आले नाही. आता आपले अर्थसंकल्पीय अधिवेशन सुध्दा संपत आले आहे. अशा वेळी या विषयाच्या बाबतीत सरकारने काय कार्यवाही केली आहे याबाबतीत माहिती पाहिजे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, मी हेच सांगत आहे की, पहिल्या भागातील 2005 ते 2007 या कालावधीच्या संदर्भात आपण इकॉनॉमिक ऑफेन्स विंगकडे सर्व माहिती दिलेली आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, याठिकाणी सभापती उपस्थित असावयास पाहिजेत. सदनातील मुख्य कामही तालिका सभापती करणार असतील तर त्याबद्दल आम्हाला कळले पाहिजे. हे बरोबर नाही. सदनामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाच्या वेळी माननीय सभापतीच असावयास पाहिजेत.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माझी सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री.विनोद तावडे व सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेबांना विनंती आहे आणि त्यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो बरोबर आहे. याठिकाणी प्रश्नोत्तराच्या तासाला माननीय सभापती उपस्थित होते. परंतु विधीमंडळाचे नेते आणि संसदीय कामकाज मंत्री काही चर्चा करण्यासाठी आले. त्यामुळे तालिका सभापती श्री.मोहन जोशी यांना यावे लागले आणि माननीय सभापती महोदय त्यांच्या बरोबर चर्चा करण्यासाठी गेले.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सभापतींबद्दल आमचे म्हणणे नाही. पण या ठिकाणी उप सभापती का आले नाहीत. ते मघाशी याठिकाणी उपस्थित होते.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील . . ..

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, असे बरोबर नाही. या सदनामध्ये सगळेच अवमूल्यन व्हावयास लागले आहे. आम्ही काल ते सहन केले, काही बोललो नाही. पण प्रत्येक गोष्टी मध्ये अवमान होणार असेल तर बरोबर नाही. तालिका सभापतींनी कधी बसावे हा मुद्दा आहे. याठिकाणी महत्वाचे प्रश्न विचारले जात आहेत,महत्वाचे कामकाज सुरु आहे आणि अशा वेळी माननीय सभापती असावयास पाहिजेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय सभापती येत आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सदनासमोर महत्वाचे कामकाज आहे. माननीय उप सभापती विधान भवनाच्या आवारात आहेत आणि मघाशी ते सदनामध्ये देखील होते.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : माननीय उप सभापती पाच मिनिटामध्ये सभागृहात येत आहेत . . . .

काही सन्माननीय सदस्य : तोपर्यंत सभागृहाचे कामकाज थांबविण्यात यावे.रावते साहेब ....

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात.)

श्री.दिवाकर रावते : सभापतींबद्दल आमचे म्हणणे नाही. पण माननीय उप सभापती येथे विधान भवनाच्या आवारात आहेत आणि ते मघाशी सभागृहामध्ये होते.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, ते पाच मिनिटांमध्ये येत आहेत तोपर्यंत . . ..

श्री.दिवाकर रावते : मी हे पहिल्यांदाच बघत आहे. या सदनामध्ये महत्वाचे कामकाज सुरु आहे. मघाशी याठिकाणी माननीय सभापती होते. आता माननीय उप सभापती यांनी सभागृहात आले पाहिजे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब यांनी उपस्थित केलेला मुद्दा महत्वाचा आहे. आपण आपल्या सभागृहामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाला एवढे महत्व दिले आहे की, 289 ची प्रस्तावाची सूचना महत्वाची असून सुध्दा आपण सर्वांनी मिळून असे ठरविले की, प्रश्नोत्तराचा तास संपल्यानंतर सदरहू प्रस्तावाची सूचना विचारात घ्यावी.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखीसाठी नाही

ता.प्र.क्र.36737....

श्री.विनोद तावडे...

माननीय सभापतींना विधिमंडळाच्या कामकाजासंबंधी तातडीने चर्चा करण्यासाठी जावे लागले हे आम्ही समजू शकतो. आम्ही तालिका सभापतींचे महत्व अजिबात कमी मानत नाही. माननीय उप सभापती विधिमंडळाच्या आवारात असतील तर त्यांनी येथे उपस्थित असावे एवढीच अपेक्षा आहे. अशी प्रथा पडावयास नको म्हणून सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी माननीय उप सभापतींनी बोलवावे असा जो मुद्दा उपस्थित केलेला आहे तो आपण मान्य करावा.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सभापती आणि माननीय उप सभापतींच्या गैरहजेरीत कामकाज चालविण्याकरिता तालिका सभापती नेमण्यात येतात. प्रश्नोत्तराच्या तासात माननीय सभापती किंवा माननीय उप सभापती उपस्थित असण्याचे कारण म्हणजे एखाद्या गंभीर प्रश्नासंबंधी शासनाला निदेश किंवा काही सूचना करण्याचा अधिकार त्यांना आहे. प्रश्नोत्तराचा तास सर्वात महत्वाचा आहे...

(सत्ताधारी पक्षातील काही सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री.अजित पवार : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रश्न विचारला त्याबाबत मी आणि माननीय राज्य मंत्री महोदयांनी देखील सांगितलेले होते की, सन 2005 ते 2007 या काळात लॉटरीच्या संदर्भात ज्या काही घटना घडल्या आहेत त्याबाबतची चौकशी ईओडब्ल्यू करीत आहे. मी अर्थसंकल्पाच्या वेळी देखील सांगितले होते की, या संदर्भात दीड-दीड टेम्पो कागदपत्रे आहेत. या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी माहिती दिली होती त्या संदर्भात मी अर्थसंकल्पाच्या चर्चेच्या वेळी आश्वासन दिले होते की, श्री.नितीन करीर,विक्रीकर आयुक्त यांच्यामार्फत ऑन लाईन लॉटरीची चौकशी करण्यात येईल. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले होते की, काही कंपन्यांकडून दुसऱ्यांची नावे दाखविण्या येतात आणि ॲक्शन घ्यायला लागले की ते निघून जातात व मूळ मालक पाठीमागे राहतो असे बरेचसे दाखले त्यांनी दिले होते. ती सर्व माहिती श्री.नितीन करीर यांच्याकडे दिलेली आहे. ते या संदर्भात खोलवर चौकशी करुन अहवाल देतील. यामध्ये जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर सक्त कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.36737....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील गैरव्यवहाराची एकूण रक्कम किती आहे, हे प्रकरण वित्त विभागाकडून गृह विभागाकडे केव्हा पाठविण्यात आले, गृह विभाग ही चौकशी केव्हा पूर्ण करणार आहे ? या विभागातील अधिकाऱ्यांना लॉटरीची तिकिटे लागली आहेत. अधिकारी अशाप्रकारे ब्लॅक पैसा व्हाईट करीत आहेत. तेव्हा या विभागातील किती अधिकाऱ्यांना लॉटरी लागली याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, एकूण सोडतीची संख्या 758, एकूण तिकिटांची संख्या 73.36 कोटी, छापण्यात आलेल्या तिकिटांची संख्या 18.62 कोटी, न छापलेल्या तिकिटांची संख्या 54.80 कोटी, छापण्यात आलेल्या तिकिटांपैकी परंतु विक्री इ ालेल्या तिकिटांची संख्या 7.35 कोटी, छापण्यात आलेल्या तिकिटांपैकी विक्री न झालेल्या तिकिटांची संख्या 11.82 कोटी आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, या संदर्भातील चौकशी केव्हा पूर्ण होईल. एक वर्षाच्या कालावधीमध्ये ही संपूर्ण चौकशी केली जाईल. इओडब्ल्यू कडून जो काही अहवाल येईल त्यानुसार जे कोणी अधिकारी किंवा विक्रेते दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल.

यानंतर श्री.बोर्डे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील अपंगत्वाचे दाखले ऑनलाईन देण्याबाबत करावयाची कार्यवाही

(२) * ३८१०४ श्रीमती विद्या चव्हाण : सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दृष्टिक्षीणता, कर्णबधिरता, शारीरिक विकलांगता, मतिमंदता व मनोरुग्ण असे अपंगत्वाचे दाखले ऑनलाईन देण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१२ च्या शेवटच्या सप्ताहात शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सुरेश शेट्टी : (१) अपंगत्व मूल्यमापन व अपंगत्व प्रमाणपत्र वितरण संगणकाद्वारे करण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात आली आहे.
(२) अपंगत्व मूल्यमापन व प्रमाणपत्र वितरण सदर संगणक प्रणालीद्वारे केले जात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कर्णबधिरता, दृष्टिक्षीणता, शारीरिक विकलांगता, मतिमंदता, गतिमंदता, मनोरुग्ण इत्यादींना ऑनलाईन पध्दतीने अपंगत्वाचे दाखले देण्याचा निर्णय मागच्या वर्षी घेण्यात आलेला आहे. परंतु या पध्दतीने दाखले देण्यामध्ये गैरप्रकार होतात व अपंगत्व प्रमाणपत्र मिळण्यास विलंब लागतो. 40 टक्के अपंगत्व असेल तर या माध्यमातून प्रमाणपत्र दिले जाते. या निमित्ताने मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छिते की, अशा प्रकारे अपंगत्वाचे प्रमाणपत्र देण्याची पध्दत संपूर्ण राज्यात सुरु झाली आहे काय, महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात किती अपंगांना या पध्दतीचा फायदा मिळू शकेल, तसेच ही पध्दत चांगल्याप्रकारे राबविण्यासाठी यशस्वी झाली आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. महाराष्ट्र राज्याने अपंगांना ऑनलाईनने प्रमाणपत्र देण्याचा निर्णय 2012 मध्ये घेतला. दि.3 डिसेंबर, 2012 व दि.22 जानेवारी, 2013 रोजी सॉफ्टवेअर इन्स्टॉल करुन 33 जिल्हा रुग्णालय, खामगाव, उल्लासनगर व मालेगांव या सामान्य रुग्णालयात, राज्यातील 14 वैद्यकीय महाविद्यालयात आणि ऑल इंडिया इन्स्टिटयूट ऑफ फिजिकल डिसॅबिलिटी, मुंबई, अशा प्रकारे एकूण 41 ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने अपंगत्वाचा दाखला देण्याचे काम सुरु केले आहे. आजपर्यंत 6101 अपंगांना ऑनलाईनने अपंगत्व प्रमाणपत्र दिले आहे. ही वेबसाईट सर्वसामान्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38104....

श्री.सुरेश शेट्टी....

लोकांसाठी आहे. आपण सुध्दा ती वेबसाईट उघडून दररोज किती प्रमाणपत्र वितरित करण्यात आलेली आहेत हे पाहू शकता. येत्या डिसेंबर महिन्यापर्यंत सर्व जिल्हा उप रुग्णालयांत सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर बसविण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अपंगत्वाचे मूल्यमापन आणि प्रमाणपत्र वितरणाबाबतचा उल्लेख लेखी उत्तरात करण्यात आलेला आहे. मी अपंगत्व प्रमाणपत्राच्या वितरणाबाबत समजू शकतो. पंरतु क्वॉंटीफिकेशन ऑफ फिजिकल डिसॅबिलिटी उदा.अंधत्व, डेफनेस हे अपंगत्व परमनंट आहे की टेंपररी, ते अपंगत्व संगणक कसे क्वॉंटीफाय करेल ? कारण या बाबी सब्जेक्टीव्ह स्वरुपाच्या असतात. शरीराच्या कोणत्या भागाची किती हालचाल कमी झाली आहे किंवा कोणत्या अवयवाचे कोणते फंक्शन कमी झाले आहे या बाबतच्या क्वॉंटीफिकेशनसाठी ऑनलाईन संगणक कसे काम करु शकेल ? दुसरी गोष्ट ही मूल्यमापनाची आहे. मुळात प्रत्येक जिल्हा सामान्य रुग्णालयात सिव्हील सर्जनच्या अध्यक्षतेखाली अपंगांसाठी एक बोर्ड आहे. त्याचे अध्यक्ष सिव्हील सर्जन असतात. सिव्हील सर्जन यांच्यासोबत एक तज्ज्ञ आणि आणि फॉरेन्सिक एक्स्पर्ट त्या ठिकाणी असतात. ते टीम वर्क असते. त्या टीमला मूल्यमापनासाठी ऑनलाईनशी कसे जोडणार आहात ? तसेच सर्वच स्पेशालिटीसाठी आपला प्रिस्क्राईब्ड फॉर्मेट एकच आहे. वास्तविक पाहता क्वॉंटीफिकेशनसाठी तसेच प्रत्येक स्पेशालिटीसाठी आपला प्रिस्क्राईब्ड फॉर्मेट वेगवेगळा असायला पाहिजे. जेव्हा प्रकरण न्यायालयात जाते आणि डॉक्टर मंडळी साक्षीसाठी जातात, त्यावेळी अनेक बाबी निदर्शनास येतात. त्यामुळे आपला प्रिस्क्राईब्ड फॉर्मेट प्रत्येक स्पेशालिटीसाठी वेगळा असणार काय ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी महत्त्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. आतापर्यंत अपंगत्वाचा दाखला सिव्हील सर्जन किंवा प्राधिकृत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून दिला जात होता. ते अपंगाचे इन्स्पेक्शन करुन किती टक्के अपंगत्व आहे हे निश्चित करुन अपंगत्वाचा दाखला देत होते. त्यामध्ये इन्फ्ल्युअन्स करण्यास वाव होता. त्यामुळे नवीन सॉफ्टवेअर विकसित केले. आपल्या राज्यात आणि आंध्र प्रदेश राज्यात ते सॉफ्टवेअर युटीलाईज

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38104....

श्री.सुरेश शेट्टी....

होत आहे. या सॉफ्टवेअरमध्ये 140 प्रकारचे प्रश्न आहेत. जी व्यक्ती अपंगत्वाच्या दाखल्यासाठी अर्ज करते त्या व्यक्तीला 140 प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतात. अपंगांकडून जी उत्तरे मिळतात त्याची एंट्री वैद्यकीय अधिकारी करतात.

नंतर श्री.बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

ता. प्र. क्र. 38104 ..... श्री. सुरेश शेट्टी ....

ऑर्थोपेडीकमध्ये लिंब मूव्हमेंटची टेस्ट असते. लिंब मूव्हमेंट किती टक्के आहे त्याप्रमाणे डाटा एंट्री करण्यात येते. डिसॲबिलिटीचे किती पर्सेंटेज आहे ते सॉफ्टवेअर निश्चित करणार. यामध्ये इन्फ्लुअन्स होण्याची अजिबात शक्यता नाही. या सिस्टिमची अंमलबजावणी केल्यानंतर यामध्ये पूर्णपणे पारदर्शकता येणार आहे. हे आपण यासाठी करीत आहोत की, आमच्या डॉक्टर्सवर फार राजकीय दबाव येतो, आमच्यावर दबाव येतो की, अमक्याला 40 टक्केचे प्रमाणपत्र द्या, अमक्याला 50 टक्केचे प्रमाणपत्र द्या. केंद्र शासनाचा 40 टक्केचा नॉर्म आहे. आपण आपल्या लोकांना मोठ्या प्रमाणावर सुविधा देतो. त्यामुळे जे अपंग नाहीत त्यांना सुध्दा अपंगाचे प्रमाणपत्र पाहिजे. आपण आता हे सॉफ्टवेअर बसवून ऑनलाईन पारदर्शक प्रोसेस करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज सकाळचा जो अद्ययावत डाटा आहे त्यानुसार 11 हजार 132 लोकांनी अर्ज केले हाते त्यापैकी 6 हजार 101 लोकांना डिसॲबिलिटी सर्टिफिकेट दिले. 1 हजार 7 लोकांचे फॉर्म रिजेक्ट झाले. आता डेली रिपोर्ट जनरेट होतो. आपण आताही कोणत्या हॉस्पिटलमधून किती प्रमाणपत्र दिले गेले हे वेबसाईटवर जाऊन पाहू शकता. आपण हा जो नवीन कार्यक्रम हाती घेतलेला आहे त्यामध्ये पूर्णपणे पारदर्शकता आणून ज्यांनी बोगस डिसॲबिलिटी सर्टिफिकेट्स घेतलेले आहेत त्यांना आपण विड-आऊट करण्याचा प्रयत्न करतो.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, अपंगांच्या दृष्टीकोनातून ही एक अतिशय महत्वाची सुविधा राज्य शासनाने आणि आपल्या खात्याने उपलब्ध करुन दिलेली आहे त्याबद्दल खरोखर आपले अभिनंदन करावेसे वाटते. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे शेवटी फिजिकल टेस्ट तेथील अधिकाऱ्यांनीच घ्यावयाची असते आणि नंतर तो फॉर्म कॉम्प्युटरवर ऑनलाईन भरुन द्यावयाचा असतो. त्यामध्येच काही तरी घोटाळा होण्याची शक्यता असते. दुसरी बाब अशी की, यातील ज्या डिफाईन्ड डिसॲबिलिटीज आहेत म्हणजे यामध्ये दृष्टिक्षीणता म्हटले आहे त्यामध्ये एकूण दृष्टिहीनता हा एक प्रकार झाला. तसेच आपण मतिमंदता म्हटले आहे. तसेच गतिमंदता आहे. आज ॲटॉस्टिक मुलांना अजूनही कोणत्याही प्रकारचे सर्टिफिकेट मिळते की नाही याबद्दल

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 38104 ..... श्री. हेमंत टकले ....

शंका आहे. त्यामध्ये मल्टीपल डिसॲबिलिटीची तिसरी कॅटेगरी राहून जाते. म्हणजे एकापेक्षा अधिक अवयवांना डिसॲबिलिटी असेल म्हणजे दृष्टीही नाही आणि ऐकताही येत नाही, अशा कॅटेगरीचा समावेश आपल्या कार्यक्रमामध्ये केला आहे का ? एकदा ऑनलाईन प्रोसेस केल्यानंतर कोणीही जावे आणि अर्ज करावा असे असले तरी यासाठी शासन काही विशेष उपक्रम करुन प्रत्येक सिव्हिल हॉस्पिटलमध्ये त्यांना मार्गदर्शन करुन, त्यांच्याकडून ऑनलाईन माहिती भरुन घेऊन त्यांना तेथल्या तेथे सर्टिफिकेट मिळण्याची व्यवस्था शासन करणार का ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, 6.10.2012 ला जो जी.आर. काढलेला आहे त्यात सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या सर्व मुद्यांचा समावेश केलेला आहे. व्हिज्युअल इम्पेरमेंट, लोकोमिटर ऑर्थोपॅडीक डिसॲबिलिटीज, स्पिच अँड हिअरींग डिसॲबिलिटीज, मेंटल रिटार्टेशन आणि मल्टिपल डिसॲबिलिटीज या सर्व बाबींचा समावेश नवीन जी.आर. मध्ये केलेला आहे. प्रत्येक सिव्हिल हॉस्पिटलमध्ये एक समिती सिव्हिल सर्जन यांच्या अध्यक्षतेखाली क्लिनिकल कमिटी आणि कन्सल्टन्स स्पेशालिस्टची कमिटी स्थापन केलेली आहे ते पेशन्टला तपासून त्याची डिसॲबिलिटी टेस्ट करुन संगणकामध्ये फीड करतात आणि किती टक्के डिसॲबिलिटी आहे हे संगणक निश्चित करतो. आता आपण हे आधार कार्डशी लिंकअप करीत आहोत. प्रत्येक जी डिसॲबिलिटी सर्टिफिकेट्स दिलेली आहेत त्यांचा सेंट्रलाईज्ड बेस आपण मुंबईत करीत आहोत. संपूर्ण महाराष्ट्र राज्यात किती डिसअेबल लोक आहेत, त्यांचे सर्टिफिकेट कोठे इश्यू झाले, कोणत्या जिल्ह्यात सर्टिफिकेट इश्यू झाले, कोणत्या तालुक्यात सर्टिफिकेट इश्यू झाले, यामध्ये डुप्लीकेशन होऊ नये म्हणून आपण सेंट्रलाईज्ड बेस तयार केलेला आहे. प्रत्येक डिसअेबल व्यक्तीला 40 टक्केपेक्षा जास्त डिसॲबिलिटी असेल किंवा कमी असेल, त्यांना आयडेंटीटी कार्ड इश्यू करण्याचे काम हाती घेतले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सर्व योजना समजावून सांगितली. आपण याचे संगणकीकरण केले हे बरोबर आहे. आपण संगणकीकरणावरुन दाखले देणार हे देखील बरोबर आहे पण जो फिजिकल एक्झामिनेशनचा पार्ट असतो तो आजही अनुत्तरित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ D

ता. प्र. क्र. 38104 ..... डॉ. दीपक सावंत ....

संगणकीकरण आणि फिजिकल एक्झामिनेशन या दोघांची जर सांगड घातली तर आपल्याला अतिशय चांगले रिझल्टस मिळतील. कारण ऑनलाईन पेपर्स तपासावयाचे असले तरी त्यामध्ये अनेक चुका होतात.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38104..... डॉ.दीपक सावंत.....

त्यामुळे शासनाने प्रश्नावली तयार करुन ती कॉम्युटरमध्ये फिड करुन एखाद्याला डिसॲबिलिटी किती आहे ते समजत असेल. परंतु या योजनेचा पुनर्विचार करण्याची आवश्यकता आहे असे सन्माननीय सदस्य डॉ.रणजित पाटील यांनी सांगितले आहे. त्यामुळे अपंग व्यक्तीची फिजिकल एक्झॅमिनेशन केल्यानंतर संगणकाचा आधार घेतला तर ही योजना अधिक फुलफिल होईल असे मला वाटते. याबाबत शासन विचार करणार आहे काय ?

श्री.सुरेश शेट्टी : ही योजना राबविण्यापूर्वी 256 वैद्यकीय अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिलेले आहे. ठाणे जिल्ह्यात 122 आणि पुणे जिल्ह्यातील 134 डॉक्टरांना प्रशिक्षित केलेले आहे. पुढील काळातही प्रशिक्षणाची प्रक्रिया सुरु राहणार आहे. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी एखाद्या सिव्हिल हॉस्पिटलला भेट द्यावी. सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे माझे मित्र आहेत. त्यामुळे ते मला केव्हाही सल्ला देऊ शकतात. त्यांनी केलेल्या सूचना जरुर या योजनेत समाविष्ट केल्या जातील. Our intention is to make a perfect machinery in the State to give disability certificate. I am ready to sit with Hon. Member Shri Deepak Sawant and discuss with him.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मातोरी - तिंतरवणी (ता.शिरुर,जि.बीड) येथे 33 के.व्ही.उपकेंद्राचे काम त्वरित सुरु करण्याबाबत

(3) * 38271 श्री.एम.एम.शेख, श्री.सतीश चव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) मातोरी-तिंतरवणी (ता.शिरुर,जि.बीड) या रस्त्यालगत शासनाने 33 के.व्ही. उपकेंद्र मंजूर केले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदरचे 33 के.व्ही. उप केंद्राचे काम सुरु न होण्याची कारणे काय आहेत,

(3) तसेच दुष्काळी परिस्थितीमुळे 33 के.व्ही. चे काम सुरु होण्याकरिता कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेंद्र मुळक, श्री.अजित पवार यांच्याकरिता : (1) होय, हे खरे आहे.

(2) सदर उपकेंद्र उभारण्याचे कंत्राट मे.महाॲक्टिव इंजिनिअर्स, औरंगाबाद या कंपनीला देण्यात आले आहे. या उपकेंद्रासाठी 33 के.व्ही. उच्चदाब वाहिनी 26 कि.मी., 11 के.व्ही. वाहिनी, 4 कि.मी. व 5 एम.व्ही.ए. क्षमतेचा पॉवर ट्रान्सफॉर्मर प्रस्तावित आहे. त्यापैकी 33 के.व्ही. वाहिनीचे 18 कि.मी.व 11 के.व्ही. वाहिनीचे काम 4 कि.मी. पर्यंत पूर्ण करण्यात आले आहे.

(3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.एम.एम.शेख : सभापती महोदय, मातोरी-तिरवणी येथील 33 के.व्ही.च्या उपकेंद्राचे काम दोन वर्षांपासून संथ गतीने सुरु आहे. या उपकेंद्राचे केवळ 25 टक्के काम झालेले आहे. बीड जिल्ह्यातील दुष्काळी भागातील मातोरी-तिंतरवणी हे गाव आहे. त्या गावात विजेचा दाब अत्यंत कमी असल्यामुळे हे उपकेंद्र मंजूर झालेले आहे. हा भाग दुष्काळी असल्यामुळे शासनामार्फत टँकरने पाणी पुरवठा केला जातो. परंतु विजेचा दाब कमी असल्यामुळे विहिरीवरील मोटर्स चालत नाहीत. त्यामुळे विहिरीवर 5-5 तास टँकर उभे असतात. या परिस्थितीत सुधारणा होण्यासाठी या उपकेंद्राची उर्वरित कामे किती दिवसामध्ये पूर्ण केली जाणार आहेत ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, आरईसी योजनेंतर्गत या गावातील उपकेंद्राचे काम घेण्यात आले आहे. रुरल इलेक्ट्रिफिकेशन कॉर्पोरेशन प्रोजेक्ट सिस्टिम इम्प्रूव्हमेण्ट अंतर्गत हे काम घेण्यात आलेले आहे. इतरही उपकेंद्राची कामे करीत असताना 33 के.व्ही.च्या उपकेंद्रासाठी 26 कि.मी.पैकी 18 कि.मी.लाईनचे काम पूर्ण केलेले आहे. या उपकेंद्राची बरीच कामे केलेली आहेत. उर्वरित कामे दि.31 मे, 2013 पर्यंत पूर्ण करण्यात येतील.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38271.....

श्री.विनायक मेटे : शासनाने या उपकेंद्राचे काम सुरु केले आहे. या उपकेंद्राचे काम मे.महाॲक्टिव इंजिनिअर्स, औरंगाबाद या कंपनीला दिले आहे. हे कंत्राट केव्हा देण्यात आले आणि काम पूर्ण करण्याची मुदत किती होती ? या कामासाठी विलंब होण्याची कारणे काय आणि ज्यांच्यामुळे हा विलंब झालेला आहे त्यांच्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या उपकेंद्राचे कंत्राट मे.महाॲक्टिव इंजिनिअर्स, औरंगाबाद या कंपनीला दिलेले आहे. या कामाला थोडासा विलंब झालेला आहे. कारण या उपकेंद्रासाठी जागा उपलब्ध होत नव्हती. परंतु सर्व्हे नं.87 वरील शासकीय जागा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या उपकेंद्राच्या कामाचे कंत्राट दिनांक 29.12.2011 रोजी दिलेले आहे. त्यानंतर उपकेंद्राची कामे सुरु झालेली आहेत. या 33 के.व्ही.च्या वाहिनीसाठी 26 कि.मी.पर्यंत लाईन टाकणे, 11 के.व्ही.साठी 4 कि.मी.पर्यंत लाईन टाकणे. तसेच 5 एम.व्ही.ए.साठी रोहित्रे व स्थापत्याची कामे समाविष्ट आहेत. या उपकेंद्राची जास्तीत जास्त कामे झालेली आहेत. अंशत: शिल्लक असलेली कामे दि.31 मे पर्यंत पूर्ण केली जातील.

श्री.विनायक मेटे : लेखी उत्तरात 33 के.व्ही.वाहिनीचे 18 कि.मी.चे व 11 के.व्ही.वाहिनीचे काम 4 कि.मी.पर्यंत पूर्ण झालेले आहे असे नमूद केलेले आहे. म्हणजे जवळपास कामे पूर्ण झालेली आहेत.

श्री.राजेंद्र मुळक : लेखी उत्तर तयार करीत असताना ती स्थिती होती. आता जी माहिती उपलब्ध झाली आहे, ती आजची स्थिती आहे.

श्री.अजित पवार : लेखी उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, 33 के.व्ही.वाहिनीचे 26 कि.मी.पैकी 18 कि.मी.चे काम पूर्ण झालेले आहे. 11 के.व्ही.वाहिनीचे 4 कि.मी.चे सर्व काम पूर्ण झालेले आहे असे नमूद केलेले आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

5 एम.व्ही.ए रोहित्राच्या स्थापत्याचे काम प्रगतीपथावर आहे. आता आपण एप्रिल महिन्यामध्ये आहोत. 31 मे 2013 पर्यंत 8 कि.मी.चे काम पूर्ण होऊन मातोरी-तिंतरवणी सबस्टेशन कार्यान्वित केले जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील क्रीडा प्रशिक्षणासाठी क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याबाबत

(४) * ३७३६७ श्री.जयवंतराव जाधव, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.दिपकराव साळुंखे, श्री.रमेश शेंडगे, श्री.अनिल भोसले : सन्माननीय **क्रीडा व युवक कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये चांगले खेळाडू घडविण्यासाठी साडेसहाशे प्रशिक्षकांची गरज असताना केवळ सव्वाशे क्रीडा प्रशिक्षकांवर खेळाडू घडविण्याची जबाबदारी दिल्याने राज्याची क्रीडा क्षेत्रात पिछेहाट होत असल्याचे माहे जानेवारी, २०१३ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये क्रीडा प्रशिक्षकांना प्रशिक्षणासाठी क्रीडा प्रशिक्षण केंद्र नसल्याने क्रीडा प्रशिक्षक तयार होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यामध्ये उच्च दर्जाचे खेळाडू तयार करण्यासाठी आवश्यकतेनुसार प्रशिक्षकांची नेमणूक करण्यासाठी तसेच बंगळूर पतियाळाच्या धर्तीवर क्रीडा प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. पद्माकर वळवी : (१) नाही.

(२) क्रीडा प्रशिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या भारतीय क्रीडा प्राधिकरणामार्फत एनआयएस हा एकवर्षीय अभ्यासक्रम देशात ५ ठिकाणी चालविण्यात येतो. तथापि, राज्यामध्ये या अभ्यासक्रमासाठी केंद्र अस्तित्वात नाही, हे खरे आहे.

(३) व (४) राज्याचे क्रीडा धोरण, २०१२ मध्ये राज्यात क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्याची बाब समाविष्ट असून, या क्रीडा विद्यापीठाअंतर्गत क्रीडा मार्गदर्शक घडविण्यासाठी एनआयएसच्या धर्तीवर अभ्यासक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे.

श्री. जयवंतराव जाधव : नुकत्याच साऊथ कोरिया या ठिकाणी झालेल्या जागतिक नेमबाजी स्पर्धेमध्ये राही सरनौबत या खेळाडूने सुवर्ण पदक पटकावून भारताची मान उंचावलेली आहे. क्रीडा मागदर्शक घडविण्यासाठी एनआयएसच्या धर्तीवर अभ्यासक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. हा अभ्यासक्रम केव्हा सुरु करण्यात येणार आहे ? बालेवाडी येथील शिव छत्रपती क्रीडा संकुलाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी कोणाची आहे ? त्या ठिकाणी राष्ट्रीय खेळाडूंना चांगल्या प्रकारची वागणूक मिळत नाही, त्यांना तेथे अधिक फी द्यावी लागते, अधिक खर्च करावा लागतो. या बाबतीत राज्याचे क्रीडा खाते किंवा माननीय क्रीडा मंत्री किती दिवस बघ्याची भूमिका घेणार आहे ? त्या ठिकाणी खेळाडूंना काही सवलती देण्यात येणार आहेत काय ?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 37367....

ॲड. पद्माकर वळवी : राही सरनौबत या खेळाडूने जागतिक नेमबाजी क्रीडा स्पर्धेमध्ये विश्वविक्रम करुन सुवर्ण पदक पटकावलेले आहे ही निश्चितच अभिनंदनीय बाब आहे. शिव छत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी या ठिकाणी प्रशिक्षण चांगल्या प्रकारे चालू आहे. पटियाला किंवा एनआयएसच्या धर्तीवर प्रशिक्षण केन्द्र काढणार आहात काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला. त्याचे उत्तर "होय" असे आहे. एनआयएसच्या धर्तीवर प्रशिक्षण केन्द्र स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. एनआयएसचा अभ्यासक्रम सुरु करण्याचे प्रस्तावति आहे. लवकरात लवकर तो सुरु करण्यात येईल. बालेवाडी येथील शिव छत्रपती क्रीडा संकुल हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडा संकुल आहे. या क्रीडा संकुलाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी सचिव, क्रीडा यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे आहे. या क्रीडा संकुलामध्ये एखाद्या खेळाडूला स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी अधिक फी द्यावी लागते ही गोष्ट खरी आहे. सध्या सचिव, क्रीडा यांच्या अध्यक्षतेखालील समिती या बाबतीत निर्णय घेत असते. खेळाडूंना अधिक फी द्यावी लागते ही बाब शासनाच्या लक्षात आलेली आहे. त्या ठिकाणी खेळाडूकडून फी घेणे, त्याना सुविधा उपलब्ध करुन देणे अशा धोरणात्मक बाबी संबंधी निर्णय घेण्यासाठी बालेवाडी येथील शिव छत्रपती क्रीडा संकुलाचे व्यवस्थापन शासन स्वत:च्या ताब्यात घेणार आहे. शासनाच्या नेतृत्वाखाली तेथील व्यवस्थापन केले जाईल. मी आश्वासन देऊ इच्छितो की, पुढच्या दोन-तीन महिन्यामध्ये फीच्या संदर्भात तसेच खेळाडूंना द्यावयाच्या सुविधांच्या संदर्भात धोरणात्मक निर्णय घेण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : प्रत्येक अर्थसंकल्प सादर करताना क्रीडा धोरण जाहीर होणार असे सांगितले जाते. राज्यामध्ये चांगले खेळाडू आहेत. बालेवाडी येथील क्रीडा संकुलामध्ये चांगले खेळाडू घडविण्याची व्यवस्था केलेली आहे. या संकुलाचे व्यवस्थापन सचिव, क्रीडा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समिती मार्फत केले जाते असे मंत्री महोदयांनी सांगितले. चांगले खेळाडू घडविण्यासाठी चांगल्या प्रशिक्षकाची गरज असते. प्रत्येक खेळाला एक टाईम-स्पॅन आहे.कबड्डी, बॉक्सिंग, फूटबॉल, बास्केट बॉल अशा खेळांसाठी वेगवेगळा टाईम-स्पॅन आहे. क्रीडा मार्गदर्शक घडविण्यासाठी एनआयएसच्या धर्तीवर अभ्यासक्रम सुरु करण्याचे प्रस्तावित आहे असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. हा अभ्यासक्रम निश्चित केव्हा सुरु करण्यात येणार आहे ?

....नंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सभापती महोदय, सुवर्ण पदक विजेचे खेळाडू पुरस्कार प्राप्त झाल्यानंतर सत्कार समारंभात जाहीरपणे सांगतात की, राज्यात चांगल्या प्रशिक्षणाची व्यवस्था नव्हती, तरी मी यश साध्य केले आहे. अशा प्रकारचे उत्तर आणखी किती काळ ऐकणार आहात? आज राज्यात 600 प्रशिक्षणार्थींची गरज असताना फक्त 125 प्रशिक्षणार्थी उपलब्ध आहेत. त्यामुळे प्रशिक्षणार्थी घडविण्यासाठी लागणारा कालावधी किती आहे? मी स्वत: बालेवाडी क्रीडा संकुलाला भेट दिली आहे. तेथील व्यवस्था सचिवांच्या ताब्यात दिली असल्याचे मंत्री महोदयांनी सांगितले. तेथील अवस्था सदनासमोर मांडावी. या क्रीडा संकुलाची परिस्थिती फार वाईट आहे. त्यात सुधारणा करण्यासाठी ठोस धोरण आखणार आहात काय?

ॲड.पद्माकर वळवी : सभापती महोदय, बालेवाडी क्रीडा संकुलाचा कारभार सचिव, क्रीडा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीकडे आहे. ही समिती बरखास्त केली जाईल आणि मंत्री, क्रीडा यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या समितीमध्ये अशासकीय सदस्य म्हणून क्रीडा क्षेत्रातील विविध संस्थांचे प्रमुख, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते यांचा समावेश असलेली राज्य स्तरावरील समिती गठीत केली जाईल. याचे संचलन चांगल्याप्रकारे होईल याची पूर्ण दक्षता घेतली जाईल. राज्याच्या लोकसंख्येच्या मानाने क्रीडा प्रशिक्षक पुरेसे असणे आवश्यक आहे. सध्या 123 क्रीडा मार्गदर्शक कायमस्वरुपी असून 85 क्रीडा प्रशिक्षक मानधनावर तर तालुका क्रीडा प्रशिक्षण केंद्रांवर 152 क्रीडा मार्गदर्शक कार्यरत आहेत. ही प्रशिक्षकांची संख्या फक्त 360 आहे. खूप मोठया संख्येने क्रीडा मार्गदर्शकांची गरज आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत एवढेच सांगू इच्छितो की, एनआयएसच्या धर्तीवर मार्गदर्शक प्रशिक्षण केंद्र बालेवाडी क्रीडा संकुलामध्ये चार महिन्यांच्या आत गठीत केले जाईल. बालेवाडी क्रीडा संकुलाच्या परिस्थितीबाबत मुद्दा मांडण्यात आला आहे. बालेवाडी क्रीडा संकुलाची स्थिती, तेथे कशा पध्दतीने फी आकारली जाते त्याची माहिती पटलावर ठेवली जाईल.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोल्हापूर शहरातून आंतरराष्ट्रीय किर्तीचे खेळाडू तयार झाले आहेत. कोल्हापूर येथील दुधाळी रेंज येथून नेमबाज नवनाथ फरकाडे, तेजस्विनी सावंत आणि राही सरनोबत यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर यशाचे शिखर गाठले. त्या दुधाळी रेंजची स्थिती अत्यंत दयनीय आहे हे खरे आहे काय?

सभापती महोदय, कोल्हापूर येथे विभागीय क्रीडा संकुल करण्याचा निर्णय पाच वर्षापूर्वी शासनाने घेतला होता. मागील पाच वर्षात या क्रीडा संकुलाच्या दृष्टीने प्राथमिक तयारी सुध्दा झालेली नसताना 8 कोटी रुपये खर्च होऊन अनेक प्रकारची भ्रष्टाचाराची प्रकरणे समोर आली आहेत. सध्या या विभागीय क्रीडा संकुलाचे काम बंद आहे हे खरे आहे काय?

ॲड.पद्माकर वळवी : कोल्हापूर येथील विभागीय क्रीडा संकुलाबाबत माननीय सदस्यांनी मुद्दा मांडला आहे. विभागीय क्रीडा संकुलाचे काम सुरु आहे. काही सुविधा पूर्ण झाल्या असून काही अपूर्ण आहेत. त्यातल्या त्यात खास करुन नेमबाजीचा सराव केला जातो त्या शूटिंग रेंजची गुणवत्ता निश्चितपणे तपासून घेतले जाईल आणि त्यात सुधारणा केली जाईल. शूटिंग रेंज बंद असेल तर माहिती घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यात येईल.

सभापती : क्रीडा विषयक अत्यंत महत्वाचा विषय चर्चेला आलेला आहे. या विषयाबाबत कितीही उप प्रश्न उपस्थित झाले तरी त्यातून समाधान करता येईल असे मला वाटत नाही. म्हणून मी असे ठरविले आहे की, माझ्या दालनात सर्व संबंधित सदस्य, क्रीडा मंत्री, क्रीडा क्षेत्रातील अन्य मान्यवरांना बोलावून क्रीडा क्षेत्राच्या दृष्टीने राज्यामध्ये आणखी काय केले पाहिजे या संदर्भात आपण निश्चितपणे चर्चा करु. मी आता पुढील प्रश्न पुकारीत आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे शहरातील बालेवाडी क्रीडा संकुल स्थापन करण्यामागचा उद्देश दर्जेदार व आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार करणे हा होता. या क्रीडा संकुलाकडून 1.25 लाख रुपये भाडे आकारले जात असल्यामुळे क्रीडा संघटना भाड्याने जागा घेऊ शकत नाही. जागेचे भाडे कमी करण्यात यावे अशी क्रीडा संघटनांनी वारंवार शासनाकडे मागणी केली आहे.

नंतर 2इ.1...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी ....

भाडे कमी करण्याच्या संदर्भात शासनाकडे एखादी योजना विचाराधीन आहे का ? तसेच, एक वर्षापूर्वीच जाहीर केलेल्या क्रीडा धोरणाची अंमलबजावणी केव्हा करणार आहात ?

ॲड. पद्माकर वळवी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर आहे. शिवछत्रपती बालेवाडी क्रीडा संकुल खेळाडूंच्या स्पर्धांसाठी माफक दरात उपलब्ध व्हावे, ही मागणी रास्त आहे. युवा राष्ट्रकुल स्पर्धेसाठी सचिव, क्रीडा विभाग यांच्या स्तरावर समिती बनविली होती. परंतु, शासनाने वेळोवेळी निर्देश देऊन सुध्दा त्यांच्याकडून भाड्यामध्ये कोणत्याही प्रकारची सवलत दिली जात नाही, ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. त्यामुळे एक महिन्याच्या आत सचिव स्तरावरील समिती बरखास्त करण्यात येईल आणि मंत्री, क्रीडा विभाग यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून सर्व सुधारणा केल्या जातील.

ॲड. निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. "केवळ 125 प्रशिक्षकांच्या हाती राज्याचे क्रीडा भवितव्य", अशा आशयाची बातमी वृत्तपत्रात आली आहे, प्रशिक्षण केंद्र नसल्याने अनेक जण खेळांकडे पाठ फिरवित आहेत, हे खरे आहे का ? माननीय मंत्र्यांनी क्रीडा धोरणांतर्गत क्रीडा विद्यापीठाची स्थापना करण्याबाबत सांगितले आहे. क्रीडा विद्यापीठ कधी आणि कुठे स्थापन करण्यात येणार आहे ?

ॲड. पद्माकर वळवी : सभापती महोदय, राज्याचे क्रीडा विद्यापीठ लवकरच स्थापन करण्याबाबात कार्यवाही केली जाईल. राज्यात क्रीडा मार्गदर्शकांची फार मोठ्या प्रमाणात गरज आहे. ती गरज पूर्ण करण्यासाठी, एनआयएच्या धर्तीवर बालेवाडी क्रीडा संकुलात प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षण अभ्यासक्रम 4 महिन्यांत सुरू करण्यात येईल आणि राज्यातील क्रीडा मार्गदर्शकांची कमतरता भरून काढली जाईल.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गडचिरोली जिल्ह्यातील बंधाऱ्यांच्या कामासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

(5) * 38549 श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(1) गडचिरोली जिल्ह्यात तीन दशकांपूर्वी 22 सिंचन प्रकल्पांना मंजुरी मिळाली, परंतु वनकायद्यामुळे तसेच जिल्ह्यातून बारमाही वाहणाऱ्या वैनगंगा नदीवर सन 2003 मध्ये पाच बंधाऱ्यांना मंजुरी मिळली तरीही पाणीवाटप प्रमाणपत्रासाठी आजतागायत दोन हजार कोटीचे बंधारेही पूर्ण झाले नसल्याचे दिनांक 25 डिसेंबर, 2012 रोजी वा त्या सुमारास आढळून आले, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी इतर बंधाऱ्यांच्या कामासाठी तातडीने निधी उपलब्ध करुन देण्यासाठी पाटबंधारे विभागाकडे वारंवार पाठपुरावा केला आहे व करीत आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, पाणीवाटप प्रमाणपत्राअभावी सदर बंधारे पूर्ण होऊ शकले नसल्याने सिंचनापासून जिल्ह्यातील शेतकरी वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(4) असल्यास, उक्त प्रकरण निकाली काढण्यासाठी शासनाने तातडीने काय कार्यवाही केली आहे वा करणार आहे,
(5) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. राजेंद्र मुळक, श्री. सुनील तटकरे यांच्याकरिता : (1) अंशत: खरे आहे, तीन दशकापूर्वी गडचिरोली जिल्ह्यात 13 प्रकल्पांना मंजुरी मिळाली होती. परंतु या वन बाधित प्रकल्पासाठी आवश्यक वनजमीनीचे हस्तांतरणास मान्यता मिळू शकली नाही.

वैनगंगा नदीवर गडचिरोली जिल्ह्यात 5 बंधाऱ्याची साखळी प्रस्तावित आहे. यापैकी चिचडोह व कोटगल या दोन बंधाऱ्यांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. चिचडोह बॅरेज करिता निधी उपलब्ध करुन देण्यात येऊन त्याचे बांधकाम प्रगती पथावर आहे. कळमगाव बंधाऱ्याचा प्रकल्प अहवाल छाननीत आहे. मुल्लुर व येनबोथला या वैनगंगा नदीवरील तसेच अन्य नद्यांवरील बॅरेज बाबत अभ्यास सुरु आहे.
(2) होय.
(3) नाही.
(4) प्रश्न उद्भवत नाही.
(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, गडचिरोली जिल्ह्यात 3 दशकांपासून 22 सिंचन प्रकल्पांना मंजुरी मिळालेली आहे. परंतु, आजतागायत 2 हजार कोटी रूपयांचे बंधारे पूर्ण झालेले नाहीत. लोकप्रतिनिधींनी या संदर्भात अधिक निधी मिळण्यासाठी शासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला आहे परंतु, शासनाने या संदर्भात कोणतीही पावले उचललेली नाहीत. गडचिरोली जिल्ह्यात

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

वैनगंगा नदीवर 5 बंधारे प्रस्तावित आहेत. गोदावरी खोऱ्यातील प्राणहिता उप खोऱ्यामध्ये वैनगंगा नदीपासून वाया जाणारे पाणी तापी खोऱ्यात कुरणा खोऱ्यापर्यंत वळते करण्याची योजनेत तरतूद आहे. शासन वैनगंगा पाणी प्रकल्पाचे काम पूर्ण करण्यासाठी टाईमबाऊंड प्रोग्रॅम हाती घेणार का व यासाठी जास्तीत जास्त निधीची तरतूद बजेटमध्ये करणार का ?

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, हे खरे आहे की, गडचिरोली जिल्ह्यातील टोपोग्राफी ही वनांनी व्याप्त झाली आहे. वैनगंगा नदीवर 5 बंधारे प्रस्तावित आहेत आणि त्या माध्यमातून त्या भागात सिंचन निर्माण करावे, अशी संकल्पना आहे. चीचडोह बॅरेजला दिनांक 09.03.2009 ला 124.38 दलघमी पाणी उपलब्धता देण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यता दिनांक 23.06.2009 ला देण्यात आली. चीचडोह बॅरेजसाठी सन 2012-13 मध्ये 33 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. सन 2013-14 मध्ये 80 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. कोटगल बॅरेज असो, कळमगाव बॅरेज असो, येनबोथला बॅरेज असो, मुल्लर बॅरेज असो तरतूद करण्यात आली. कोडगल बॅरेसाठी दिनांक 14.05.2010 ला 103.444 दलघमीची पाणी उपलब्धता देण्यात आली. प्रशासकीय मान्यता दिनांक 5 नोव्हेंबर, 2011 ला देण्यात आली. निविदापूर्व कार्यवाही प्रगतीपथावर आहे. यावेळी त्या संदर्भात 30 कोटी रूपयांची ठोक तरतूद केली आहे. कळमगाव बॅरेज संदर्भातील प्रशासकीय मान्यतेची कार्यवाही अद्याप सुरू आहे. येनबोथला बॅरेजचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक यांची कार्यवाही सुरू आहे.

(नंतर श्री. भारवि ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक...

आणि मुल्लुर बॅरेजसाठी सध्या नवीन लाभ क्षेत्र नसल्यामुळे प्रकल्प हाती घेण्यात आलेला नाही. या नदीवर साखळी बॅरेजेस करून त्या भागामध्ये सिंचन क्षेत्र निर्माण करण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. साधारणत: सन 2012-2013 मध्ये गडचिरोली जिल्ह्यासाठी सिंचन प्रकल्पासाठी 39 कोटी रूपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली. फेब्रुवारी 2013 पर्यंत रूपये 48.49 कोटी इतका पूर्वलक्षीत निधीचा खर्च झालेला आहे. सन 2013-14 साठी गडचिरोली जिल्ह्यासाठी सिंचन प्रकल्पांसाठी 111 कोटी रूपयांचा निधी प्रस्तावित आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन 2003 मध्ये या पाच बंधाऱ्यांना शासनाने मंजुरी दिलेली आहे. मात्र पाणी वाटप प्रमाणपत्रासाठी बराच वेळ लावलेला आहे. आता आपण मंजुरी दिलेली आहे असे म्हणत आहात. आता फक्त चिचडोहाचे काम सुरू झालेले आहे. उर्वरित 4 बंधाऱ्यांची कामे अजून सुरू झालेली नाहीत. गेल्या दहा वर्षापासून 6 लिफ्ट इरिगेशनच्या योजना शासनाकडे मंजुरीसाठी आलेल्या आहेत. ते काम देखील अद्याप पर्यंत पूर्णत्वाला आलेले नाही. गडचिरोली हा नक्षलवादी जिल्हा असून आपण आमच्यावर अन्याय करीत आहात. सदर अन्याय दूर करणार आहात काय, या प्रकल्पाला सन 2003 ते 2013 पर्यंत म्हणजे गेली दहा वर्षे मंजुरी का मिळाली नाही, याची शासन चौकशी करणार आहे काय ? शासनाने आता ज्या बंधाऱ्यांना मंजुरी दिलेली आहे त्याची कामे किती दिवसात पूर्ण करणार आहात ? यासंबंधातील माहिती माननीय मंत्री महोदयांनी द्यावी.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या भागामध्ये वन व्याप्ती असल्यामुळे काही कामांना मंजुरी मिळण्यासाठी वेळ लागला हे मी सांगितले आहे. त्यानंतरच्या काळात पाणी उपलब्धता मिळण्यासंबंधी कारवाई करण्यात आली. त्यात फक्त चिचडोहला पाणी उपलब्धता मिळाली. त्यामुळे त्या कामास आपण सुरूवात देखील केली आहे. कोटगल बॅरेजसंबंधी देखील सकारात्मक कारवाई सुरू आहे. कळमगाव, येनबोथला, मुल्लुर बॅरेज संबंधी मी माहिती दिली आहे. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मंजुरी देण्यासाठी बराच कालावधी लागला असे सांगितले आहे ते मला मान्य आहे. गडचिरोली सारख्या जिल्ह्यामध्ये आपण बॅरेजेसची संकल्पना केली आहे. त्या माध्यमातूनच सिंचनाची नवीन व्यवस्था निर्माण व्हावी असा शासनाचा विचार आहे. यासंबंधी राज्य शासनातर्फे लवकरात लवकर निश्चितपणे कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, गडचिरोली हा नक्षलवादी जिल्हा आहे. उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, तीन दशकापूर्वी या कामाला मान्यता दिलेली आहे. या नक्षलवादी व आदिवासी भागात सदर काम करण्यासाठी एवढा कालावधी का लागला आहे ? असा माझा पहिला प्रश्न आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, चिचडोह व कोटगल या दोन बंधाऱ्यांना मान्यता मिळाली आहे, असे आपण उत्तरामध्ये नमूद केले आहे. ते काम शासन कधी सुरू करणार आहे व ते किती दिवसात पूर्ण करण्यात येणार आहे ? आदिवासी भागावर अशा प्रकारे होत असलेला अन्याय पुरोगामी महाराष्ट्र शासन उघड्या डोळ्याने पाहणार आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आताच या दोन बॅरेज संबंधातील संपूर्ण माहिती दिली आहे. एवढेच नव्हे तर संकल्पना कशी होती यासंबंधातील देखील माहिती दिली आहे. तरी पण सन्माननीय सदस्यांनी विचारल्यामुळे मी सांगू इच्छितो की, चिचहोड बॅरेजला प्रशासकीय मान्यता दिनांक 23.6.2009 रोजी देण्यात आली. सन 2012-13 मध्ये चिचडोह बॅरेजसाठी 33 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली. सन 2013-14 साठी 80 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. कोटगल बॅरेजसाठी दिनांक 5 नोव्हेंबर 2011 मध्ये प्रशासकीय मान्यता देण्यात आली. दिनांक 14.5.2010 रोजी 103 दशलक्ष घनमीटर पाण्याची उपलब्धता मिळाली आहे. चिचहोड बॅरेजचे काम केव्हा पूर्ण करण्यात येईल असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारलेला आहे. जून 2016 पर्यंत काम पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यासाठी निधीची जी काही आवश्यकता लागेल ती निश्चित स्वरूपात देण्यात येईल.

.....

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सफाळे (जि. ठाणे) येथील अंबाडे गावाजवळील भावनगड किल्ल्याची दुरवस्था झाल्याबाबत

(6) * 38725 प्रा.सुरेश नवले, श्री.सुभाष चव्हाण, श्री.संजय दत्त, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय सांस्कृतिक कार्य मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सफाळे (जि. ठाणे) येथील अंबाडे गावाजवळील भावनगड किल्ल्याची दुरवस्था झाल्याचे दिनांक 23 जानेवारी, 2013 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त भावनगड किल्ल्यांच्या भिंती खचल्या असून या किल्ल्यांची दुरुस्ती त्वरित करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय देवतळे : (1) अशंत: खरे आहे,

(2) भावनगड किल्ल्याची पडझड झाली आहे ती नैसर्गिक कारणांमुळे झाली आहे. भावनगड किल्ला राज्य संरक्षित स्मारक घोषित करण्यासाठी संचालक पुरातत्व वस्तुसंग्रहालय संचालनालय यांनी महसूल विषयक माहिती जिल्हाधिकारी ठाणे यांच्याकडून मागविली आहे. ही माहिती प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, भावनगड किल्ला संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यासाठी संचालक व पुरातत्व आणि वास्तु संग्रहालय विभागाने ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडून माहिती कधी मागविलेली आहे आणि ती संबंधितांना कधी मिळेल असे माझे दोन प्रश्न आहेत.

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, ठाणे जिल्हाधिकारी यांच्याकडून याबाबतीत दिनांक 2 जून 2011 तसेच दिनांक 16 नोव्हेंबर 2011 च्या पत्रान्वये संबंधितांकडून माहिती मागविलेली असून ती अजून प्राप्त व्हावयाची आहे. पण मी सन्माननीय सदस्यांना आश्वस्त करु इच्छितो की, या अनुषंगाने लवकरात लवकर माहिती मागविण्यात येईल आणि ती प्राप्त झाल्यानंतर नोटीफाईड एरिया कोणता नक्की करावयाचा हे सर्व ठरवून त्याप्रमाणे आपल्याला प्रायमरी अधिसूचना काढाव्या लागतील आणि तशा त्या काढल्या जातील हे मी याठिकाणी सांगू इच्छितो.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, ठाणे जिल्ह्यातील सफाळा येथील जो भावनगड किल्ला आहे त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी पुरातत्व विभागाने जिल्हाधिकारी यांच्याकडून जून 2011 मध्ये माहिती मागविली असल्याचे त्यांनी सांगितले आहे आणि आता जून 2013 सुरु आहे म्हणजे याला दोन वर्षे झाली आहेत.अशा प्रकारे जर जिल्हाधिकारी दोन-दोन वर्षे याबाबतीत उत्तरे देत नसतील, माहिती देत नसतील तर ही अत्यंत गंभीर बाब आहे. म्हणून मला माननीय मंत्री महोदयांना विनंती करावयाची आहे. आता याला दोन वर्षे झाली आहेत. त्यामुळे एक महिन्याच्या ...

. . . .2 जी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आत किल्ल्याच्या संबंधातील माहिती जिल्हाधिकारी यांच्याकडून तातडीने मागविणार आहात काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे एक महिन्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्याकडून माहिती मागविण्यात येईल आणि त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी भावनगड किल्ल्याच्या संदर्भात प्रश्न विचारला असला तरी माझा जनरल स्वरुपाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रामध्ये असलेले वेगवेगळे किल्ले असून त्यातील काही आर्कीऑलॉजी विभागाच्या अंतर्गत आहेत म्हणजे काही केंद्र शासनाच्या अखत्यारित आहेत तर काही राज्य शासनाच्या अखत्यारित आहेत. या किल्ल्यांची दुरुस्ती करण्यासाठी शासनाने एकंदर किती निधी उपलब्ध करुन दिला आहे आणि सदरहू निधीचा वापर करण्यात आला आहे काय? या कामाच्या अनुषंगाने आर्कीऑलॉजीकल सर्व्हे करण्यासाठी किती निधी वर्ग करण्यात आला होता? तसेच कोकणातील सिंधुदुर्ग आणि इतर आसपासच्या चार-पाच किल्ल्यांच्या डागडुजीसाठी एकंदर किती निधी वर्ग करण्यात आला होता आणि त्यापैकी किती निधी खर्च करण्यात आला आहे याची माहिती देता येईल काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, याबाबतीत राज्य शासनाच्या अधिकारात एकंदर 260 संरक्षित स्मारके, किल्ले आहेत. केंद्र शासनाच्या अंतर्गत संरक्षित स्मारके व किल्ले 286 असून त्यामध्ये 46 किल्ले आहेत आणि काही असंरक्षित आहेत.मध्यंतरी 13 व्या वित्त आयोगाकडून या किल्ल्यांकरता प्रत्येक वर्षासाठी निधी प्रस्तावित केला होता.परंतु ते पैसे आले नाहीत. 2013-2014 मध्ये बारा कोटी रुपये प्रस्तावित केले आहेत. तसेच केंद्र शासनाकडून 2011-2012 करता 25 कोटी रुपये हे प्रत्येक वर्षासाठी प्रस्तावित होते. मात्र तो निधी त्यांच्याकडून आला नाही. कालच यासंबंधात बैठक झाली आणि मागील दोन वर्षाचे मिळून 50 कोटी रुपये देण्याचे मान्य करण्यात आले आहे. त्यानुसार आराखडा तयार करुन जे निकृष्ट किल्ले आहेत त्यांची दुरुस्ती करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, एकूणच संचालक, पुरातत्व आणि वास्तू संचालनालय याबाबतीत केंद्र शासनाचा अधिकार आहे. याबाबतीत आपण पाठपुरावा करण्यामध्ये किंवा आपल्या कडील जी यंत्रणा आहे त्यानुसार आपण अनेक गोष्टी जिल्हाधिकारी यांच्याकडे सोपवितो. मात्र ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले . . . .

मात्र आपल्याला त्यांच्याकडून उत्तरे वेळेवर मिळत नाहीत. यासाठी आपल्या विभागामार्फत वेगळी यंत्रणा उभारण्यात येईल का? पुराणवस्तू संग्रहालयाच्या बाबतीत केंद्र शासनाशी अधिक चांगल्या प्रकारे संपर्क ठेऊन आपल्या राज्यातील किल्ले आणि गड सुरक्षित ठेवता येतील अशा प्रकारची काही यंत्रणा आपल्या मंत्रालयामार्फत राबविण्यात येणार आहे काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, याबाबतीत माननीय मुख्यमंत्री विशेष कृती आराखडा असून 2012-2013 अंतर्गत 17 कोटी रुपयांपैकी 7 कोटी ए.एस.आय.ला दिले आहेत. त्यामध्ये शिवनेरी, लोहगड, राजमाची किल्ला यांचा समावेश आहे. सन्माननीय सदस्यांनी म्हटले ते बरोबर आहे की, ए.एस.आय. मध्ये समन्वय नव्हता.परंतु आम्ही यासंबंधात सतत बैठका घेत आहोत. काल सुध्दा या अनुषंगाने बैठक झालेली आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38725....

श्री.संजय देवतळे....

केंद्र सरकारने सुध्दा 25 कोटी रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे त्याप्रमाणे मी या मध्ये स्वत: लक्ष घालून व समन्वय साधून ए.एस.आय.चे किल्ले किंवा राज्यातील किल्ले सुस्थितीत ठेवण्यासाठी पाठपुरावा करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

गाडगीळ समितीच्या पर्यावरण विषयक अहवालाबाबत

(7) * 38955 श्री.रामदास कदम, डॉ.दीपक सावंत : सन्माननीय **पर्यावरण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) गाडगीळ समितीच्या अहवालाच्या अंमलबजावणीने कोकणातील 50 तालुक्यातील सर्वच आर्थिक व्यवहार बंद होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, गाडगीळ समितीचा अहवाल केंद्राने स्वीकारल्यास कोकणात सर्वत्रच सामाजिक तणाव निर्माण होण्याची शक्यता आहे काय,

(3) तसेच या अहवालामुळे कोकणातील नागरिकांना स्वत:ची घरे देखील बांधता येणार नाही, खासगी मालकीच्या जंगल जमिनीवर पायदेखील टाकता येणार नाही, घरांसाठी खाणीतून दगड काढण्यासाठी बंदी घालणारा अहवाल असल्यामुळे नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.संजय देवतळे : (1), (2), (3) व (4) गाडगीळ समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्रातील 13 जिल्हे व 77 तालुक्यांच्या समावेश आहे. या अहवालातील शिफारशीनुसार या क्षेत्रामध्ये अतिसंवेदनशील भागात उत्खनन प्रदूषणकारी उद्योग, मोठी धरणे इत्यादीवर प्रतिबंध प्रस्तावित असल्याने केंद्र शासनाने या शिफारशींची व्यवहार्यता तपासण्याबाबत दिनांक 17.8.2012 रोजी डॉ.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार कार्यगटाची स्थापना केली असून ही समिती दिनांक 15.4.2013 पर्यंत अहवाल केंद्र शासनास सादर करणार आहे. सदर समितीने महाराष्ट्रातील समस्यांबाबत माननीय मुख्यमंत्र्या सोबत आढावा घेऊन रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे भेटी दिल्या व स्थानिक लोकांच्या समस्या समजून घेतल्या आहेत.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, गाडगीळ समितीच्या अहवालाबाबत कोकणामध्ये प्रचंड असंतोष आहे. आज कोकणामध्ये विकासाचे काम पूर्णपणे ठप्प झालेले आहे. उत्तरामध्ये नमूद करण्यात आलेले की, "या संदर्भात समिती नेमण्यात आली असून त्या समितीचा अहवाल 15

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38955...

श्री.रामदास कदम...

मार्च 2013 पर्यंत केंद्र शासनाला सादर करणार आहे." माननीय मुख्य मंत्री महोदयांनी देखील सांगितले आहे की, गाडगीळ समितीचा अहवाल स्वीकारल्यास कोकणावर प्रचंड अन्याय होणार आहे. तेव्हा या संदर्भात शासनाची नेमकी काय भूमिका आहे, या संदर्भात माननीय मुख्यमंत्री महोदय ठोस निर्णय घेऊन कोकणासाठी विकासाचे दरवाजे खुले करणार आहेत काय ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, दिनांक 4 मार्च 2010 रोजी प्रा.माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली 14 सदस्यांची समिती नेमण्यात आली होती. या समितीने मार्च 2010 ते ऑगस्ट 2011 पर्यंत अभ्यास करुन ऑगस्ट 2011 मध्ये अहवाल दिला. हा अहवाल केंद्र शासनाने स्वीकारला नाही. त्या अहवालाबद्दल खूप आक्षेप होते आणि राज्य शासनाने सुध्दा आपल्या हरकती मांडल्या होत्या. हा अहवाल फक्त आपल्या राज्याकरिता नसून तो सहा राज्यांकरिता आहे. त्यामध्ये कर्नाटक, गुजरात, गोवा, तामिळनाडू, केरळ या राज्यांचा समावेश आहे. गाडगीळ समितीचा अहवाल हा राज्यातील विकासाला खीळ घालणारा आहे असे त्या राज्यांनी सांगून त्यास विरोध केलेला आहे.

सभापती महोदय, त्यानंतर दिनांक 17 ऑगस्ट 2012 रोजी डॉ.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली 9 सदस्यांच्या उच्चाधिकार कार्यगटाची स्थापना करण्यात आली. या समितीने दिनांक 20 नोव्हेंबर, 2013 रोजी माननीय मुख्यमंत्री महोदयांसोबत चर्चा केली. गाडगीळ समितीने ज्या शिफारशी केलेल्या शिफारशी या समितीने समजून घेतल्या आहेत. या समितीने दिनांक 11 व 12 फेब्रुवारी, 2013 रोजी रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दौरा देखील केलेला आहे. शासनाने गाडगीळ समितीचा अहवाल स्वीकारलेला नाही. डॉ.कस्तुरीरंगन समितीला पुनर्विलोकन करुन अहवाल द्यायचा आहे. दिनांक 15 एप्रिल पर्यंत त्यांना मुदत दिलेली आहे या कालावधीत ते अहवाल देतील. 16 ऑगस्टच्या अधिसूचनेनुसार तेथे मोरॅटोरीयम लागू केलेला आहे. हे मोरॅटोरीयम उठवावे म्हणून माननीय मुख्यमंत्री महोदयांनी देखील विनंती केलेली आहे. त्यासाठी या समितीने रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्याचा दौरा केलेला आहे. शासनाने ज्या हरकती समिती

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38955...

श्री.संजय देवतळे...

समोर ठेवलेल्या आहेत त्या संदर्भात दिनांक 15 एप्रिल पर्यंत अहवाल येईल आणि त्यानंतर तो केंद्र शासनास पाठविण्यात येईल. कोकणात शाश्वत स्वरुपात विकासाचा मार्ग निघेल असा मी विश्वास देतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्याच्या आणि कोकणाच्या दृष्टीने आम्हा सर्वांच्या मनामध्ये चिंतेचे वातावरण आहे. या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. या निर्णयाचा इतर राज्यांमध्ये काय परिणाम, दुष्परिणाम होता हा भाग महत्वाचा असला तरी तो महाराष्ट्राच्या दृष्टीने तो अलाहिदा आहे. कारण संपूर्ण कोकण विभाग त्या पट्टयात येत आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, या संदर्भात डॉ.कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखालील समिती 15 एप्रिल, 2013 पर्यंत अहवाल देईल असे अपेक्षित आहे. हा राजकीय प्रश्न नाही. कोकणाच्या भवितव्यावर मोठे प्रश्न चिन्ह करणारा हा प्रश्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38955...

श्री.भाई जगताप....

15 तारखेला डॉ.कस्तुरीरंगन समितीचा अहवाल आपल्यासमोर येणार आहे हा भाग बाजूला ठेवा. परंतु आज कोकणात साधे घर बांधायचे झाले तर अनेक अडचणी येतात. त्यामुळे गरज पडल्यास भविष्यात माननीय मुख्यमंत्री आणि मंत्री महोदय या विषयी माननीय पंतप्रधानांची वेगळी भेट घेऊन समितीच्या अहवालातील जाचक अटी दूर करण्याचा प्रयत्न करतील काय ?

श्री.संजय देवतळे : महोदय, या पूर्वीच माननीय मुख्यमंत्र्यांनी माननीय पंतप्रधानांची भेट घेऊन त्यांना या विषयी विस्तृत माहिती दिली आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री श्रीमती जयंती नटराजन यांना सुध्दा माहिती दिली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या विनंतीवरुन केंद्रीय पर्यावरण मंत्री या भागात मागे येणार होत्या. परंतु त्यांची प्रकृती ठीक नसल्यामुळे त्या येऊ शकल्या नाहीत. त्या लवकरच येतील अशी अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्री स्वत: या विषयी लक्ष घालत आहेत. माधव गाडगीळ समितीच्या अहवालातील हरकती आणि कोकणातील मोरॅटोरीयम उठविण्यासाठी ते निश्चितपणे पाठपुरावा करीत आहेत.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, 2010 पासून कोकणावर अन्याय सुरु आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी मान्य केले आहे की, या सर्व बाबींमुळे कोकणातील विकास कामे थांबली आहेत. त्या ठिकाणी आज चिरे खाणीतून तांबडा दगड काढला जात नाही. वाळू उत्खनन करता येत नाही. अगोदरच कोकण मागासलेला असताना मोरॅटोरीयममुळे कोकणातील विकास कामांना खीळ बसली आहे. दि.15 एप्रिल, 2013 रोजी डॉ.कस्तुरीरंगन समितीचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठविण्यात येणार आहे. त्यानंतर एक वर्षांने तो अहवाल राज्याकडे परत येईल. एकंदरीत या संपूर्ण गोष्टींमुळे कोकणातील विकास कामे थांबणार आहेत. या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारु इच्छितो की, हा अहवाल केंद्र सरकारकडून किती दिवसात मागवून कोकणाला न्याय देणार आहात ?

श्री.संजय देवतळे : महोदय, माधव गाडगीळ समितीचा अहवाल स्वीकारलेला नाही. परंतु सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात दि.16/2/2010 रोजी माननीय केंद्रीय बंदरे मंत्र्यांच्या सूचनेद्वारे त्या मोरॅटोरीयम ऑर्डर लागू झाली. मोरॅटोरीयमची मुदत दि.30/04/2013 पर्यंत आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी कस्तुरीरंगन समितीसमोर माधव गाडगीळ समितीच्या अहवालाबाबतच नव्हे तर मोरॅटोरीयम ऑर्डरबाबत आक्षेप घेतले. तसेच या बाबी कशा अन्यायकारक आहेत हे सुध्दा त्यांनी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38955...

श्री.भाई जगताप....

सांगितले आहे. त्यामुळे डॉ.कस्तुरीरंगन समिती दि.11 व 12 फेब्रुवारी, 2013 रोजी सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यात जाऊन आली. त्यामुळे त्या भागात निश्चितपणे मोरॅटोरीयमची ऑर्डर उठविली जाईल. त्यानंतर सर्व कामे सुरु होतील. परंतु अजून त्यांचा अहवाल लागूच झालेला नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री सांगत आहेत की, मोरॅटोरीयम ऑर्डर उठविली जाईल. परंतु प्रत्यक्षात मोरॅटोरीयम उठविले गेले नाही. परिणामी आजही कोकणातील विकास कामे बंद आहेत. या निमित्ताने मी माननीय मंत्री महोदयांना विचारु इच्छितो की, मोरॅटोरीयमची ऑर्डर नक्की कधी उठविण्यात येईल या बाबत माननीय मंत्री निश्चित कालमर्यादा सांगतील काय ? कारण त्या भागात अभ्यास समितीचा दौरा सुध्दा झालेला आहे. गाडगीळ समितीच्या अहवालाला सर्वांचा विरोध आहे. यामुळे जैतापूर प्रकल्प रखडणार आहे ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे राज्य सरकारची मोरॅटोरीयम ऑर्डर उठविण्याबाबत नेमकी काय भूमिका आहे ?

श्री.संजय देवतळे : सभापती महोदय, मोरॅटोरीयम ऑर्डरची मुदत दि.30 एप्रिल, 2013 पर्यंत आहे. अजून ती उठविली नाही. ती ऑर्डर उठविण्याचा विचार करण्यासाठीच समिती त्या ठिकाणी गेली होती. समितीने सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील लोकांशी व लोकप्रतिनिधींशी चर्चा केली आहे. सर्वांनीच त्या समितीकडे मोरॅटोरीयम उठविण्याची विनंती केली आहे. मोरॅटोरीयम उठविल्यानंतर त्या ठिकाणी पूर्वी ज्या चिरे खाणी किंवा अन्य कामे सुरु होती ती नेहमीप्रमाणे सुरु होतील. गाडगीळ समितीचा अहवाल स्वीकारु नये या दृष्टिकोनातून त्यांना विनंती करण्यात आली आहे. त्यामुळे डॉ.कस्तुरीरंगन समितीने सर्व बाबी समजून घेतल्या आहेत. त्या समितीला 15 एप्रिल पर्यंत अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. त्या समितीचा अहवाल केंद्र सरकारला सादर केल्यानंतर केंद्र सरकार त्या बाबत निर्णय घेईल.

सभापती : मी माननीय पर्यावरण मंत्र्यांना सांगू इच्छितो की, हा प्रश्न कोकणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे. कोकणातील लोकप्रतिनिधी आणि अन्य शेतकऱ्यांचा गाडगीळ समितीच्या अहवालाला अत्यंत प्रखर विरोध आहे. या सर्व पार्श्वभूमीवर त्या भागातील सर्व आमदारांसोबत आपण बैठक घेतली किंवा माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली तर या बाबतीत काही तरी मार्ग निघू

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.38955....

सभापती.....

शकेल असे मला वाटते. या अनुषंगाने बैठक आयोजित करण्याबाबत आपण प्रयत्न करावा. सन्माननीय मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक कशी आयोजित करता येईल या बाबत आपण प्रयत्न करावा.

श्री.संजय देवतळे : ठीक आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

नंतर श्री.बरवड...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसबंधी

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. काल याच मुद्याच्या संदर्भात नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंदर्भात आपण असे सांगितले की, सभागृहाच्या कामकाजामध्ये तो विषय नाही. आज सभागृहाच्या कामकाजामध्ये तो विषय आहे. कामकाजामध्ये विषय असताना या सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन यावर चर्चा केली पाहिजे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार यांनी या राज्याचा जो अवमान केलेला आहे त्याबद्दल त्यांनी राजीनामा दिला पाहिजे अशी संपूर्ण राज्याची मागणी आहे. श्री. अजितदादा पवार यांनी राजीनामा दिल्याशिवाय या राज्याचा त्यांनी केलेला अवमान निघणार नाही.

(दोन्ही बाजूचे अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

सभापती : मी 30 मिनिटांकरिता सभागृहाची बैठक तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.11 वाजता 30 मिनिटांसाठी स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य उभे राहून बोलत असतात.)

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मला एका महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडावयाचा आहे. माननीय सभापतींनी मला परवानगी दिलेली आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी शांतपणे खाली बसावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली आहे. राज्यामध्ये बाहेर जी परिस्थिती निर्माण झालेली आहे.....

(सत्ताधारी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य आपल्या जागा सोडून बोलत असतात.)

उप सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जावे. मला बोलू द्यावे. सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि इतर सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. माननीय सभापतींनी ती सूचना नाकारलेली आहे. त्यामुळे.....

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी माननीय सभापतींना भेटलो आहे.....

(दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलत असतात.)

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या विषयावर औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

उप सभापती : मी सभागृहाचे कामकाज 25 मिनिटांकरिता तहकूब करीत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.44 वाजता 25 मिनिटांकरिता स्थगित झाली.)

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>स्थगितीनंतर</u>

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाची सूचना दिलेली असून तो नियम 289चा विषय कसा होतो हे सांगण्याची आम्हाला संधी द्यावी...

(सत्ताधारी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून मार्गिकेमध्ये येऊन बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आम्ही माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचा राजीनामा मागितला आहे का? होय, आम्ही राजीनामा मागितला आहे. आम्हाला त्यांचा राजीनामा हवा आहे. त्यांच्या आक्षेपार्ह वक्तव्यामुळे राजकीय कार्यकर्त्यांची अवज्ञा झाली आहे. माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दुष्काळी भागातील जनतेच्या जखमेवर एक प्रकारे मीठ चोळण्याचे काम केलेले आहे. त्यामुळे महाराष्ट्रात जो गोंधळ निर्माण झाला आहे त्याचे गांभीर्य लक्षात घेता नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर आम्हाला चर्चा उपस्थित करावयाची आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : मी काल नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी निर्णय दिलेला आहे. माननीय उप सभापती यांनीही काही वेळापूर्वी तो निर्णय या ठिकाणी सांगितलेला आहे. काल नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या दोन्ही सूचना मी नाकारलेल्या आहेत. तसेच आज नियम 289 अन्वये देण्यात आलेली प्रस्तावाची सूचना मी दालनात नाकारली आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य घोषणा देत असतात)

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझे असे म्हणणे आहे की, आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये नियम 260 अन्वये विजेच्या संदर्भातील प्रस्ताव दर्शविण्यात आलेला आहे, प्रत्येक वेळी आपले म्हणणे असते की, आजच्या कामकाज पत्रिकेवर तसा कोणता विषय नाही. परंतु आजच्या कामकाज पत्रिकेमध्ये विजेच्या संदर्भातील प्रस्ताव दर्शविण्यात आलेला आहे. तो लक्षात घेता नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेनुसार आम्ही माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांचा राजीनामा मागितला आहे. कारण त्यांची वक्तव्याची भाषा राजकीय कार्यकर्त्यांचा अवमान करणारी आहे. अशा प्रकारचे वक्तव्य आपल्या या सभागृहाचे नेते करतात याची आम्हाला लाज वाटते. त्यामुळे आम्हाला विजेच्या प्रस्तावावर सभागृहात चर्चा करावयाची आहे.

(सभागृहात दोन्ही बाजूचे अनेक माननीय सदस्य घोषणा देत असतात)

सभापती : माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांचा औचित्याचा मुद्दा काय आहे?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला माझे म्हणणे पूर्ण करु द्यावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आज नियम 289 अन्वये प्रस्तावासंबंधी जी सूचना देण्यात आली आहे ती मी नाकारली आहे. आपले अन्य काही म्हणणे असेल तर बोलता येईल.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, मी एका महत्वाच्या गोष्टीकडे आपले लक्ष वेधू इच्छितो.....(गोंधळ).....महाराष्ट्र राज्याचे जे विधानमंडळ आहे, त्या विधानमंडळात विधानपरिषद सभागृह आहे, त्या सभागृहाचे श्री.नितीन गडकरी हे सदस्य आहेत. त्यांनी या देशाच्या पंतप्रधानांबद्दल अतिशय वाईट व आक्षेपार्ह असे विधान केलेले आहे.....

सभापती : मी सभागृहाची बैठक दिवसभरासाठी तहकूब करतो.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 10 एप्रिल, 2013 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेत सभागृहाची विशेष बैठक भरेल. या बैठकीत म.वि.प.नियम 260 अन्वये सत्ताधारी पक्षाकडून देण्यात आलेल्या प्रस्तावावर विचार करण्यात येईल. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन: भरेल.

(सभाजृहाची बैठज दुपारी 02 वाजू□13 मि□टां□ बुधवार, दि□ांज 10 एप्रिल, 2013 रोजीच्या सज ाळी 10.00 वाजेपर्य□त स्थजित झाली)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही